सोलापूर
SOLAPUR TARUN BHARAT
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित
सोलापूर | शनिवार, १ नोव्हेंबर २०२५ । युगाब्द ५१२७ । वर्ष ४१ वे अंक ३५१ । पाने १२ । किंमत रु. ६/-
| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |
ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

# एमपीएससी राज्यसेवा परीक्षेत सोलापूरचा डंका

## मोहाळचे विजय लामकाने राज्यात पहिले तर सांगोल्याचे डॉ. हिमालय घोरपडे दुसरे

**तभा वृत्तसेवा,**
**मोहोळ | सांगोला, दि. ३१ ऑक्टोबर-**

महाराष्ट्र राज्य लोकसेवा आयोगाच्या परीक्षेचा निकाल शुक्रवारी घोषित करण्यात आला असून कोन्हेरी (ता. मोहोळ) चे सुपुत्र विजय नागनाथ लामकाने यांनी राज्यात प्रथम क्रमांक पटकावला आहे. तर अहिल्यानगर जिल्हाधिकारी कार्यालयात पुनर्वसन तहसीलदार म्हणून कार्यरत असणारे मूळचे मळोली (ता. माळशिरस) येथील व सध्या सांगोला येथील रहिवासी डॉ.हिमालय घोरपडे यांनी राज्यात दुसरा क्रमांक पटकावला.

मोहोळचे विजय लामकाने यांचे प्राथमिक शिक्षणमोहोळ तालुक्यातील कोन्हेरी येथील


**विजय लामकाने**


**डॉ.हिमालय घोरपडे**

जिल्हा परिषद शाळेत झाले. ७ वीच्या शिष्यवृत्ती परीक्षेत सुद्धा त्यांनी राज्यात ४ था क्रमांक पटकावला होता. आठवी ते दहावी शिक्षण नागनाथ विद्यालय मोहोळ येथे झाले.अकरावी बारावीचे शिक्षण एडीजोशी महाविद्यालय सोलापूर येथे झाले आणि बीएससी पर्यंत शिक्षण पुण्याच्या फर्ग्युसन कॉलेजमध्ये झाले.२०२१ म ध्येबीएससी पूर्ण केल्यानंतर त्यांनी सेल्स टॅक्स इन्स्पेक्टर या परीक्षा दिली. तिथे सन २०२२ त्यांची निवड झाली.त्यानंतर २०२३ मध्ये त्याने गटविकास अधिकारी ही परीक्षा उत्तीर्ण केली आणि त्याचे ट्रेनिंग सध्या सुरू आहे.


याच दरम्यान सन २०२४ मध्ये परत त्यांनी एम पी एस सी ची परीक्षा दिली त्या परीक्षेचा निकाल शुक्रवारी लागला असून डेप्युटी कलेक्टर या पदासाठी त्यांनी राज्यात प्रथम क्रमांक पटकावला आहे.त्यांच्या कुटुंबात त्यांचे वडील आई आणि बहीण असा परिवार आहे. शेती करणाऱ्या त्यांच्या वडिलांनी सातत्याने मुलाच्या शिक्षणासाठी मुलाची पाठराखण केली.आणि मुलगा विजयने त्यांच्या प्रयत्नांचे चीज केले आणि ही निवड झाली.हा निकाल लागल्यानंतर गावात आनंद उत्सव साजरा करण्यात आला.

**तहसीलदार डॉ. हिमालय यांचेही कौतुक**

अकलूज येथील शंकरराव मोहिते महाविद्यालयाचे सेवानिवृत्त प्रा.डॉ.बाळकृष्ण घोरपडे व सांगोला येथील वामनराव शिंदे विद्यालयाच्या सेवानिवृत्त मुख्याध्यापिका सुवर्णप्रभा घोरपडे यांचे ते चिरंजीव आहेत. डॉ. हिमालय घोरपडे यांचे प्राथमिक शिक्षण सांगोला येथे, उच्च माध्यमिक शिक्षण विवेकानंद सायन्स कॉलेज, कोल्हापूर येथे तर मुंबईतील नायर हॉस्पिटल सेंटर येथे एमबीबीएस पदवी प्राप्त केली. सन २०१९ मध्ये त्यांनी प्रथमच एमपीएससी परीक्षेत यश संपादन करून तहसीलदार पद मिळवले. यशदा, पुणे येथे प्रशिक्षण पूर्ण केल्यानंतर त्यांनी हिंगोली येथे पर्यवेक्षाधीन तहसीलदार म्हणून सेवा दिली.

त्यानंतर सन २०२२ ते २४ या कालावधीत अप्पर तहसीलदार म्हणून कार्यरत राहून उल्लेखनीय प्रशासनिक कामगिरी बजावली. सध्या ते २०२४ पासून अहील्यानगर येथे पुनर्वसन तहसीलदार म्हणून जबाबदारी सांभाळत आहेत. डॉ.हिमालय घोरपडे यांच्या या यशाबद्दल त्यांच्यावर सर्व स्तरातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.


## विचारपुष्प



नि आपले लक्ष्य प्राप्त करायचे असेल तर संघटित कार्यशक्ती आवश्यक आहे. कोणताही चमत्कार किंवा ऐतिहासिक कारणांनी विजय मिळावा, हे आम्हाला अपेक्षित नाही. हे कार्य भारत धर्म तथा संस्कृतीचे रक्षण करून करायचे आहे. हे राष्ट्र परम वैभवाला जावे ही आपली आकांक्षा आहे. आपले राष्ट्र सामर्थ्यशाली आणि समृद्ध झाले पाहिजे. थोडक्यात, 'भारत माता की जय'चा जयघोष व्हावा, याकरिता आपल्याला कार्य करायचे आहे.

**- प्रो. राजेंद्रसिंह उपाख्य रज्जूभय्या**
रा. स्व. संघाचे चतुर्थ सरसंघचालक

## महत्त्वाचे



### महाराष्ट्र केसरी सिकंदर शेखला अटक

**कोल्हापूर** : आंतरराष्ट्रीय कुस्तीपटू आणि 'महाराष्ट्र केसरी' विजेता पैलवान सिकंदर शेख याला पंजाब पोलिसांनी अवैध शस्त्र तस्करी प्रकरणात अटक केली आहे. प्राथमिक तपासानुसार सिकंदरचा या रॅकेटमध्ये सहभाग असल्याचा आरोप आहे. राजस्थानमधील पपला गुर्जर टोळीशी त्याचे संबंध असल्याचे पोलीस तपासातून समोर आल्यानंतर ही कारवाई करण्यात आली. सिकंदरच्या अटकेमुळे महाराष्ट्राच्या कुस्ती क्षेत्रात मोठी खळबळ उडाली आहे.'खोट्या गुन्ह्यात आमच्या मुलाला अडकवले जात आहे,' असा दावा सिकंदर शेखच्या कुटुंबाने केला आहे. दरम्यान, एकीकडे कुस्तीत मिळालेले यश आणि दुसरीकडे अवैध शस्त्र तस्करी प्रकरणात अटक यामुळे सिकंदर शेखच्या नावाने सर्वांच्याच भुवया उंचावल्या आहेत. या अटकेनंतर कुस्ती क्षेत्रातील अनेक दिग्गजांकडून संमिश्र प्रतिक्रिया उमटत आहेत. पंजाब पोलीस लवकरच या प्रकरणाची अधिक माहिती उघड करतील, अशी शक्यता आहे. पुणे येथे झालेल्या 'महाराष्ट्र केसरी २०२३' स्पर्धेच्या माती गटातील अंतिम लढतीत पंचांच्या वादग्रस्त निर्णयामुळे सिकंदर शेख चर्चेत आला होता. या निर्णयावर सोशल मीडियावर मोठे ट्रोलिंग झाले होते.

### टांझानियात हिंसक आंदोलनात ७०० जणांचा मृत्यू

**दोदोमा** : देशभरात तीन दिवसांपासून सुरू असलेल्या निवडणुकीतील गैरप्रकारांच्या विरोधातील हिंसक आंदोलनात सुमारे ७०० लोकांचा मृत्यू झाला आहे, असा दावा टांझानियाच्या चाडेमा या प्रमुख विरोधी पक्षाने केला आहे. चाडेमा पक्षाचे प्रवक्ते जॉन किटोका यांनी शुक्रवारी सांगितले की, देशभरातून मिळालेल्या आकडेवारीनुसार एकूण ७०० जणांचा मृत्यू झाला आहे. बुधवारी झालेल्या सार्वत्रिक निवडणुकीनंतर टांझानियात देशभर आंदोलने सुरू झालीत. आंदोलकांचा आरोप आहे की, अध्यक्ष सामिया सुलुहू हसन आणि त्यांच्या सत्ताधारी चामा चा मापिंडुझी पक्षाने निवडणुकीत गैरप्रकार केला आहे.

### दहावी, बारावी परीक्षांचे अंतिम वेळापत्रक जाहीर

**पुणे** : महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे दहावी आणि बारावीच्या परीक्षांचे अंतिम वेळापत्रक जाहीर करण्यात आले आहे. त्यानुसार बारावीची परीक्षा १०, तर दहावीची परीक्षा २० फेब्रुवारीपासून सुरू होणार आहे. राज्य मंडळाचे सचिव डॉ. दीपक माळी यांनी प्रसिद्धिपत्रकाद्वारे ही माहिती दिली. फेब्रुवारी-मार्च २०२६ मध्ये महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या पुणे, नागपूर, छत्रपती संभाजीनगर, मुंबई, कोल्हापूर, अमरावती, नाशिक, लातूर व कोकण या नऊ विभागीय मंडळांमार्फत आयोजित करण्यात येणाऱ्या बारावी, दहावीच्या लेखी व प्रात्यक्षिक परीक्षा आयोजित करण्यात येणार आहेत. आता अंतिम वेळापत्रक प्रसिद्ध करण्यात आले आहे. इयत्ता बारावीची लेखी परीक्षा १० फेब्रुवारी ते १८ मार्च या कालावधीत, तर माहिती-तंत्रज्ञान व सामान्य ज्ञान विषयांच्या प्रात्यक्षिक परीक्षेसह प्रात्यक्षिक, तोंडी, अंतर्गत मूल्यमापन परीक्षा २३ जानेवारी ते ९ फेब्रुवारी या कालावधीत घेतली जाणार आहे.

# देशाच्या एकता-अखंडतेला घुसखोरांचे मोठे आव्हान

## अवैध निर्वासितांमुळे बिघडतेय लोकसंख्येचे संतुलन : पंतप्रधान मोदी

**एकता नगर (गुजरात), ३१ ऑक्टोबर**

अनेक दशकांपासून घुसखोरी होत असल्याने देशाची अखंडता आणि एकतेसमोर मोठे आव्हान उभे ठाकले आहे तसेच अंतर्गत सुरक्षाही धोक्यात आली आहे. देशाच्या अनेक भागात अवैध निर्वासितांमुळे लोकसंख्येचे संतुलन बिघडत आहे. त्यामुळे देशात एकही घुसखोर राहता कामा नये, असे स्पष्ट प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केले आहे. सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंतीनिमित्त एकता नगर येथे आयोजित 'राष्ट्रीय एकता दिवस परेड' निमित्त ते बोलत होते.

देशाने घुसखोरांविरोधात निर्णायक लढा सुरू केला आहे. गेल्या अनेक दशकापांसून घुसखोर देशात प्रवेश करीत आहेत. त्यांनी देशाची एकता आणि अंतर्गत सुरक्षेसमोर आव्हान उभे केले आहे तसेच लोकसंख्येचे संतुलन घुसखोरांमुळे बिघडत आहे. त्यामुळे प्रत्येक घुसखोर देशाबाहेर काढला जाईल. प्रत्येक नागरिकाने या घुसखोरांना बाहेर काढण्यासाठी निर्धार करावा, असे आवाहन पंतप्रधान मोदींनी केले. देशातील अन्य संस्थानांप्रमाणे संपूर्ण जम्मू-काश्मीरचे भारतात विलीनीकरण व्हावे, असे तत्कालीन गृहमंत्री सरदार वल्लभभाई पटेल यांना वाटत होते, पण याला तेव्हाचे पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांनी विरोध केला, असे वक्तव्य पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केले.


'स्टॅच्यू ऑफ युनिटी'समोर पथसंचलन करताना पोलिस आणि निमलष्करी दलाचे जवान

### भाषणातील महत्त्वाचे मुद्दे



- काँग्रेसने राष्ट्रीय स्वयंसेवक संघालाही त्रास दिला.
- ज्यांना देशाचे विभाजन पुन्हा व्हावे, असे वाटत आहे त्यांचा घुसखोरांना पाठिंबा
- घुसखोरांकडून स्थानिकांच्या नोकऱ्यांवर गंडांतर; संसाधनाची लूट
- यापूर्वीच्या सरकारांचे मतांसाठी घुसखोरीकडे दुर्लक्ष
- प्रथमच घुसखोरीविरोधात निर्णायक लढाईला सुरुवात
- घुसखोरीला गंभीरतेने घेण्याऐवजी काही पक्षांकडून राजकीय फायद्यासाठी संरक्षण देण्याचे प्रयत्न
- मुद्दा गंभीर झाल्यास त्याचा सर्वांनाच धोका
- माओवादाचा समूळ नायनाट होईपर्यंत थांबणार नाही
- सरदार पटेल, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, जयप्रकाश नारायण यांच्याकडे काँग्रेसचे दुर्लक्ष
- 'वंदे मातरम्' या राष्ट्रीय गीतातील काही भाग धर्माच्या आधारावर गाळला
- अनेक भाषा ह्या भारतीय एकतेचा स्तंभ

### 'ऑपरेशन सिंदूर'मधील वीर परेडमध्ये सहभागी

'ऑपरेशन सिंदूर'मध्ये पराक्रम गाजविलेले आणि शौर्यपदक जिंकलेले सीमा सुरक्षा दलाचे १६ जवान परेडमध्ये सहभागी झाले होते. याशिवाय देशी प्रजातीच्या श्वानांचाही सहभाग होता. मुधोळ आणि रामपूर प्रजातीच्या श्वानांनी याप्रसंगी कौशल्याचे प्रदर्शन केले.

लोहपुरुष म्हणून ओळखले जाणारे सरदार पटेल यांनी देशातील संस्थाने भारतात सामील केली. संपूर्ण काश्मीरही भारतात सामील व्हावे, अशी त्यांची इच्छा होती. पण, पंडित नेहरूंनी ती पूर्ण होऊ दिली नाही. काश्मीरचे विभाजन करण्यात आले आणि काश्मीरला स्वतःचा ध्वज आणि घटना मंजूर केली. काँग्रेस पक्षाने केलेल्या चुकीचे परिणाम दशकांपासून देश भोगत आहे. इतिहास लिहिण्यापेक्षा इतिहास घडविण्यावर सरदार पटेलांचा विश्वास होता, असा टोलाही त्यांनी लगावला.

पटेल यांच्या जयंतीनिमित्त 'स्टॅच्यू ऑफ युनिटी' समोर निघालेल्या परेडमध्ये बीएसएफ, सीआयएसएफ, सीआरपीएफ आणि एसएसबी या निमलष्करी दलांसह विविध राज्यांमधील पोलिस दलाच्या तुकड्या सहभागी झाल्या होत्या. (वृत्तसंस्था)

# दिव्यांगत्व आल्यास कर्मचाऱ्यांना सेवेतून काढता येणार नाही

## शासनाच्या मार्गदर्शक सूचना निर्गमित

**मुंबई, ३१ ऑक्टोबर**

शासकीय सेवेत कार्यरत असताना दिव्यांगत्व प्राप्त झाल्यास कर्मचाऱ्याला आता सेवेतून काढता येणार नाही किंवा त्याच्या पदाचा दर्जा कमी करता येणार नाही. जर कर्मचारी सध्याच्या पदावर कार्य करण्यास असमर्थ असेल, तर त्याला समान वेतनश्रेणीतील दुसऱ्या योग्य पदावर पदस्थापित करणार. तसेच कोणत्याही पदावर समायोजन शक्य नसल्यास, तो योग्य पद मिळेपर्यंत किंवा सेवानिवृत्तीपर्यंत अधिसंख्य पदावर पदस्थापना करण्याबाबतचा निर्णय शासनाने घेतला असून याबाबतचा शासन निर्णय जारी करण्यात आला आहे.

शासकीय, निमशासकीय, स्थानिक स्वराज्य संस्था, महामंडळे तसेच स्वायत्त संस्थांमधील सेवेदरम्यान दिव्यांगत्व प्राप्त झालेल्या कर्मचाऱ्यांच्या हक्कांचे आणि नोकरीतील सुरक्षिततेचे संरक्षण करण्यासाठी राज्य शासनाने या कर्मचाऱ्यांच्या हितासाठी निर्णय घेतला आहे. दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम, २०१६ मधील कलम २० (४) नुसार अधिसंख्य पद निर्माण करण्यासाठी मार्गदर्शक सूचना निर्गमित केल्या असल्याचे दिव्यांग कल्याण विभागाचे सचिव तुकाराम मुंढे यांनी सांगितले. (तभा वृत्तसेवा)

### कर्मचाऱ्यांचे समायोजन तज्ज्ञांच्या मार्गदर्शनानुसार

अधिसंख्य पदांची निर्मिती करताना दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियमातील कलम ३३ नुसार दिव्यांगांसाठी राखीव पदांच्या तरतुदींचा आधार घेण्यात येईल. अशा पदांसाठी सामान्य प्रशासन विभाग व वित्त विभागाची प्रशासकीय व अर्थसंकल्पीय मंजुरी आवश्यक असेल. सेवेदरम्यान दिव्यांगत्व प्राप्त कर्मचाऱ्यांचे समायोजन सध्याच्या किंवा अन्य योग्य पदावर करण्याबाबत नियुक्त प्राधिकारी वैद्यकीय मंडळ किंवा दिव्यांग तज्ज्ञांच्या मार्गदर्शनानुसार निर्णय घेण्यात येईल, असे मुंढे म्हणाले.

### महिला डॉक्टर आत्महत्येच्या तपासासाठी एसआयटी गठित

**मुंबई** : फलटणच्या महिला डॉक्टरच्या आत्महत्या प्रकरणाचा तपास आता एसआयटीकडून करण्यात येणार आहे. या प्रकरणी एसआयटी स्थापन करण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्याच्या पोलिस महासंचालकांना दिले. आत्महत्येचा तपास महिला आयपीएस अधिकाऱ्याच्या नेतृत्वात करण्यात येणार आहे. फलटणमधील उपजिल्हा रुग्णालयातील एका महिला डॉक्टरने आत्महत्या केली होती. या प्रकरणात तिने हातावर सुसाईड नोट लिहिल्याचे समोर आले.

# अमेरिका-भारत यांच्यात संरक्षण करार

### संरक्षण सहकार्य आराखड्यावर सहमती

**वॉशिंग्टन, ३१ ऑक्टोबर**

भारत आणि अमेरिकेमध्ये वॉशिंग्टन येथे शुक्रवारी १० वर्षांचा संरक्षण करार झाला असून भारताचे संक्षण मंत्री राजनाथ सिंह आणि अमेरिकेचे संरक्षण सचिव पीट हेगसेथ यांनी करारावर स्वाक्षरी केली. त्यामुळे दोन्ही देशात लष्करी सराव, प्रशिक्षणासाठी सैन्याला मदत आणि सुरक्षासंदर्भातील गोपनीय माहितीची देवाणघेवाण करण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

करारावर स्वाक्षरी झाल्यानंतर, अमेरिकेचे संरक्षण सचिव पीट हेगसेथ यांनी सांगितले, की माझी भारताच्या संरक्षण मंत्र्यांसोबत बैठक झाली. संरक्षणविषयक अनेक मुद्द्यांवर चर्चा केल्यानंतर आम्ही संरक्षण करारावर स्वाक्षरी केली.

भारत आणि अमेरिका यांच्यातील संरक्षण करारामुळे प्रादेशिक स्थिरता मजबूत होईल. माहितीची देवाणघेवाण आणि तांत्रिक सहकार्य, एकत्र लष्करी सराव करणे यासारखे मुद्द्यांचा करारात समावेश आहे. त्याचवेळी राजनाथ सिंह म्हणाले, दोन्ही देशांमधील संबंधांमध्ये संरक्षण हा एक महत्त्वाचा आधारस्तंभ आहे. संरक्षण आराखडा करारावर स्वाक्षरी झाल्याने एक नवीन अध्याय सुरू होईल. करार भारत आणि अमेरिका यांच्यातील संरक्षण भागीदारीच्या धोरणांना मार्गदर्शन करेल. संरक्षण हा आमच्या द्विपक्षीय संबंधांमध्ये एक महत्त्वाचा आधारस्तंभ आहे. मुक्त, नियमांवर आधारित इंडो-पॅसिफिक प्रदेशासाठी आमची भागीदारी महत्त्वाची आहे. हा करार दोन्ही देशांमधील वाढत्या धोरणात्मक सहकार्याचा केंद्रबिंदू आहे. (वृत्तसंस्था)

> ऐतिहासिक संरक्षण करार भारत-अमेरिका संरक्षण संबंधांना धोरणात्मक दिशा प्रदान करेल. हे आमच्या वाढत्या धोरणात्मक एकत्र येण्याचे संकेत आहेत आणि भागीदारीच्या नवीन दशकाची सुरुवात ठरेल. संरक्षण करार आमच्या द्विपक्षीय संबंधांचा एक प्रमुख आधारस्तंभ म्हणून राहील,
>
> **- राजनाथ सिंह,** संरक्षण मंत्री


वॉशिंग्टन येथे भारताचे संरक्षण मंत्री राजनाथ सिंह व अमेरिकेचे संरक्षण सचिव पीट हेगसेथ यांनी संरक्षण करारावर स्वाक्षरी केली

### करारातील प्रमुख मुद्दे

- दोन्ही देश संरक्षण आणि गुप्तचर माहितीची देवाणघेवाण करतील
- संरक्षण तंत्रज्ञान आणि क्षमता विकास क्षेत्रात सहकार्य वाढवले जाईल
- हिंद प्रशांत महासागरात लष्करी सराव, प्रशिक्षण आणि सुरक्षा उपक्रम राबवले जातील
- क्षेत्रीय स्थैर्य राखण्यासाठी संरक्षण धोरणांमध्ये समन्वय साधला जाईल
- करारामुळे अमेरिकेला चीनविरोधी रणनीतिक संतुलन साधता येईल



# गुरू तेगबहादूर यांचा आदर्श बाळगणे हीच खरी आदरांजली

## रा. स्व. संघाचे सरकार्यवाह दत्तात्रेय होसबळे यांचे प्रतिपादन

### अखिल भारतीय कार्यकारी मंडळाची जबलपुरात बैठक

**जबलपूर, ३१ ऑक्टोबर**

यावर्षी शीख परंपरेचे नववे गुरू तेगबहादूर यांच्या ३५० व्या बलिदान दिनी त्यांना आदरांजली अर्पण करण्याकरिता विविध धार्मिक, सामाजिक संघटनांसह सर्व जण अनेक कार्यक्रम आयोजित करत आहेत. गुरू तेगबहादूर यांच्या कार्याचे स्मरण करून त्या मार्गावर चालणे हीच त्यांना खरी आदरांजली ठरेल, असे प्रतिपादन राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरकार्यवाह दत्तात्रेय होसबळे यांनी केले.

रा. स्व. संघाची अखिल भारतीय कार्यकारी मंडळाची बैठक जबलपूर येथे होत आहे. त्यावेळी ते बोलत होते. सरकार्यवाह दत्तात्रेय होसबळे म्हणाले की, त्या संघर्षाच्या काळात, भारताचा बराचसा भाग परदेशी शासक औरंगजेबाच्या क्रूर अत्याचारांना बळी पडत होता. प्राचीन धार्मिक संस्कृती आणि श्रद्धा नष्ट करण्यासाठी संपूर्ण भारतात जबरदस्तीने धर्मांतर केले जात होते. त्याच काळात, समाजातील प्रमुख व्यक्ती एकत्र आल्या आणि त्यांनी पंडित कृपाराम दत्त यांच्या नेतृत्वात गुरू तेगबहादूर यांची भेट घेतली. परिस्थितीचे गांभीर्य समजून गुरू तेगबहादूर यांनी समाजाची चेतना आणि संकल्पशक्ती जागवण्यासाठी बलिदानाचा निश्चय केला आणि औरंगजेबाच्या क्रूर राजवटीला आव्हान दिले. धर्मांध औरंगजेबाने त्यांना अटक केली आणि एकतर इस्लाम धर्म स्वीकारा किंवा मृत्युदंडाला सामोरे जाण्यास सांगितले. स्वाभिमानी गुरू तेगबहादूर यांनी जुलमी राजवटीसमोर झुकण्याऐवजी बलिदानाचा मार्ग निवडला. मुगल शासकाने गुरू तेगबहादूर यांचा संकल्प तोडण्यासाठी त्यांचे शिष्य, भाई दयाला, भाई सतीदास आणि भाई मतिदास यांची निर्घृण हत्या केली. त्यानंतर गुरू तेगबहादूर मार्गशीर्ष शुक्ल ५, संवत १७३२ (सन १६७५) रोजी दिल्लीतील चांदणी चौकात धर्माचे रक्षण करताना दिव्य ज्योतीत विलीन झाले.

भारतीय परंपरेतील अशा महान तेजस्वी ताऱ्याची शिकवण आणि बलिदानाचे महत्त्व प्रत्येक नागरिकापर्यंत पोहोचविणे हीच त्यांना खरी आदरांजली ठरेल. त्यांच्या आदर्शांचे स्मरण करीत आपले आयुष्य घडवावे आणि या वर्षी होणाऱ्या सर्व कार्यक्रमांत राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या सर्व स्वयंसेवकांनी आणि संपूर्ण समाजाने श्रद्धापूर्वक सहभागी व्हावे, असे आवाहन सरकार्यवाह दत्तात्रेय होसबळे यांनी केले. (वृत्तसंस्था)


अखिल भारतीय कार्यकारी मंडळाच्या बैठकीत बोलताना सरकार्यवाह दत्तात्रेय होसबळे. यावेळी उपस्थित सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्वाचे...



## पिलीव येथे नागरी आघाडीतर्फे पोलिसांच्या विरोधात जनआक्रोश मोर्चा

**पिलीव, दि. ३१ ऑक्टोबर-**

माळशिरस तालुक्यातील पिलीव व आसपासच्या भागात वारंवार घरफोड्या तसेच चोऱ्यांचा ताबडतोब तपास व्हावा यासाठी पिलीव येथील नागरी आघाडीच्या वतीने पोलीस प्रशासनाविरोधात जनआक्रोश मोर्चा शुक्रवार दि. ३१ ऑक्टोबर रोजी सकाळी दहा वाजता काढण्यात आला. या मोर्चाची सुरुवात पिलीव येथील हनुमान मंदिरापासून करुन बसस्थानकावरील पोलीस ठाण्यात निवेदन देण्यात आले.या निवेदनात पिलीव व आसपासच्या परिसरात वारंवार घरफोड्या तसेच मोटारसायकली, सोने, नाणे, शेळ्या, मेंढ्या यासारख्या अनेक चोऱ्या झाल्या आहेत. पण पोलीस प्रशासनाकडून एकाही चोरीचा तपास लागलेला नाही.यासाठी पोलीस प्रशासनाने ताबडतोब पावले उचलावीत रात्री गस्त वाढवावी,पेट्रोलींग करावे,पोलीस कर्मचाऱ्यांची संख्या वाढवावी, पोलीस व्हॅनची सोय करावी आपण ताबडतोब या बाबीची अंमलबजावणी करावी अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा नागरी आघाडीच्यावतीने पोलीस प्रशासनाला देण्यात आला. यावेळी नागरी आघाडीचे अध्यक्ष आरिफखान पठाण, माजी सरपंच अमोल मदने, उमेश सरवदे, माजी सरपंच संग्राम पाटील, राजेंद्र जामदार, संतोष शेंडगे ,कल्याण जावळे, गोविंद भैस, कुमार भैस, विजय पिसे, रुषीकेश मदने, जिवन गोरे, दादासाहेब वगरे, दामोदर लोखंडे, प्रकाश तावरे, वैभव पिसे, दत्तात्रय भैस, कुमार लोखंडे,श्यामराव गलांडे,निलेश झेंडे मोर्चात सहभागी झाले होते. यावेळेस आरिफखान पठाण, अमोल मदने, ऋषीकेश मदने, संतोष शेंडगे, राजेंद्र जामदार, विजय पिसे, सुजित सातपुते यांनी यावेळी मनोगत व्यक्त केले. सदरचे निवेदन पोलीस हवालदार स्वरुप शिंदे व धनाजी झगडे यांनी स्वीकारले.

## पंढरपूरच्या राजाराम शिक्षण संकुलाच्या प्राचार्यपदी शरद चव्हाण

सुस्ते, दि.३१ ऑक्टोबर-



पंढरपूर येथील इंडियन नॅशनल हयुमन डेव्हलपमेंट इंटेग्रेटीव्ह असोसिएशन पंढरपूर संचलित, छत्रपती शिवाजी हायस्कूल व राजाराम ज्युनिअर कॉलेज पंढरपूर या शिक्षण संस्थेच्या प्राचार्यपदी सुस्ते येथील शरद चव्हाण यांची निवड करण्यात आली आहे. राजाराम शिक्षण संस्थेच्या प्राचार्या ॲड. रजनी जाधव सेवानिवृत्त झाल्याने रिक्त झालेल्या या पदावर ही निवड करण्यात आली आहे. प्रा.शरद चव्हाण यांना मागील वर्षी राष्ट्रीय विश्वगामी पत्रकार महासंघ संचलित राष्ट्रीय विश्वगामी शिक्षक व कर्मचारी महासंघ महाराष्ट्र राज्य यांच्यावतीने राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार मिळाला आहे. या निवडीबद्दल संस्थेचे संस्थापक अध्यक्ष अरविंद जाधव, सचिव राज जाधव, पुणे विभाग शिक्षक मतदार संघाचे माजी आमदार दत्तात्रय सावंत, पंढरपूर- मंगळवेढा मतदारसंघाचे आमदार समाधान आवताडे राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे तालुकाध्यक्ष अतुल चव्हाण यांनी प्रा. शरद चव्हाण यांचे अभिनंदन केले आहे.




## श्रेया कालेकर यांचा सन्मान

**सोलापूर, दि. ३१ ऑक्टोबर-**

लैंगिक छळ प्रतिबंधक (POSH) क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल ॲड. श्रेया कालेकर यांना सन्मानित केले असून सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांनी त्यांचा सत्कार केला. या स्तरावर त्यांच्या समर्पणाचे आणि कठोर परिश्रमाचे कौतुक होत आहे हे पाहणे आपल्या सर्वांसाठी अभिमानाचा क्षण आहे.

## पिलीव परीसरात अवकाळी पाऊस; ऊस तोडणी हंगाम लांबणीवर?

**पिलीव, दि. ३१ ऑक्टोबर-**

महाराष्ट्र शासनाने यंदाचा गळीत हंगाम एक नोव्हेंबर पासुन सुरु करण्यास परवानगी दिली आहे. सर्व कारखाने गाळपास सज्ज झाले आहेत. मध्य प्रदेश व इतर ठिकाणाहून गावा गावात टोळ्या दाखल झाल्या आहेत. कधी नव्हे त्या यंदा टोळ्या वेळेवर आल्या आहेत. पण सध्या गेल्या चार पाच दिवसांपुर्वी झालेला पाऊस यामुळे गळीत हंगाम थोडा लांबणीवर पडण्याची शक्यता आहे.पाऊस झाल्यामुळे सध्या वापसा नाही .यामुळेच कोयता थांबला आहे.ह्या अवकाळी पावसामुळे ऊस तोडणी थांबली आहे.पिलीव परीसरात अजुनही अवकाळी पावसाचे सावट आहे .यामुळेच शेतकरी सध्या ऊस तोडणी करण्यास घाबरत आहेत. पाऊस येतो की काय अशी परिस्थिती असल्यामुळे पिलीव परिसरातील ऊस तोडणी हंगाम लांबणीवर जाण्याची शक्यता आहे. कधी नव्हे ते यंदा ऊस तोडणी कामगार वेळेवर आले आहेत पण पावसामुळे वापसा नसल्यामुळेच ऊस तोडणी सध्या थांबली आहे.

## बाबुराव डिसले स्मृती गौरव पुरस्काराचे आयोजन

**बार्शी, दि. ३१ ऑक्टोबर-**

ज्येष्ठ उद्योगपती शिवाजीराव डिसले यांच्या जयंतीनिमित्त सुरज क्रीडा व सांस्कृतिक मंडळाच्यावतीने येत्या ६ जानेवारी २०२६ रोजी कै. बाबुराव डिसले स्मृती जीवन गौरव पुरस्कार विविध उल्लेखनीय कार्य करणाऱ्या गुणवंतांना व कै. शिवाजीराव डिसले शेठ युवा उद्योजक पूरस्कार दिले जाणार असल्याची माहिती मंडळाचे अध्यक्ष रविंद्र कापसे यांनी दिली. पुरस्काराचे हे २१ वे वर्ष आहे. विविध क्षेत्रातील गुणवंतांनी पुरस्कारासाठी आपल्या माहितीचे अर्ज- श्री. रवींद्र कापसे, रचना निवास, १०० फुटी रोड, उपळाई रस्ता, बार्शी, जि. सोलापूर येथे १० डिसेंबर २०२५ पर्यंत द्यावेत, असे आवाहन मंडळाचे सचिव प्रताप दराडे संपर्क ९०२८४५२२०७ यांनी केले.

# कार्तिकी यात्रेच्या स्वच्छतेसाठी राबताहेत दीड हजार कर्मचारी

### मुख्याधिकारी महेश रोकडे यांची माहिती

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. ३१ ऑक्टोबर-**

कार्तिकी यात्रेसाठी येणाऱ्या भाविकांच्या व स्थानिक नागरिकांच्या आरोग्य सुरक्षितेच्या व स्वच्छतेच्या दृष्टीने आवश्यक सोयी सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी नगरपालिका प्रशासन सज्ज असल्याची माहिती मुख्याधिकारी महेश रोकडे यांनी दिली.

कार्तिकी यात्रा कालावधीत शहरासह नदी पात्र, वाळवंट, पासष्ठ एकर परिसर ,पत्रा शेड, प्रदक्षिणा मार्ग, मंदीर परिसर, वाखरी पालखी तळ आदी ठिकाणच्या स्वच्छतेसाठी जवळपास एक हजार ५९८ स्वच्छता कर्मचाऱ्यांची नियुक्ती केली असून यामध्ये नगरपरिषद पंढरपूरचे ३५० कायम इतर १०० कर्मचारी तर जवळपास एक हजार ६८ हंगामी कर्मचारी व ८० सुपरवायझर तसेच नवी मुंबई महानगरपालिकेकडून ५० स्वच्छता कर्मचाऱ्यांचे पथक, जिल्ह्यातील इतर नगरपालिकेकडून जिल्हा प्रशासनामार्फत ३० पथके स्वच्छतेसाठी नेमण्यात आले आहेत.

प्रशासनामार्फत पाणीपुरवठ्याच्या सर्व यंत्रणा सुस्थितीत असल्याची खात्री करण्यात आली आहे. कार्तिकी यात्रा कालावधीत महिलांच्या स्वच्छतेच्या व सुरक्षिततेच्या दृष्टीने शहरामध्ये वेगळ्या शौचालयांची व्यवस्था करण्यात आलेली आहे.

**घंटागाड्या दोनवेळेस कचरा उचलणार**

शहरासह पासष्ठ एकर, वाळवंट, पत्राशेड आदी ठिकाणी जंतनाशक फवारणीसह ,मॅलेथॉन पावडर, ब्लिचिंग पावडर वेळोवेळी टाकण्यात येत आहे.घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत डम्पिंग ट्रॉल्या ,कॉम्पॅक्टर, कंटेनर, घंटागाडी, जेसीबी, जेटींग, सक्शन मशीन आदी वाहनांच्या माध्यमातून स्वच्छता व कचरा गोळा करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. यात्रा कालावधीत या घंटागाड्या सकाळी व रात्री अशा दोन वेळेस घरोघरीचा कचरा गोळा करतील.



**उघड्यावर शौच विधी करू नये यासाठी प्रतिबंधक पथके**

पत्राशेड, वाळवंट, पासष्ठ एकर परिसर, रेल्वे मैदान आदी ठिकाणी तात्पुरते शौचालय उभारण्यात आले आहेत. तात्पुरत्या शौचालयाच्या ठिकाणी पाण्याच्या टिपा ठेऊन त्यामध्ये टँकरद्वारे पाणी पुरवठा करण्यात येत आहे. वारकरी भाविकांनी उघड्यावर शौच विधी करू नये म्हणून ९ प्रतिबंधक पथकांची नेमणूक देखील करण्यात आली आहे.



**पाणी व ज्युस बॉटलचे केले जाणार वाटप**

भक्तीसागर, पत्राशेड, वाळवंट या ठिकाणी मोफत ६ लाख पाणी बॉटल व ३ लाख ज्युस बॉटल वाटपाचे नियोजन करण्यात आले आहे.शहरातील सुरक्षेसाठी १४३ सीसीटीव्ही, शहरातील मुख्य रस्त्यावर विद्युत रोषणाई, शहरातील १७ ठिकाणी वाहनतळ व्यवस्थेचे स्वच्छता व आवश्यक सुविधा उपलब्ध करण्यात आल्या आहेत.

**धोकायदायक इमारतींना नोटीसा**

सुरक्षिततेच्या दृष्टीने शहरातील जीर्ण व धोकादायक इमारतींना नोटीसा देण्यात आल्या असून, शहरातील व वाळवंटातील अतिक्रमणे काढण्यात आली आहेत. वाहनतळावरती दिशादर्शक फलक लावण्यात आले असून, आवश्यक ठिकाणी बॅरेकेटींग करण्यात येणार आहे. शहरातील सर्व प्रमुख रस्त्यासह प्रदक्षिणा मार्ग, दर्शन बारी येथील लाईट दुरुस्तीची कामे करण्यात आली आहेत. तसेच नदीपात्रात व घाटावर अखंडित व पुरेसा प्रकाश मिळावा यासाठी नदीपात्रात हायमास्ट पॉइंट्स, घाटांवर एलईडी दिवे चालू करण्यात आले आहेत.

**हिरकणी कक्षात सॅनिटरी नॅपकिनची सोय**

या बरोबरच वाळवंट परिसरात १५ ठिकाणी चेंजिंग रूमची व्यवस्था करण्यात आली आहे. नदी पात्र, वाळवंट परिसर, पासष्ठ एकर येथे हिरकणी कक्ष स्थापन करण्यात आले असून, कक्षाच्या ठिकाणी सॅनिटरी नॅपकिन वेडींग मशिन बसविण्यात आले आहेत. भाविकांना स्वच्छ पिण्याच्या पाण्याचा पुरवठा व्हावा यासाठी शहरातील सार्वजनिक बोअरवेल, हातपंप आदी ठिकाणच्या पाण्याची तपासणी करण्यात आली आहे.तसेच दररोज पिण्याच्या पाण्याची क्लोरीन टेस्ट केली जाणार आहे.

**सिंगलयुज प्लास्टिकचा वापर टाळावा**

यात्रा कालावधीमध्ये येणाऱ्या भाविकांनी शौचालयाचा वापर करावा, सिंगल युज प्लास्टिकचा वापर टाळावा तसेच आरोग्य सुव्यवस्थीत राहण्यासाठी नगरपालिका प्रशासनाच्या सूचनांचे पालन करावे, असे आवाहनही रोकडे यांनी यावेळी केले आहे.

# विशेष कर संकलन करणाऱ्या ६६ ग्रामपंचायतींचा गौरव

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३१ ऑक्टोबर-**

ग्रामपंचायतींना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्याच्या उद्देशाने मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानांतर्गत मिशन स्वाभिमान ही विशेष कर संकलन मोहीम जिल्हा परिषद सोलापूर मार्फत राबविण्यात येत आहे. या मोहिमेत उत्कृष्ठ करसंकलन केलेल्या ६६ ग्रामपंचायतीचा गौरव जिल्हा परिषदेच्या वतीने करण्यात आला.

जिल्हा परिषदेच्या यशवंतराव चव्हाण सभागृहात या समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांच्या मार्गदर्शनाखाली प्रत्येक तालुक्यातील ३००० पेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या तीन ग्रामपंचायती व ३००० पेक्षा कमी लोकसंख्या असलेल्या तीन ग्राम पंचायतींना अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप कोहिनकर, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत), सुर्यकांत भुजबळ, मुख्य लेखा व वित्त अधिकारी वर्ग (१) .मीनाक्षी वाकडे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (प्रशासन स्मिता पाटील यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.




या प्रसंगी कार्यकारी अभियंता नरेंद्र खराडे , पं.स उत्तर सोलापूर चे सहाय्यक गट विकास अधिकारी चे बी.सी.पाटील, जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक सचिन जाधव प्रमुख उपस्थित होते. या मोहिमेचा मुख्य उद्देश ग्रामपंचायतींच्या स्वारस्यपूर्ण सहभागातून १००% कर संकलन साध्य करणे असून, आर्थिक वर्ष २०२५-२६ मध्ये मार्च २०२६ अखेरपर्यंत हे उद्दिष्ट गाठण्याचा निर्धार आहे.विशेष कर संकलन दिन या मोहिमेअंतर्गत दिनांक १४ ऑक्टोबर २०२५ ते १७ ऑक्टोबर २०२५ या कालावधीत सोलापूर जिल्ह्यातील सर्व तालुक्यांमध्ये विशेष कर संकलन दिनाचे आयोजन करण्यात आले असल्याचे प्रास्तविक भाषणात उप मुख्य कार्यकारी अधिकारी सुर्यकांत भुजबळ यांनी सांगितले. या दिवशी अधिकाधिक कर संकलन करणाऱ्या कार्यक्रमास सन्मानीय सरपंच, ग्रामपंचायत अधिकारी व एक ग्राम पंचायत कर्मचारी यांना आमंत्रित करण्यात आले होते. मिशन स्वाभिमान कार्यक्रमाचे संचालन शिवराज राठोड, सुहास चेळेकर यांनी केले. आभार सचिन जाधव यांनी मानले. बाहेर गावी गेलेले, उच्च पदावर कार्यरत असणारे, वेगवेगळ्या क्षेत्रात नावलौकिक केलेल्या भूमि पुत्राकडून लोकवर्गणी जमा करून गावातील शाळा, अंगणवाडी, ग्रामपंचायत बळकटीकरण करणार असल्याचे भूजबळ यांनी सांगितले.




## सांगोला पेन्शनर संघटनेतर्फे सदस्यांचा सत्कार

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि. ३१ ऑक्टोबर-**

सांगोला तालुका पेन्शनर संघटनेतर्फे विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल व पुरस्कार प्राप्त झालेबद्दल संघटनेतील सदस्यांचा सत्कार सांगोला येथील कार्यालयात करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संघटनेचे अध्यक्ष वसंतराव दिघे होते. सुरुवातीस संघटनेतील मयत झालेल्या सदस्यांना श्रद्धांजली वाहण्यात आली. त्यानंतर शंकर सावंत, वसंतराव दिघे, प्रतिभा शेंडे, दिनकर घोडके, अभिमन्यू कांबळे, दत्तात्रय खामकर, रविराज शेटे या सदस्यांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी सत्कारमूर्ती व प्रभाकर कसबे, सिद्धेश्वर झाडबुके, जयवंतराव नागणे, अरुण वाघमोडे, बापूसाहेब लवटे, लक्ष्मण सावंत यांनी मनोगत व्यक्त केले. याप्रसंगी संघटनेचे गंगाराम इमडे, अंबिका शिंदे, एकनाथ शिंदे, शिवाजी काशीद, महादेव चौगुले, दत्तात्रय शिंदे, मच्छिंद्र मिसाळ, शिवाजी राजमाने, दत्तात्रय शास्त्रे, तात्या काबुगडे, जालिंदर केंगार, दिगंबर गायकवाड, अरुण टेळे, बाबासाहेब मोठे उपस्थित होते.

# अक्कलकोटमधील ग्रामपंचायतींना स्वतंत्र कार्यालयाची इमारत बांधण्यासाठी एक कोटी पाच लाख मंजूर

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि ३१ ऑक्टोबर-**

अक्कलकोट विधानसभा क्षेत्रातील पाच ग्रामपंचायतींना स्वतंत्र कार्यालयाची इमारत बांधण्यासाठी एक कोटी पाच लाख रुपये मंजूर करण्यात आल्याची माहिती अक्कलकोटचे आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी दिली आहे.



> ग्रामीण भागातील पायाभूत सुविधा आणखी मजबूत करण्यासाठी आणि गावचा कारभार करताना कोणतीही अडचण येऊ नये यासाठी पाठपुरावा करून सदर पाच ग्रामपंचायतींना एकूण एक कोटी पाच लाख रुपये मंजूर करण्यात आलेले आहेत.यामुळे या पाच ग्रामपंचायतिना आणखी चांगली सेवा देता येणार आहे.
>
> **- सचिन कल्याणशेट्टी**
> आमदार, अक्कलकोट

ज्या पाच गावांना इमारत बांधकामासाठी निधी मंजूर झालेले आहेत ती गावे आणि कंसात मंजूर झालेली रक्कम अशी आहे. अंकलगे (२० लाख),शावळ (२० लाख),भोसगे (२० लाख),संगदरी (२० लाख),तांदुळवाडी (२५ लाख). याबाबत अधिक माहिती अशी की राज्यातील ज्या ग्रामपंचायतींना स्वत:च्या कार्यालयासाठी स्वतंत्र इमारत नाही अशाग्रामपंचायतींना स्वतंत्र कार्यालयाची इमारत बांधण्यासाठी मा. बाळासाहेब ठाकरे स्मृती मातोश्री ग्रामपंचायत बांधणी योजना संदर्भात शासन निर्णयान्वये मंजूर करण्यात आली आहे. ग्रामीण भागासाठी पायाभूत सुविधांची असणारी आवश्यकता व त्यासाठी उपलब्ध असणाऱ्या स्त्रोतांची मर्यादा विचारात घेऊन शासन निर्णयान्वये मा. बाळासाहेब ठाकरे स्मृती मातोश्री ग्रामपंचायत बांधणी योजनेच्या निधी निकषात बदल करुन मुदतवाढ देण्यात आली होती. त्यानुसार संदर्भाधीन पत्रान्वये प्राप्त प्रस्तावाच्या अनुषंगाने अक्कलकोट विधानसभेतील ५ ग्रामपंचायतींना स्वत:चे कार्यालय बांधण्यास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. आमदार सचिन कल्याणशेट्टी यांच्या पाठपुराव्याने मंजूर झाल्याने या पाच ग्रामपंचायतींना गावाचा कारभार करण्यासाठी नजीकच्या काळात स्वतंत्र इमारत उपलब्ध होणार आहे.यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, पालकमंत्री तथा ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांचे सहकार्य लाभले असे कल्याणशेट्टी यांनी स्पष्ट केले.



## एमपीएससी परिक्षेतील रोहित क्षीरसागरचे यश अभिमानास्पद : सेठिया

**तभा वृत्तसेवा,**
**श्रीपूर, दि. ३१ ऑक्टोबर-**

श्रीपूर येथील शामराव क्षीरसागर या आमच्या कंपनीतील सामान्य कुटुंबातील कामगाराचा मुलगा रोहीत याने कर निरीक्षक (Tax Insperctors) परिक्षेत जिद्द, चिकाटी व प्रामाणिकपणाच्या जोरावर यश संपादन करून आई-वडिलांच्या कष्टाचे सार्थक केले हे आमच्या ब्रिमा सागर परिवारासाठी अभिमानास्पद असून सर्वांना प्रेरणा देणारे यश असल्याचे प्रतिपादन ब्रिमा सागर डिस्टलरीजचे व्यवस्थापकीय संचालक भरतकुमार सेठीया यांनी केले.

रोहीत क्षिरसागर याने मिळवलेल्या यशाबद्दल कामगारांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या सत्कार समारंभात भरतकुमार सेठीया बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कारखान्याचे जनरल मॅनेजर दिनकर बेंबळकर हे होते. याप्रसंगी रोहित क्षीरसागर, त्यांचे वडील शामराव क्षीरसागर आणि आई लक्ष्मी क्षीरसागर यांचा हार, शाल व श्रीफळ देऊन सन्मान करण्यात आला.

येवेळी डी. बी. कुलकर्णी यांनी आपल्या मनोगता मध्ये मेहनती व सामान्य कुटुंबातील तरुणांनीही चिकाटी ठेवल्यास मोठी स्वप्ने पूर्ण करता येतात, याचे रोहीत हे उत्तम उदाहरण असल्याचे सांगितले . याप्रसंगी डेप्युटी मॅनेजर नरेश पाठक, सतीश डिंगरे, निवृत्ती पवार, डी. बी. कुलकर्णी, सत्यजित पाटील, भागवत पारसे, सुरज शिंदे, गणेश विभुते, उमेश मिसाळ, बाळासाहेब पिसाळ, रोहन क्षीरसागर, राम क्षीरसागर, महादेव जाधव, दावल शिवशरण, नितीन वाघमारे, आण्णा शिंदे उपस्थित होते. सूत्रसंचालन महादेव जाधव यांनी केले तर आभार सत्यजित पाटील यांनी मानले.

# महाड येथील रिपब्लिकन पक्षाच्या वर्धापन दिनास बहुसंख्य कार्यकर्ते जाणार

### रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया आठवले माळशिरस तालुक्याची बैठक

**तभा वृत्तसेवा,**
**वेळापूर, दि. ३१ ऑक्टोबर-**

रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले)चे राष्ट्रीय अध्यक्ष व केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री डॉ. रामदास आठवले यांच्या आदेशानुसार आणि महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष लोकनेते राजा सरवदे यांच्या मार्गदर्शनाखाली माळशिरस तालुका अध्यक्ष मिलिंद सरतापे यांच्या अध्यक्षतेखाली माळशिरस तालुक्याची बैठक अकलूज येथील शासकीय विश्रामगृहात संपन्न झाली.

या बैठकीस युवक राज्य उपाध्यक्ष किरण धाईंजे, पश्चिम महाराष्ट्र संघटक एस. एम. गायकवाड, जिल्हा उपाध्यक्ष शामराव भोसले, जिल्हा सचिव रमेश धाईंजे, जिल्हा उपाध्यक्ष नितीन मोरे, तालुका सरचिटणीस मारुती खांडेकर, युवक तालुका अध्यक्ष दशरथ नवगिरे, अकलूज शहर अध्यक्ष अजित मोरे यांच्यासह प्रवीण साळवे, बापूसाहेब पोळके, संजय भोसले, अण्णासाहेब भोसले, भास्कर बनसोडे, सुनील ओव्हाळ, प्रकाश कांबळे, गणेश सावंत, गौतम वाघंबरे, दिनेश भोसले, असिफ शेख, संजय खरे, दीपक दळवी, भगवान भोसले उपस्थित होते.



बैठकीत ३ नोव्हेंबर रोजी ऐतिहासिक महाड क्रांतीभूमी येथे होणाऱ्या रिपाइंच्या ६८ व्या वर्धापन दिन कार्यक्रमास माळशिरस तालुक्यातून भव्य प्रमाणात उपस्थिती राहावी, असे आवाहन करण्यात आले. तसेच आगामी नगरपरिषद, जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर संघटन बळकट करणे, विभागनिहाय नियोजन आणि इच्छुक उमेदवारांची नावे निश्चित करण्याबाबत चर्चा करण्यात आली. दरम्यान, अकलूज नगरपरिषदेसह तालुक्यातील जि.प. व पंचायत समितीच्या आरक्षित जागांसह इतर योग्य जागांवरही रिपब्लिकन पक्ष आपला ठाम दावा करणार असल्याचे बैठकीत सांगण्यात आले. आभार अकलूज शहराध्यक्ष अजित मोरे यांनी मानले.

> आगामी स्थानिक स्वराज्य संस्थेमध्ये रिपब्लिकन पक्षाचा कार्यकर्ता निवडून जाण्यासाठी आम्ही सर्वतोपरी प्रयत्न करणार यावेळी पक्ष निवडणूक लढणार.
>
> - मिलिंद सरतापे,
> तालुकाध्यक्ष रि.पा.इं.

## महत्वाचे...



### एका वर्षात ५५ हजार लिटर दूध पुरवठा करणाऱ्या दूध उत्पादकाला मोटरसायकल भेट

सुस्ते, दि.३१ ऑक्टोबर-

एका वर्षात ५५ हजार लिटर दूध पुरवठा करणाऱ्या प्रथम क्रमांकाच्या दूध उत्पादकाला पुढील दिवाळीला मोटारसायकल, दोन नंबरला दूध काढण्याची मशीन व तिसऱ्या क्रमांकाला कडबा कुट्टी गिफ्ट म्हणून भेट देण्यात येईल, अशी घोषणा पंढरपूर तालुक्यातील सुस्ते येथील अंबिका दूध केंद्राचे चेअरमन प्रशांत चव्हाण यांनी केली. दीपावली सणाचे औचित्य साधून संस्थेला दूध पुरवठा करणाऱ्या सभासदाला येथील प्रगतशील बागायतदार श्रीकांत चव्हाण यांच्या हस्ते लाभांश वाटप करण्यात आला. यावेळी श्री. चव्हाण बोलत होते. ते म्हणाले की, आमच्या संस्थेवर विश्वास ठेवून दूध पुरवठा करणाऱ्या दूध उत्पादकांनी आतापर्यंत आमच्या संस्थेला मोठ्या प्रमाणावर चांगल्या क्वालिटीच्या दुधाचा पुरवठा केला आहे. सध्या सगळीकडे दूध खेचण्यासाठी दूध संस्थांमध्ये स्पर्धा लागल्या आहेत. पुढील काळातही आमच्या संस्थेला चांगल्या क्वालिटीचा दूध पुरवठा केल्यास आम्हीही दूध दरही चांगला देऊ व दिवाळीला देण्यात येणाऱ्या बोनसमध्येही वाढ करू. प्रारंभी या दूध संस्थेला २०२४-२५ या वर्षात सर्वाधिक दूध पुरवठा करून शिवाजी मधुकर पवार या दूध उत्पादकाने प्रथम क्रमांक मिळवला, गणेश गोपीनाथ चव्हाण यांनी द्वितीय तर गणेश मोरे यांनी तिसरा क्रमांक पटकावला आहे. यावेळी विनायक चव्हाण, गणपत चहाण,रामेश्वर चव्हाण,अक्षय कांबळे अर्जिक्य चव्हाण, विष्णू चव्हाण, गणेश गवळी, राजू कदम, बालाजी चव्हाण, तानाजी चव्हाण, संतोष चव्हाण, शुभम चव्हाण, रामचंद्र साहविठ्ठल, नवनाथ नागटीळक, धनाजी यावले, उमेश करपे, रमेश माने, अरुण शिंगण, नानासाहेब चव्हाण, किशन रनदिवे, रनजित चव्हाण,माऊली गायकवाड, अंबादास वायदंडे, प्रताप चव्हाण, कुमार गायकवाड, अनिकेत भोसले या दूध उत्पादकांनाही लाभांश वाटप करण्यात आला. बालाजी चव्हाण यांनी आभार मानले.





### रोहित आर्यला केसरकरांशी बोलायचे होते; ओलीस धरलेल्या आजी, तरुणाने कथन केला थरारक अनुभव

मुंबई, दि.३१ ऑक्टोबर-

रोहित आर्याने आम्हाला ओलीस धरल्यानंतर कोणतेही जबरदस्ती केली नव्हती. तो माझी शिक्षण मंत्री दीपक केसरकर यांच्याशी चर्चा करावयाची आहे, असे वारंवार सांगत होता, अशी माहिती या थरारक घटनेतील एक बळीत असलेल्या रोहन अहिरे या तरुणाने सांगितले. वेब सिरीजच्या कामासाठी आर्याला अहिरे हा सहकार्य करत होता,मात्र त्याने १७ मुले, आजीसह त्यालाही काही तास बंदी बनविले होते. पोलिसांच्या सांगण्यावरून त्याने शिडीच्या हॅलचा काचेचा दरवाजा दगड मारून फोडला होता. त्यामध्ये त्याच्या हातालाही दुखापत झाली आहे. गुरुवारी मुंबईतील पवई इथं महावीर क्लासिक इमारतीत १७ शाळकरी मुलांना रोहित आर्य या नावाच्या व्यक्तीनं ओलीस ठेवलं होतं. मुलांची सुटका करताना ओलीस ठेवलेल्या रोहित आर्या या माथेफिरूचा मुंबई पोलिसांनी एन्काउंटर केला. आरोपी रोहित आर्य हा मुलांवर हल्ला करण्याच्या तयारीत असताना सहायक पोलीस निरीक्षक अमोल वाघमारे यांनी त्याच्यावर गोळी झाडली, असं पोलिसांनी म्हटलं आहे. दरम्यान, पोलिसांनी तत्परता दाखवत खिडकीतून घुसत मुलांची सुखरुप सुटका केली. मात्र या प्रकरणानंतर काँग्रेसने याला सरकार जबाबदार असल्याचा आरोप केला आहे. दुसरीकडे घटना नेमकी कशी घडली, याबाबत ओलिसांनी घटनेचा थरारक अनुभव सांगितला आहे. अहिरे म्हणाला, २०१२-१३पासून मी काही वर्षे रोहित समवेत काम केले होते. त्याच्या एका चित्रपटाचे लाँचिंग २०१४मध्ये मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वर्षा निवासस्थानी करण्यात आले होते. त्यानंतर ५,६ वर्षे आम्ही संपर्कात नव्हतो, २,३ महिन्यापूर्वी त्याने वेबसिरीज बनवत असल्याचे सांगून त्यासाठी साह्य मागितले होते त्यानुसार आपण त्याच्या समवेत काम करत होतो. मात्र कालच्या घटनेपर्यंत तू असे काही करणार आहे याची आम्हाला थोडीही कल्पना नव्हती. त्याने आम्हाला बंदी बनवल्यानंतर त्याचा डाव लक्षात आला. तो पोलिसांशी बोलत असताना मी त्याला पुण्यातील एका आमदाराशी संपर्क साधून देतो, असे म्हणाले असता त्याने मला अडविले मला दीपक केसरकर यांच्याशीच बोलायचे आहे, त्यांनी माझे खूप नुकसान केले आहे. तू आत जा तुला माहित नाही, असे दडवल्याचे त्याने सांगितले.तर एक आजी म्हणाल्या "माझ्या नातीची शूटींग होती, म्हणून दररोज इथं यायची. २६ ऑक्टोबरपासून मी तिला घेऊन येत होते. यानंतर आम्हाला पहिल्या मजल्यावर बसवले. थोड्या वेळानं दंगा झाला म्हणून आम्हाला शंका आली. मुलांना कोंडून ठेवलंय हे कळल्यावर सगळेच घाबरले आणि रडायला लागले," तर "तळ मजल्यावर स्टोडीओमध्ये मोठमोठ्यानं आवाज येत होता. आम्हांला वाटलं की शूटींग सुरू असेल म्हणून दरवाजा बंद केला असावा. पण खालून रडण्याचा आवाज आल्यानंतर माझ्या आजीला कळलं की, काहीतरी झालं आहे. मग माझ्या आजीनं माझ्या आईला कॉल केला. नंतर पोलीस आले," असा अनुभव शूटींगसाठी गेलेल्या एका मुलीनं सांगितला आहे. घटनेला सरकार जबाबदार आहे, काँग्रेसची टीका : दुसरीकडे "रोहित आर्यनं केलेला प्रकार हा अतिशय निंदनीय आहे. मुलांना ओलीस ठेवलं याला राज्य सरकार जबाबदार आहे, सरकारनं त्याचं म्हणणं काय आहे, ऐकलं पाहिजे होतं. त्यामुळं या घटनेला राज्य सरकार जबाबदार आहे," अशी प्रतिक्रिया खासदार वर्षा गायकवाड यांनी दिली. यावेळी त्यांनी सरकारवर टीका केली आहे. तर "रोहित आर्य कोण आहे? ऑडिशनसाठी ज्याच्याकडं आपण पाठवतोय, ती व्यक्ती कोण आहे? याची खातरजमा करून पालकांनी मुलांना शूटींगसाठी पाठवलं पाहिजे. पालकांनी मुलांची काळजी घ्यायला हवी होती, पण तसं झाले नाही," अशी प्रतिक्रिया महाराष्ट्र नवनिर्माण सेना, चित्रपट सेनेचे अध्यक्ष अमेय खोपकर यांनी दिली आहे.

# सोलापूर महापालिका निवडणूक; ११ नोव्हेंबरला आरक्षण सोडत

### हरकती व सूचनांसाठी १७ ते २४ नोव्हेंबरपर्यंत मुदत



तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि. ३१ ऑक्टोबर-

सोलापूर महापालिका सार्वत्रिक निवडणुकीसाठी मंगळवार दि. ११ नोव्हेंबर २०२५ रोजी सकाळी ९.३० वाजता हुतात्मा स्मृती मंदिर, सोलापूर येथे महिलांचे आरक्षण सोडतीचा कार्यक्रम होणार आहे. या प्रारूप आरक्षण सोडती नंतर हरकती व सूचना म गविण्यासाठी दि. १७ नोव्हेंबर २०२५ ते २४ नोव्हेंबर २०२५ पर्यंत अंतिम मुदत आहे

महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५ अंतर्गत दि. १३ ऑक्टोबर २०२५ रोजी अंतिम प्रभाग रचना प्रसिद्ध करण्यात आलेली आहे. आता राज्य निवडणूक आयोगाकडून प्रभाग रचना आरक्षण सोडतीचा कार्यक्रम जाहीर झालेला आहे. यामध्ये दि. ३० ऑक्टोबर २०२५ ते ४ नोव्हेंबर २०२५ पर्यंत आरक्षित जागांची संख्या निश्चित करुन त्यास राज्य निवडणूक आयोगाची मान्यता मि ळण्यासाठी सोलापूर महानगरपालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांच्या कडून प्रस्ताव सादर करण्यात येणार आहे. त्यानंतर दि. ८ नोव्हेंबर रोजी आरक्षण सोडतीची जाहिर सूचना वृत्तपत्रात प्रसिद्ध करण्यात येणार असून दि. ११ नोव्हेंबर २०२५ रोजी सकाळी ९.३० वाजता हुतात्मा स्मृती मंदीर, सोलापूर येथे महिलांचे आरक्षण सोडतीचा कार्यक्रम घेण्यात येणार आहे. प्रारूप आरक्षण सोडती नंतर प्रारुप आरक्षणावर हरकती व सूचना मागविण्यासाठी विहित नमुन्यात दि. १७ नोव्हेंबर २०२५ ते २४ नोव्हेंबर २०२५ पर्यंत अंतिम मुदत आहे. प्राप्त झालेल्या हरकती व सूचनांवर विचार करुन महानगरपालिका आयुक्त हे दि. २५ नोव्हेंबर २०२५ ते दि. १ डिसेंबर २०२५ या कालावधीत निर्णय घेणार असून अंतिम आरक्षण विहित नमुन्यात शासन राजपत्रात सादर करण्याचा दि. २ डिसेंबर २०२५ असा आहे.

अनुसूचित जाती, अनुसूचित जम तीकरीता, नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गाकरिता आरक्षित प्रभाग निश्चित कशापध्दतीने करण्यात येणार आहे. याची माहिती सोलापूर महानगरपालिकेच्या https://www.solapurcorporation.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्दी करण्यात आलेली आहे, असे महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी म्हटले आहे.



# जिल्हा व्यवसाय सुधारणेसाठी जिल्हाधिकाऱ्यांना जादा अधिकार

**मुख्यमंत्री फडणवीस यांनी 'ईज ऑफ डुईंग बिझिनेस' संदर्भात उद्योग विभागाचा घेतला आढावा**

तभा वृत्तसेवा। विशेष प्रतिनिधी
मुंबई, दि. ३१ ऑक्टोबर-

राज्यात 'जिल्हा व्यवसाय सुधारणा कृती योजनातर्गत १५४ सुधारणांचा समावेश असलेल्या या उपक्रमाची अंमलबजावणी पुढील वर्षाच्या १४ ऑगस्टपर्यंत केली जाणार आहे. त्यानंतर विभागीय बैठकांचे आयोजन करण्यात येणार असून राज्यातील प्रत्येक जिल्हाधिकाऱ्यांना अधिक अधिकार प्रदान करण्यात येणार असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

सह्याद्री अतिथीगृह येथे त्यांच्या अध्यक्षतेखाली 'इज ऑफ डुईंग बिझिनेस' संदर्भात आढावा बैठक झाली. यावेळी मुख्य सचिव राजेशकुमार, प्रशासनातील वरिष्ठ अधिकारी तर दूरदृश्यप्रणालीद्वारे राज्यातील विभागीय आयुक्त आणि जिल्हाधिकारी उपस्थित होते. मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, राज्याच्या औद्योगिक विकासाला गती देण्यासाठी ६ विभागीय समित्या स्थापन करण्यात आल्या असून, त्या ३१ डिसेंबर २०२५ पूर्वी आपले अहवाल सादर करतील.



# जिजाऊ गुरुकुलला माजी आमदार दत्तात्रय सावंतांची भेट

तभा वृत्तसेवा,
बार्शी, दि. ३१ ऑक्टोबर-

पुणे विभाग शिक्षक मतदारसंघाचे आमदार दत्तात्रय सावंत यांनी जिजाऊ गुरुकुल खांडवी येथे भेट देऊन विद्यालयातील विविध उपक्रमांची पाहणी केली. भेटीदरम्यान जिजाऊ गुरुकुलच्या वतीने दत्तात्रय सावंत यांचा सन्मान करण्यात आला.

कार्यक्रमाच्या प्रारंभी संस्थेचे डायरेक्टर संदेश कदम यांनी प्रास्ताविक करताना जिजाऊ गुरुकुलमध्ये राबविण्यात येणाऱ्या विविध विद्यार्थी केंद्रित उपक्रमांची तसेच संस्थेच्या भविष्यातील नियोजनाची सविस्तर माहिती दिली. संस्थापक अध्यक्ष संभाजी घाडगे यांनी आपल्या भाषणात स्वयं अर्थसाहित शाळांना भेडसावणाऱ्या अडचणी तसेच सरकारी सहकार्याची आवश्यकता या विषयावर आपले विचार मांडले. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी राबविण्यात येणाऱ्या नावीन्यपूर्ण उपक्रमांचे कौतुक केले. जिजाऊ गुरुकुलसारख्या संस्थांनी ग्रामीण भागात शिक्षणाचा दर्जा उंचावण्यात महत्त्वाची भूमिका निभावली आहे. भविष्यात या संस्थेच्या प्रगतीसाठी मी खंबीरपणे उभा राहीन, असा विश्वास सावंत यांनी व्यक्त केला. याप्रसंगी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष संभाजी घाडगे, संस्थेचे प्रशासकीय अधिकारी किशोर कदम, डायरेक्टर संदेश कदम आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक वैशाली क्षीरसागर यांनी केले.सुवर्णा देवकर यांनी आभार मानले.

### आशिया चषकाचा मुद्दा उपस्थित होणार

मुंबई, ३१ ऑक्टोबर

आशिया चषक विजेत्या भारतीय संघाच्या मुंबईतील बीसीसीआयच्या मुख्यालयात एक किंवा दोन दिवसांत पोहोचेल अशी बीसीसीआयला आशा आहे, परंतु जर हीच अडचण कायम राहिली तर बीसीसीआय ४ नोव्हेंबर रोजी होणाऱ्या आयसीसीच्या बैठकीत हा विषय उपस्थित करू शकते.

दुबई येथे झालेल्या अंतिम सामन्यात भारताने कट्टर प्रतिस्पर्धी पाकिस्तानला पाच गड्यांनी पराभूत करून आशिया चषक जिंकला, परंतु पाकिस्तानचे गृहमंत्री मोहसीन नक्वी यांच्याकडून चषक स्विकारण्यास भारतीय खेळाडूंनी नकार दिला. नक्वी हे आशिया क्रिकेट परिषदेचे आणि पाकिस्तान क्रिकेट मंडळाचे अध्यक्ष देखील आहेत.दोन्ही देशांमधील संघर्षामुळे पाकिस्तानच्या सम कक्षांशी हस्तांदोलन करण्यास नकार दिल्यानंतर हे घडले.

# ठाकरेंची मुलुख मैदानी तोफेला लागला ब्रेक

### तब्येतीच्या कारणास्तव संजय राऊत दोन महिने अलिप्त



तभा वृत्तसेवा,
मुंबई, दि. ३१ ऑक्टोबर-

राज्यात महाविकास आघाडी अस्तित्वात आल्यापासून एकहाती किल्ला लढविणाऱ्या त्यातही विशेषत: उद्धव ठाकरे गटाची भूमिका आक्रमकपणे मांडीत विरोधकांवर हल्ला चढविणाऱ्या खा. संजय राऊत आता प्रकृतीच्या कारणास्तव दोन महिने सार्वजनिक कार्यक्रमातून अलिप्त राहणार आहेत. पुढील दोन महिने पूर्णपणे उपचारात व्यस्त राहणार असून कोणालाही भेटू शकणार नाही. नव्या वर्षात नव्या जोमाने भेटू, असे भावनिक आवाहन करून त्यांनी शुक्रवारी आपल्या आजाराबाबत कार्यकर्ते व हितचिंतकांना पत्र लिहून ही माहिती दिली आहे.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीची धामधूम व निवडणूक आयोगाच्या ढिसाळ कारभाराविरोधात विरोधक संघटित होत आहेत, अशावेळी ही मुलुख मैदानी तोफ काही काळासाठी थंडावणार असल्याने महाविकास आघाडीला मोठा धक्का बसला आहे. खासदार संजय राऊत दररोज सकाळी पत्रकार परिषद घेऊन सत्ताधाऱ्यांची डोकेदुखी वाढवणारे संजय राऊत यांना आज रुग्णालयात दाखल करण्यात आले. त्यांची तब्येत अचानक बिघडल्याचे त्यांनी सोशल मीडियाच्या माध्यमातून कळविले.

कार्यकर्त्यांना उद्देशून त्यांनी लिहिलेल्या पत्रात म्हटले आहे की, "सर्व मित्र परिवार आणि कार्यकर्त्यांनी माझ्यावर कायम विश्वास ठेवला आणि प्रेम केलं, पण सध्या अचानक माझ्या प्रकृतीत काही गंभीर स्वरूपाचे बिघाड झाल्याचं समोर आले असून उपचार सुरू आहेत, मी यातून लवकरच बाहेर पडेन. वैद्यकीय सल्ल्यानुसार मला बाहेर जाणं व गर्दीत मि सळणं यावर निर्बंध घालण्यात आले आहेत. त्यास नाईलाज आहे. मला खात्री आहे की, मी ठणठणीत बरा होऊन साधारणत: नवीन वर्षात आपल्या भेटीस येईन. आपले प्रेम आणि आशीर्वाद असेच राहू द्या" असे ही म्हटले आहे. त्यामुळे विरोधी पक्षांकडून १ नोव्हेंबर निवडणूक आयोगावर काढण्यात येणाऱ्या सत्याच्या मोर्चात पण संजय राऊत उपस्थित राहू शकणार नाहीत.

**पंतप्रधान मोदींचे ट्वीट :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी राऊतांच्या चांगल्या आरोग्यासाठी सोशल मीडियाच्या माध्यमातून शुभेच्छा दिल्या आहेत. त्यात म्हटले आहे की, "संजय राउत जी, तुम्हच्या प्रकृतीत लवकर सुधारणा व्हावी. तुमच्या उत्तम आरोग्यासाठी प्रार्थना करतो".

# निवडणूक आयोगाविरुद्ध आज मुंबईत सत्याचा मोर्चा!

### ईव्हीएम, बोगस मतदारा विरुद्ध विरोधक एकवटले

तभा वृत्तसेवा,
मुंबई, दि. ३१ ऑक्टोबर-

ईव्हीएम मशीन घोटाळ्याबरोबर राज्यातील मतदारयाद्यांतील घोटाळा, दुबार आणि बोगस मतदारांविरोधात महाविकास आघाडी, मनसे आणि इतर सर्वपक्षीय संघटना शनिवारी (१ नोव्हेंबर) मुंबईत राज्य निवडणूक आयोगाविरोधात सत्याचा मोर्चा निघणार आहे.

दुपारी एक वाजता फॅशन स्ट्रीट येथून मोर्चाला सुरवात होणार असून त्यामध्ये जेष्ठ नेते शरद पवार यांच्यासह उद्धव व राज ठाकरे, काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्यासह महाविकास आघाडीतील सर्व प्रमुख नेते सहभागी होणार आहेत.

आयोगाच्या पक्षपाती कारभाराविरोधात सर्वजण एकवटले असल्याचे यातून दाखवले जाणारा असून जोपर्यंत मतदार याद्या सदोष होत नाही तोपर्यंत स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका न घेण्याची मागणी त्यांच्याकडून करण्यात येत आहे.

**आयोगावर दबाव वाढवण्याची रणनीती**

या मोर्चात शिवसेना (ठाकरे गट), राष्ट्रवादी (शरद पवार गट), काँग्रेस आणि मनसेचा सहभाग आहे. महाविकास आघाडी आणि मनसे यांची एकच खी मागणी आहे की, "जोपर्यंत मतदार याद्या स्वच्छ होत नाहीत, तोपर्यंत राज्यात निवडणूक घेऊ नयेत." मोर्चानंतर सर्व विरोधी पक्षांकडून एकत्रित घोषणा केली जाणार आहे. राज्य निवडणूक आयोगाने मतदार याद्यांमधील बोगस मतदार वगळेपर्यंत निवडणुका घेऊ नयेत.

**न्यायालयात याचिका दाखल करणार**

विरोधी पक्षांकडून या मुद्द्यावर आता न्यायालयीन लढाई उभी करण्याची तयारी सुरू आहे. ठाकरे गटाच्या सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, "म तदार याद्यांतील गोंधळ आणि बोगस मतदारांचा मुद्दा न्यायालयात नेऊन याचिका दाखल केली जाणार आहे." तसेच, जोपर्यंत राज्य निवडणूक आयोग हे घोळ दूर करत नाही, तोपर्यंत निवडणुका घेऊ नयेत, अशी मागणी कोर्टात जाणार आहे. मागील सर्वपक्षीय बैठकीत तीन ते चार पर्यायांवर चर्चा झाली, त्यामध्ये न्यायालयात जाणं, निवडणुकांवर बहिष्कार टाकणं आणि निवडणूक आयोगावर सार्वजनिक दबाव आणणं हे पर्याय चर्चेत आले.

# फलटण प्रकरणातील मोबाईल चॅटिंगमधून भयानक 'ट्रँगल' : मंत्री जयकुमार गोरे

सातारा, दि. ३१ ऑक्टोबर-

फलटण येथील डॉक्टर म हिलेच्या आत्महत्येमुळे राज्यात जोरदार राजकारण तापले आहे. विरोधकांकडून या प्रकरणावरून भाजपचे माजी खासदार रणजितसिंह निंबाळकर यांचे नाव घेत आरोप-प्रत्यारोपांच्या फैरी सुरू आहेत. विरोधकांच्या या भूमिकेवर राज्याचे मंत्री जयकुमार गोरे यांनी तीव्र शब्दांत नाराजी व्यक्त केली आहे.

त्यांनी स्पष्ट केले की, आम्ही त्या मृत भगिनीचा आदर करतो, परंतु आत्महत्या प्रकरणातील मोबाईल चॅटिंगमधून जो 'ट्रँगल' समोर आला आहे, तो सार्वजनिकरीत्या लोकांसमोर आणण्यासारखा नाही. त्याम ळे, कुणीही या संवेदनशील विषयावरून राजकारण करू नये, असे गोरे यांनी विरोधकांना उद्देशून म्हटले आहे. या प्रकरणाच्या तपासावर शंका उपस्थित करणाऱ्या विरोधकांना जयकुमार गोरे यांनी चोख उत्तर दिले. ते म्हणाले की, या डॉक्टर महिलेला न्याय मिळालाच पाहिजे आणि त्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी योग्य ते निर्देश तपास यंत्रणांना दिले आहेत. असे असूनही विरोधक सातत्याने तपास यंत्रणेवर शंका उपस्थित करून वातावरण गढूळ करत आहेत. या घटनेमध्ये सर्व पुरावे उपलब्ध आहेत आणि त्या आधारावरच निष्पक्ष तपास पूर्ण केला जाईल, असे आश्वासन त्यांनी दिले.



जयकुमार गोरे यांनी विश्वास व्यक्त केला की, या आत्म हत्येप्रकरणी कायद्याचे पालन केले जाईल. त्यांनी ठामपणे सांगितले की, सर्व उपलब्ध पुराव्यांच्या आधारावर तपास पूर्ण होईल आणि न्यायालय दोषी आरोपींना निश्चितपणे शिक्षा देईल.

**वेगळाच 'ट्रँगल'** : जयकुमार गोरे म्हणाले, मृत्यू पावलेली संपदा मुंडे आणि दोन आरोपी यांचे मोबाइल पाहिल्यानंतर परिस्थिती खूप गंभीर आणि वेगळी आहे. तिन्ही मोबाइल बघितल्यानंतर जो ट्रँगल समोर येत आहे तो खूप भयानक आहे आणि ती परिस्थिती लोकांसमोर आणण्यासारखी नाही. आता या मृत्यूवर सुरू असलेले राजकारण थांबवावे आणि वस्तुदर्शक सुरू असलेला तपास होऊन न्यायालयातून आरोपींना शिक्षा मिळू दे.

**निंबाळकरांना टोला** : रामराजे निंबाळकरांवर टोला लगावताना जयकुमार गोरे म्हणाले, वस्तुस्थिती सोडून संपदा मुंडे हिच्या मृत्यूचे राजकारण करीत तिसऱ्याच कोणाचे तरी नाव घेत आकांडतांडव करण्याचे काम स्थानिक नेते करीत आहेत.

# 'स्वच्छता मॉनिटर प्रकल्पाला यंदा मंजुरी नसल्याचा शिक्षण विभागाचा खुलासा

### रोहित आर्य प्रकरणात नवे वळण

तभा वृत्तसेवा,
मुंबई, दि. ३१ ऑक्टोबर-

पवईतल्या इमारतीत १७ लहान मुलांना ओलीस ठेवणाऱ्या रोहित आर्य प्रकरणात आता एक नवीन वळण आलं आहे. सरकारकडील थकीत दोन कोटींच्या बिलासाठी आर्यने हे कृत्य केले असल्याचे व्हिडिओतून सांगितले असले तरी शिक्षण विभागाने मात्र त्याचा इन्कार केला आहे.

पोलिसांच्या एन्काउंटर मध्ये मारला गेलेल्या रोहितने 'स्वच्छता मॉनिटर प्रकल्पाच्या पैशांसाठी याआधी अनेक वेळा आंदोलनं केली होती, अशी माहिती समोर येत आहे. त्या आंदोलनांच्या काळात तत्कालीन शालेय शिक्षणमंत्री दीपक केसरकर वादाच्या केंद्रस्थानी आले. आहे. याच प्रकल्पाचे पैसे मिळावेत, यासाठी आर्यने वेळोवेळी प्रयत्न केल्याचं सांगितलं जात आहे. यंदा प्रकल्पाला मंजुरी नाही : "मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा" या उपक्रमाअंतर्गत सुरू केलेला स्वच्छता मॉनिटर प्रकल्प याला महाराष्ट्राच्या शालेय शिक्षण विभागाने प्रथम २७ सप्टेंबर २०२२ रोजी आणि पुन्हा ३० जून २०२३ रोजी मान्यता दिली होती. परंतु, २०२४२५ या शैक्षणिक वर्षासाठी या प्रकल्पाला कोणतीही नवी मंजुरी दिली गेलेली नाही, असं शिक्षण विभागाने स्पष्ट केले आहे. या निर्णयामुळे शाळांमधील स्वच्छतेची गुणांकन व्यवस्था, स्वच्छतेचे मॉनिटर आणि शाळांना मिळणारी बक्षिसं सध्या बंद आहेत. हा उपक्रम नेमका काय होता? : "मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा" उपक्रमाअंतर्गत सुरू केलेला स्वच्छता मॉनिटर प्रकल्प हा शाळांमधील स्वच्छतेच्या बाबतीत जागरूकता वाढवण्यासाठी राबवला जात होता. या प्रकल्पांतर्गत शाळांमध्ये काही विद्यार्थी किंवा विभागांना "स्वच्छता मॉनिटर" म्हणून नेम ण्यात येत होतं. त्यांचा मुख्य कार्य होता, शाळेतील स्वच्छतेच्या नियमांचं पालन सुनिश्चित करणं, जसं की शाळेत थुंकणं, कचरा टाकणं किंवा घाण करणं यावर नियंत्रण ठेवणं.या प्रकल्पाचा उद्देश विद्यार्थ्यांमध्ये स्वच्छतेच्या बाबतीत जागरूकता निर्माण करणं आणि "बघूनही दुर्लक्ष न करणं" या सवयीचा प्रचार करणे होता. लेट्स चेंज या ब्रिदवाक्याखाली हा प्रकल्प अप्सरा मीडिया एंटरटेनमेंट नेटवर्क या कंपनीमार्फत राबवला जात होता. तसेच, शाळांकडून ५०० ते २,००० रुपये नोंदणी शुल्क घेतल्याची माहिती काही शिक्षकांनी नाव न सांगण्याच्या अटीवर सांगितली. या उपक्रमाला प्रथम २७ सप्टेंबर २०२२ रोजी आणि पुन्हा ३० जून २०२३ रोजी मान्यता देण्यात आली होती. ही मान्यता सीएसआर निधीमार्फत होती आणि त्या टप्प्यात एकूण ९.९ लाख देयकाची नोंद आहे. २०२३२४ मध्ये फेज -२ अंतर्गत २ कोटींचे बजेट मंजूर झालं, पण त्याची अंमलबजावणी झाली नाही. रोहित आर्यला हटवल्यानंतर काय घडलं? : या प्रकल्पाचे संचालक रोहित आर्य यांचं नाव काही गंभीर प्रकरणात आल्यानंतर शिक्षण विभागानं पुढील वर्षासाठीची मंजुरी थांबवली. २०२४२५ साठी मंजुरी नाकारताना विभागानं शाळांकडून घेतलेली फीस परत करण्याच्या सूचना दिल्या आणि संस्थेकडून अपेक्षित कागदपत्रं न आल्यानं पुढील कारवाईही थांबवण्यात आली. परिणामी "स्वच्छता मॉनिटर" प्रकल्प सध्या अनधिकृत स्थितीत आहे. तसेच काल झालेल्या आर्य प्रकरणानंतर शिक्षण विभागानं या वर्षी संबंधित प्रकल्पाला मंजुरी दिली नव्हती, असा खुलासा केला आहे.

**पोलिसांकडून हत्या : ॲड. सातपुते**

रोहित आर्या हा पोलिसांचा एन्काऊंटर मध्ये मारला गेला असल्याने आता त्याबाबत ही संशय उपस्थित केला जात आहे. त्याने केलेले हे कृत्य चुकीचे असले तरीही त्याला छातीत गोळ्या घालण्याऐवजी गोळी मारून जखमी करता आले असते, त्यामुळे पोलिसांनी त्याची हत्या केली आहे असा आरोप ज्येष्ठ वकील नितीन सातपुते यांनी केला आहे याबाबत पोलीस व संबंधित नेत्यांवर गुन्हा दाखल करण्याची त्यांनी मागणी केली. सरकारकडून कारवाई न झाल्यास त्याविरुद्ध याचिका दाखल करणार असल्याचाही इशारा त्यांनी दिला आहे. विरोधी पक्षाने ही या एन्काउंटर बाबत नाराजी व्यक्त करीत महायुती सरकारला जबाबदार धरले आहे. हजारो कोटींची ठेकेदारांची बिले प्रलंबित असल्यानेत्यांच्याकडून असे कृत्य पुन्हा केला धोका निर्माण झाला असल्याचे त्यांनी सांगितले

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा,
छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली,
जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर
(कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## अग्रलेख...

# आंदोलन संपले, आव्हाने कायम

भारत हा कृषिप्रधान देश म्हणून ओळखला जातो. आजही देशातील जवळपास अर्धी अधिक टक्के लोकसंख्या शेती आणि शेतीशी संबंधित उद्योगावर अवलंबून आहे. शेतकरी हा जगाचा अन्नदाता म्हणवला जातो. शेतकऱ्याने शेतात कष्ट करून धान्य पिकवले नाही तर सर्वांनाच उपाशी राहावे लागेल. दुसऱ्याचे पोट भरण्यासाठी शेतकरी स्वत: अनेकवेळा अर्धपोटी वा उपाशी राहतो. शेतकऱ्याला त्याच्या कष्टाचा आणि मेहनतीचा योग्य मोबदला मिळत नाही, हे उघड सत्य आहे. शेती हा बहुधा एकमेव असा व्यवसाय असावा, ज्यात शेतकऱ्याला आपल्या उत्पादनाचा भाव ठरवता येत नाही. शेतकऱ्यांच्या उत्पादनाचा भाव सरकार वा व्यापारी ठरवत असतात. त्यामुळेच शेतकऱ्यांच्या उत्पादनाला योग्य भाव मिळत नाही. त्यातून शेतकरी कर्जबाजारी होतो, त्याच्यावर आत्महत्येची वेळ येते. देशातील सर्वांत जास्त आत्महत्या शेतकऱ्यांच्या आहेत. तरीही हा वर्ग शांतपणे धरणी मातेच्या पोटात बियाणे पेरत असतो आणि अख्ख्या जगासाठी पिकवत असतो. क्वचितच त्याची अस्वस्थता बाहेर पडते आणि ती तशी नुकतीच बच्चू कडू यांच्या नेतृत्वात झालेल्या आंदोलनातून व्यक्त झाली. शेतकऱ्यांना न्याय मिळवून देण्यासाठी आतापर्यंत देशात अनेक आंदोलने झालीत. विविध राजकीय पक्षांनीही शेतकऱ्यांना न्याय मिळवून देण्यासाठी आंदोलने केलीत. महाराष्ट्रातील सर्वांत मोठे शेतकरी आंदोलन शरद जोशी यांचे होते. एकेकाळी शरद जोशी यांची शेतकरी आंदोलने महाराष्ट्रातच नाही तर देशात गाजली होती. जगानेही त्यांच्या आंदोलनांची दखल घेतली होती. शरद जोशींच्या आंदोलनाने शेतकऱ्याच्या प्रश्नांची राज्यच नाही तर केंद्र सरकारलाही दखल घ्यावी लागली. शेतकऱ्यांच्या कर्जमुक्तीची तसेच हमीभावाची मागणी देशात सर्वप्रथम शरद जोशी यांनी केली. शेतकऱ्यांच्या उत्पादनासाठी हमीभावाची योजना सरकारला आणावी लागली. शरद जोशी यांनी महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना संघटित केले. त्यांच्या आंदोलनामुळे शेतकऱ्यांचे सर्व प्रश्न सुटले असे म्हणणे धाडसाचे असले तरी ते सुटण्याचा मार्ग मोकळा झाला, यात शंका नाही. शरद जोशी यांची सर्व आंदोलने शांततापूर्ण तसेच अहिंसक होती. त्यांच्या आंदोलनाने सर्वसामान्य जनतेला कधी वेठीस धरले नाही, त्यांना त्रास होऊ दिला नाही. काही वर्षांपूर्वी दिल्लीच्या सीमेवर झालेल्या आंदोलनांची आणि शरद जोशी यांच्या आंदोलनाची तुलना होऊ शकत नाही. भारतीय किसान युनियनच्या टिकैत बंधूंच्या नेतृत्वात झालेल्या या आंदोलनात शेतकऱ्यांच्या वेषात खलिस्तानवादी घुसले, अशी चर्चा त्यावेळी झाली होती. शेतकऱ्यांसाठी मोदी सरकारने आणलेल्या तीन कायद्यांच्या विरोधात हे आंदोलन होते. खरे म्हणजे मोदी सरकारने आणलेले तिन्ही कायदे शेतकऱ्यांच्या दीर्घकालीन हिताचा विचार करून तयार करण्यात आले होते. पण टिकैत आणि देशातील अन्य शेतकरी नेत्यांनी शेतकऱ्यांच्या दीर्घकालीन हिताचा विचार करण्याऐवजी अल्पकालीन हिताचा विचार केला. परिणामी मोदी सरकारला हे तीनही कायदे मागे घ्यावे लागले. त्यामुळे सरकारचे काही नुकसान झाले नाही, पण देशातील शेतकऱ्यांचे कायमस्वरूपी नुकसान झाले. शेतकरी नेत्यांनी आपल्या आडमुठ्या भूमिकेमुळे देशातील शेतकऱ्यांच्या पायावर धोंडा पाडून घेतला.

मुळात कोणतेही आंदोलन सुरू करताना मागण्यांसोबत आपल्याला कधी आणि कुठे थांबायचे, याचा विचार होणे गरजेचे असते. आपल्याला कधी आणि कुठे थांबायचे हे माहीत नसेल तर आंदोलन दीर्घकाळ चालविले जाते आणि त्यातून शेतकऱ्यांच्या पदरात त्रास, ससेहोलपट आणि मनस्तापाशिवाय काही पडत नाही. दिल्ली सीमेवर झालेले शेतकऱ्यांचे आंदोलन हे याच प्रकारातील होते. या पृष्ठभूमीवर महाराष्ट्रात नुकत्याच प्रहार जनशक्ती पक्षाचे नेते ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू यांच्या नेतृत्वात झालेल्या शेतकरी आंदोलनाकडे पाहावे लागेल. सरसकट कर्जमुक्ती आणि शेतकऱ्यांचा सात-बारा कोरा करावा, या आणि अन्य मागण्यांसाठी बच्चू कडू यांनी महाएल्गार आंदोलन पुकारले होते. शेतकऱ्यांचे आंदोलन विदर्भ तसेच महाराष्ट्राला नवे नाही. पण या आंदोलनामुळे कधी नव्हे ते नागपुरातून जाणारे चारही राष्ट्रीय महामार्ग ठप्प झाले. २७ किलोमीटरपर्यंतचा जाम लागला. मुळात बच्चू कडू हे आक्रमक आहेत. आपल्या अभिनव आंदोलनांसाठी ते ओळखले जातात. त्यांनी आतापर्यंत केलेली सर्व आंदोलने अभिनव म्हणावी अशी होती. त्यामुळेच ती गाजलीही. बच्चू कडू यांचे यावेळचे शेतकरी आंदोलनही गाजले. या आंदोलनाचे वैशिष्ट्य म्हणजे सर्व यंत्रणांनी समन्वयाची भूमिका घेतल्यामुळे हे आंदोलन चिघळले नाही आणि त्यावर शांततापूर्ण तसेच सर्वमान्य असा तोडगा निघाला. याचे श्रेय महाराष्ट्राचे संवेदनशील मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि त्यांच्या सहकाऱ्यांना द्यावे लागेल. मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाचे न्या. रजनीश व्यास यांनी घेतलेल्या न्यायोचित भूमिकेमुळे देखील सर्वसामान्य जनतेला मोठा दिलासा मिळाला. आंदोलन शांततेने संपण्याचे श्रेय आंदोलनाचे नेते बच्चू कडू व त्यांच्या सहकाऱ्यांनाही द्यावे लागेल. कडू यांनी टिकैत बंधूंसारखी ताठर भूमिका घेतली असती, तर काय झाले असते, याची कल्पना करवत नाही. कोणतेही आंदोलन चिघळले तर त्याची परिणती अश्रुधूर, लाठीहल्ला आणि गोळीबारात होते. यात सरकारचे नाही तर आंदोलकांचे सर्वांत जास्त नुकसान होते. राजकारणात काय बोलावे यापेक्षा काय बोलू नये, हे ज्याला समजते, तो खरा नेता मानला जातो. त्याचप्रमाणे आंदोलन करणाऱ्या नेत्याला कुठे आणि केव्हा थांबावे, हे समजते, त्याला नुसता आंदोलनाचा नेताच नाही तर खऱ्या अर्थाने हितचिंतक म्हणावे लागते. आपल्या मागण्या मान्य करून घेण्यासाठी आंदोलक आंदोलन करत असतात. कोणतेही आंदोलन लाठीमारात आणि गोळीबारात जखमी होण्यासाठी तसेच प्राण गमावण्यासाठी नसतेच. या आंदोलनात बच्चू कडू यांनी आपला मुद्दा व्यक्तिगत प्रतिष्ठेचा केला नाही. सरकारने आंदोलनस्थळी चर्चेसाठी यावे, असा आग्रह धरला नाही. सरकारच्या निमंत्रणावरून कडू आणि त्यांचे सर्व सहकारी चर्चेसाठी मुंबईला गेले. शेतकऱ्यांच्या प्रश्नावर देवेंद्र फडणवीस यांची भूमिका नेहमीच त्यांना न्याय देण्याची आणि शेतकऱ्यांच्या डोळ्यातील अश्रू पुसण्याची राहिली. याचा प्रत्यय राज्यातील अतिवृष्टीच्या वेळी आला. अलिकडच्या अतिवृष्टीत फार मोठा तडाखा राज्यातील शेतकऱ्यांना बसला होता. त्यावेळी शेतकऱ्यांच्या मदतीसाठी फडणवीस यांनी दिल्लीत धाव घेत राज्यातील अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांसाठी घसघशीत मदत आणली. तिचा फायदा राज्यातील शेतकऱ्यांना मिळाला. त्यामुळे यावेळीही फडणवीस राज्यातील शेतकऱ्यांच्या हिताचा निर्णय घेतील, त्यांना दिलासा देतील, अशी खात्री सर्वांनाच होती. दोन्ही बाजूंची बैठक झाल्यावर ३० जून २०२६ पर्यंत शेतकऱ्यांच्या कर्जमाफीबाबत निर्णय घेण्याचे आश्वासन फडणवीस यांनी आंदोलकांना दिले. त्यासाठी एका उच्चाधिकार समितीची स्थापनाही त्यांनी केली. कर्जमाफी हा तात्कालिक उपाय असला तरी भविष्यात शेतकरी कर्जाच्या चक्रात अडकणार नाही, या दृष्टीने आवश्यक उपाययोजना करण्याचेही त्यांनी यावेळी जाहीर केले. फडणवीस यांचे आश्वासन कधीच कोरडे नसते. फडणवीस जे बोलतात, ते करून दाखवतात, याचा राज्यातील जनतेने याआधीही अनेकवेळा अनुभव घेतला आहे. त्यामुळे यावेळीही शेतकऱ्यांना दिलासा मिळेल, याची खात्री देता येते. कर्जमाफी व्हायलाच हवी. ती शेतकऱ्यांची गरज आहे. यापूर्वीही दोन-तीनदा कर्जमाफी झाली. परंतु, शेतकऱ्यांची दैना संपलेली नाही. आता ती संपविण्याच्या दिशेनेही पावले उचलली गेली पाहिजेत. महाराष्ट्रातील सिंचनाचे प्रमाण वाढविणे, वातावरणातील बदलांच्या प्रभावापासून शेती व शेतकऱ्यांना वाचविणे, शेतकऱ्यांना दर्जेदार बियाणे व खते वेळेवर उपलब्ध करून देणे, कमी व्याजाने कर्ज उपलब्ध करून देणे या साऱ्या गोष्टी सरकारने केल्या पाहिजेत. त्यातही शेतकऱ्यांच्या मालाला योग्य भाव देणे फारच महत्त्वाचे आहे. शेतकऱ्याच्या घरात जोवर अधिकचे उत्पन्न येत नाही, त्याची शेती तोट्यातून नफ्याकडे जात नाही, तोवर त्याची दैना थांबणार नाही, हे आंदोलनकर्त्यांनी आणि सरकारनेही लक्षात घेणे गरजेचे आहे. आंदोलन संपले असले तरी आव्हाने कायम आहेत, हेही त्यांनी ध्यानात ठेवावे.

## यंगिस्तान

# आपण 'भारतीय' कधी होणार?

**जयेश शत्रुघ्न मेस्त्री**

भारतीय रेल्वे ही जगातील सर्वांत मोठी रेल्वे व्यवस्था आहे. दररोज सुमारे २.३ कोटी प्रवासी तिच्यावर अवलंबून असतात. गंमत म्हणजे ही संख्या ऑस्ट्रेलिया देशाच्या संपूर्ण लोकसंख्येइतकी आहे. पण नुकताच एका विदेशी ट्रॅव्हल ब्लॉगरचा व्हिडीओ व्हायरल झाला. त्यामध्ये ती तरुणी भारतीय रेल्वेतील आपला विचित्र अनुभव सांगताना दिसतेय. ती म्हणतेय की ट्रेनचा डबा अत्यंत अस्वच्छ होता. टॉयलेटमधून दुर्गंधी येत होती. सीटवर बसायलाही जागा नव्हती. प्रवाशांच्या डोक्यावर सामानाचा ढिगारा. अशा परिस्थितीत तिला रात्रभर प्रवास करावा लागला. तिचा हा व्हिडीओ खूपच व्हायरल झाला. पण पुढे ती असंही म्हणाली आहे की, "The trains here are awesome and I didn't have this experience in 2023 when I came it wasn't busy at all! But I guess because it's a Saturday that's why." याचा अर्थ तिने उगाच टीका करावी म्हणून व्हिडीओ केलेला नाही. भारतात यायच्या आधी ट्रेनच्या तिकिट्स बुक करून ठेवा असा सल्लाही तिने दिला आहे. हे अगदी खरं आहे की ही परिस्थिती केवळ भारताची नाही. जगामध्ये अनेक ठिकाणी अस्वच्छता असणार. मात्र भारतीय लोक आपल्या देशाला भारत माता म्हणतात. म्हणून आपली जबाबदारी अधिक वाढते.

पण हे फक्त रेल्वेचं चित्र नाही. अशा गोष्टी अनेक ठिकाणी घडतात. रस्ते, उद्याने, सार्वजनिक शौचालये, अगदी आपल्या घराच्या बाहेरची जागा... अनेक ठिकाणी अस्वच्छता दिसते. स्वच्छता म्हणजे फक्त घर स्वच्छ ठेवणे नव्हे. सार्वजनिक जागा, रस्ते, रेल्वे, बस इत्यादी ठिकाणे आपलं घरच नव्हे का? आपण वसुधैव कुटुंबकम् म्हणतो. किमान आपल्या देशाला तरी आपण कुटुंब मानू. रस्त्यावर थुंकणे, कचरा फेकणे, प्लॅस्टिकच्या पिशव्या टाकणे यात आपल्याला काहीही वावगं वाटत नाही. मुंबईच्या लोकल ट्रेनमध्ये सकाळी प्रवास करणाऱ्या प्रत्येकाला माहीत आहे की, प्लॅटफॉर्मवर चालताना पायाखाली कचरा, थुंकी, पानांच्या पिचकाऱ्या आपण तुडवत चालतो. पण मुंबई इतकी वेगवान आहे की अशा गोष्टींची पर्वा करत बसायला आपल्याकडे वेळ नसतो. दिल्लीतील प्रदूषणाची गाथा सर्वदूर पसरली आहे. रस्त्यांवर प्लॅस्टिकच्या पिशव्या हवेत उडताना दिसतात. तीर्थस्थळांवर पूजेच्या साहित्याचा कचरा वाहून जातो. ट्रेनमध्ये लोक चालण्याच्या जागेत नमाज पठन करतात. बेशिस्त वागण्याचा आपण ठेका घेतलाय का? किंवा बेशिस्त वागण्याचा गिनिज वर्ल्ड रेकॉर्ड आपल्याला प्रस्थापित करायचा आहे? एका अभ्यासानुसार, भारतात दररोज १.५ लाख टन कचरा निर्माण होतो. त्यापैकी फक्त २० टक्के कचरा योग्य पद्धतीने विल्हेवाट लावला जातो. उरलेला कचरा



रस्त्यावर, नद्यांमध्ये, समुद्रकिनाऱ्यावर सडत पडतो. हा कचरा फक्त पर्यावरणाचा नाही, तर आपल्या आरोग्याचाही शत्रू आहे. डास, माशा, उंदीर हे सगळे रोगांचे वाहक आहेत. डेंग्यू, मलेरिया इ. आजारांचं मूळ अस्वच्छतेत आहे. पण तरीही आपण बदलत नाही.

शाळेत आपण इतिहास, भूगोल, गणित शिकतो. पण नागरिकशास्त्र हा विषय आपण ऑप्शनला टाकतोय का? जपानमध्ये लहान मुलांना शाळेत कचरा वेचायला शिकवलं जातं. स्वित्झर्लंडमध्ये सार्वजनिक जागा स्वच्छ ठेवणं हा प्रत्येकाचा धर्म समजला जातो. पण भारतात? आपण रस्त्यावर कचरा फेकतो आणि मग सरकारला दोष देतो. ''स्वच्छ भारत अभियान'' सुरू झालं तेव्हा सगळे उत्साही होते. पण आज दहा वर्षांनंतर रस्ते तसेच आहेत. कारण अभियान सरकारचं आहे, आपलं नाही, ही आपली धारणा आहे. कोरोना होता तेव्हा रस्त्यावर थुंकल्याने कोरोना पसरतो असं सांगितल्यामुळे काही लोकांनी संयम पाळला होता. तरी काही लोक रस्त्यावर बिनधास्त ''पचाक'' करताना दिसले. आता कोरोनाला आपण पूर्णपणे विसरून गेलोय. त्यामुळे रस्त्यावर, भिंतींवर, ट्रेनमध्ये, बिल्डिंगच्या शिड्यांवर थुंकण्याची परंपरा आपण पुन्हा सुरू केली आहे. आपण इतके करंटे आहोत की आपल्याला देवाचे फोटो लावावे लागतात कारण शिड्यांवर कुणी थुंकू नये म्हणून.

आपण इतके असंवेदनशील आहोत की गर्दीमध्ये धक्का लागला तरी आपण लगेच शिवीगाळ करतो. पण संयमाने 'सॉरी' म्हणायला आपल्याला लाज वाटते, आपला अहंकार दुखावतो. फुटपाथवरून, राँग साईडवरून बाईक चालवतो. पण कुणाला त्रास झाला तर आपली चूक असतानाही आपण समोरच्या व्यक्तीच्या अंगावर धावत जातो. जणू बेशिस्त वागणं, संविधानाच्या विरोधात वागणं हा आपला धर्म झाला आहे. आपण आपलं सोयीस्कर जीवन जगतो, पण दुसऱ्याच्या अधिकारांचं काय? तसेच आंदोलन हा लोकशाहीचा भाग आहे. पण आंदोलन करताना सार्वजनिक मालमत्तेची नासधूस करणं हा देशद्रोह आहे. अनेक पक्ष, संघटना आंदोलन करतात आणि देशाच्या मालमत्तेचे नुकसान करतात, घाण पसरवतात. मग आंदोलन तुम्ही कशासाठी करताय? विचार करा ज्या रेल्वे गाड्या जाळल्या जातात, त्या सामान्य माणसाच्या आहेत. ज्या बसेस फोडल्या जातात, त्या गरीब प्रवाशांच्या आहेत. मग आंदोलन कोणासाठी? स्वतःच्या न्यायासाठी की दुसऱ्यांवर अन्याय करण्यासाठी? उजवे आणि डावे दोन्ही प्रकारचे लोक यावर बोलत नाहीत. काहींना वाटतं की आपणच देशप्रेमी आहोत आणि काहींना वाटतं की आपणच मोठे सुधारक, पुरोगामी आहोत. पण शिस्त हेच खरं पुरोगामित्व आहे आणि खरी देशभक्ती आहे.

आपण फार मोठे देशभक्त आहोत असं म्हणतो. १५ ऑगस्ट, २६ जानेवारीला ध्वजवंदन करतो. पण दुसऱ्या दिवशी रस्त्यावर थुंकतो. कचरा फेकतो. ट्रेनमध्ये सीटवर पाय ठेवतो. कागदाचे आणि प्लॅस्टिकचे झेंडे रस्त्यावरच टाकतो. ही देशभक्ती आहे की दिखावा? खरी देशभक्ती म्हणजे आपण ज्या देशात राहतो, त्याची काळजी घेतली पाहिजे. देशद्रोह म्हणजे फक्त शत्रूला मदत करणं नव्हे. तर देशद्रोह म्हणजे देशात घाण करणं, नियम मोडणं, दुसऱ्याच्या अधिकारांचं हनन करणं. जर आपण हे थांबवलं, तर देश आपोआप स्वच्छ, सुंदर, सुसंस्कृत होईल. त्या विदेशी व्लॉगरने आपल्याला आरसा दाखवला. मध्ये एक व्हिडीओ व्हायरल झाला होता की एका विदेशीला लोक शिव्या देत होते. कारण त्याला भारतीय शिव्या कळत नाहीत. त्याची मस्करी करत होते. आपला भारत हा विविध परंपरांनी नटलेला आहे. विविध भौगोलिक भागांनी सजलेला आहे. जग किती सुंदर आहे हे लोकांना कळावं म्हणून देवाने भारत बनवला. असं योगी अरविंद म्हणून गेलेत. हा सुंदर देश सुंदर ठेवण्याची आपली जबाबदारी आहे. विदेशी लोकांच्या भारत भ्रमंतीमुळे सुद्धा आपले अर्थकारण चालतंय. म्हणून देशभक्ती किंवा पुरोगामित्व यावर चर्चा करण्याआधी आपन शिस्तीवर चर्चा करायला हवी. आपल्या देशाची प्रतिमा आपल्यामुळे वाईट होणार नाही याची काळजी आपणच घ्यायला हवी. संविधान वाचवायच्या बढाया मारून काही होणार नाही. रस्त्यावर घाण करणारा व नासधूस करणारा माणूस संविधानप्रेमी असूच शकत नाही. आपण नावाला भारतीय आहोत. पण खऱ्या अर्थाने आपण भारतीय कधी होणार? जेव्हा आपण रस्त्यावर थुंकणं बंद करू, जेव्हा आपण कचरा डब्यात टाकू, जेव्हा आपण गर्दीमध्ये संयमाने वागू. जेव्हा आपण दुसऱ्याच्या अधिकारांचा आदर करू, तेव्हा आपण खरे भारतीय होऊ.

writerjayeshmestry@gmail.com

## वेध

**अनिल फेकरीकर**

# सायबर सुरक्षा जागृतीनंतर पुढे काय?

सायबर गुन्हेगारांनी संपूर्ण जगात आपला वरचष्मा निर्माण केला आहे. यामुळे जगातील प्रत्येक सज्जन माणूस आज फार मोठ्या दहशतीत वावरत आहे. त्याचे बँकेतील पैसेही सुरक्षित राहिलेले नाहीत. अशा स्थितीत सायबर गुन्हेगारांपासून स्वत:ला सुरक्षित कसे ठेवायचे यासंदर्भातील जनजागृती अभियान नागपूर ग्रामीण पोलिसांनी देवलापार, रामटेक, पारशिवनी, सावनेर, वेलतूर, कुही, बुटीबोरी, काटोल, नरखेड, जलालखेडा, बेला, उमरेड, भिवापूर, कन्हान, मौदा, अरोली, केळवद, कळमेश्वर, खापा, कोंढाळी, एमआयडीसी बुटीबोरी या २१ पोलिस स्टेशन अंतर्गत राबविले. या भागात राहणाऱ्या जनतेशी थेट संवाद साधत त्यांना सायबर गुन्हेगारांपासून नेमका बचाव कसा करायचा यावर मार्गदर्शन करण्यात आले. खरोखरच हे अभियान लोकहिताचेच आहे. याबद्दल नागपूर ग्रामीण पोलिसांचे अभिनंदन. पण केवळ अभियान राबवून काम होणार आहे का, याचे उत्तर नाही असेच द्यावे लागेल. सायबर गुन्हेगार वर्तमानातील पोलिस यंत्रणेपेक्षा दहा पट चाणाक्ष आहेत. शिवाय सायबर गुन्हेगारांवर वचक ठेवण्याचे काम केवळ पोलिसांचे नाही. तर त्यात बँकांचीही काही जबाबदारी निश्चित करण्याची वेळ आलेली आहे. सर्व व्यवहार हा बँकांमार्फत होतो. मग सायबर गुन्हेगारांवर वचक ठेवण्याची जबाबदारी केवळ पोलिसांवर ढकलणे म्हणजे अन्याय करण्यासारखे होईल.



कमी मनुष्यबळामुळे पोलिस यंत्रणा तणावात वावरत असते. त्यामुळे त्यांच्यावर कामाचा अजून बोजा टाकणे न्यायोचित नाही. म्हणूनच सायबर गुन्हेगारी होणारच नाही अशीच फूलप्रूफ यंत्रणा कार्यान्वित करण्याची गरज आहे. याकरिता रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने पुढाकार घेत सर्व बँकांना दिशानिर्देश द्यायला हवेत. पैसे पाठविणारा आणि खातेधारकाची परवानगी न घेता रुपये परस्पर वळविणाऱ्या गुन्हेगारांना रोखण्याचे काम बँकांनीही करायला हवे. ऑफलाईन व्यवहार असताना बँकांना विश्वसनीय केंद्र मानले जायचे. मग ऑनलाईन होताच हीच यंत्रणा अविश्वसनीयतेकडे वाटचाल का करीत आहे, यावरही मंथन होणे गरजेचे आहे. समजा एखाद्याच्या खात्यातील पैसे सायबर गुन्हेगाराने वळते केले तर संबंधित बँकेतील कर्मचारी पीडितांना मदत करीत नाहीत. वस्तुत: जसे पैसे वळते झाले तसेच ते बँकांना थांबविण्याचा अधिकार असावा. पण तशी युद्धपातळीवर कारवाई होत नसल्याने सायबर गुन्हेगार लाभात राहतात. अनेकदा गुन्हेगार बाहेर देशात बसून हा गोरखधंदा करीत असतात. आता देशातीलच गुन्हेगारांना पकडणे कठीण असताना विदेशातील आरोपींना कसे पकडणार हाच मुद्दा रक्तदाब वाढविणारा ठरतो.

पारशिवनी येथे दर सोमवारी आठवडी बाजार भरतो. या बाजारात मोबाईल चोरांच्या टोळ्या येतात आणि मिळेल तेवढे मोबाईल चोरून नेतात. ज्यांचे मोबाईल चोरीला जातात त्यांना नेट कॅफेत जाऊन २०० रुपये मोजूनच तक्रार करावी लागते. कारण मोबाईल चोरीस गेल्यावर प्रथमत: एका विशिष्ट वेबसाईटवर माहिती टाकावी लागते. जेणेकरून सीमकार्ड बंद करता येईल. पण याकरिता पोलिसांकडे यंत्रणा नाही का? ते थेट नेट कॅफेत जा आणि तक्रार करा असा अफलातून सल्ला का देतात? यावरही मंथन करावे लागेल. केवळ जनजागृती केल्याने सायबर गुन्हेगारी थांबणार नाही. यावर उपाय म्हणून पोलिसांच्या मदतीला प्रत्येक ठाण्यात दोन सायबर तज्ज्ञांची नियुक्ती करायला हवी. एवढेच नव्हे तर सायबर गुन्हेगारांच्या विरोधात कठोर कारवाई होणे अपेक्षित आहे. दोन चार सायबर गुन्हेगारांना सार्वजनिक ठिकाणी कडक शिक्षा देण्याचीही गरज आहे. अशावेळी जनतेसह सरकारनेही पोलिसांच्या पाठीशी राहणेही अभिप्रेत आहे. सायबर गुन्हेगार हाती शस्त्र असलेल्या दरोडेखोरांपेक्षाही भयानक आहेत. यामुळे त्यांच्याशी लढणारे पोलिस दलही तेवढेच सक्षम असायला हवे. कुठल्याही कर्मचाऱ्याला तिथे बसवून काम होणार नाही. याकरिता तज्ज्ञ लोकांची मदत पोलिस यंत्रणेला पुरविणे काळाची गरज आहे. तेव्हाच देशातील सायबर गुन्हेगारी संपुष्टात येईल. शिवाय मोबाईल हाताळणाऱ्यांनीही हाती असलेल्या शस्त्राचा योग्य वापर करावा. आलेल्या प्रत्येक लिंकवर क्लिक करण्याचा मोह त्यांनी टाळावा.

९८२२४६८६६०

## निमित्त

# अविचल व प्रेरक संशोधननिष्ठा

**प्रा. डॉ. अजय देशपांडे**


**(१ व २ नोव्हेंबरला यवतमाळ येथे ६९ वे विदर्भ साहित्य संमेलन होत आहे. या संमेलनानिमित्त...)**

संशोधनास प्रतिकूल वातावरण विदर्भ या प्रदेशाचे एक वैशिष्ट्य आहे तसेच संशोधक व संशोधनग्रंथ यांची अक्षम्य उपेक्षादेखील या प्रांताने अनेकदा केली आहे. पण प्रतिकूल परिस्थिती हीच संशोधनाची योग्य वेळ असते. याची प्रचीती विदर्भातील अनेक संशोधकांनी वेळोवेळी घडवली आहे.


विद्याव्यासंगी थोर संशोधक डॉ. य. खु. देशपांडे यांच्या आयुष्यातील एक घटना त्यांची आणि लोकनायक बापूजी अणे यांची प्रतिकूल काळातील अविचल संशोधननिष्ठा दर्शवणारी आहे.

१९०६ मध्ये अमरावतीला डॉ. देशपांडे आणि लोकनायक बापूजी अणे यांची पहिली भेट वणी येथील रामभाऊ भागवत यांनी करून दिली. तेव्हापासून या दोघांतील स्नेहबंध कायम होते. पुढे १९२६ मध्ये यवतमाळ येथे शारदाश्रम ही संस्था स्थापन झाली. लोकनायक अणे या संस्थेचे अध्यक्ष आणि डॉ. देशपांडे चिटणीस होते.

१९३८ साली स्वित्झर्लंडमधील झ्युरिच येथे होणाऱ्या जागतिक ऐतिहासिक परिषद आणि बेल्जियममधील ब्रुसेल्स येथे आंतरराष्ट्रीय प्राच्यविद्यापरिषद या दोन महत्त्वाच्या परिषदांना प्रतिनिधी म्हणून उपस्थित राहावयाचे व शोधनिबंध सादर करावयाचे निमंत्रण एक वर्ष अगोदर शारदाश्रम या संस्थेचे चिटणीस डॉ. देशपांडे यांना प्राप्त झाले. पण संस्थेची आणि डॉ. देशपांडे यांचीही पाच हजार रुपये खर्च करून आंतरराष्ट्रीय परिषदेस जाण्याची आर्थिक परिस्थिती नव्हती. परिषदेचे निमंत्रण मिळाले असले तरी त्यासाठीचा खर्च परवडणारा नाही , मुख्य म्हणजे तेवढ्या रकमेची तजवीज होणे अशक्य आहे असे डॉ. देशपांडे यांनी लोकनायक बापूजींना सांगितले. डॉ. देशपांडे



डॉ. य. खु. देशपांडे



बापूजी अणे



ॲड. द. बा. महाजन

यांच्या अविचल संशोधननिष्ठेविषयी व अविश्रांत संशोधनवृत्तीविषयी अपार स्नेहादर असलेल्या बापूजींनी त्यांना परिषदेस जाण्याची तयारी करा, शोधनिबंध लिहा; पाच हजार रुपयांच्या खर्चाची तरतूद होईल, असे सांगितले. परिषदेला तीन महिने अवधी असताना लोकनायकांनी हजार रुपयांची तरतूद करून देत डॉ. देशपांडे यांना जाण्या-येण्याची तिकिटे व आवश्यक ते साहित्य वगैरे घेण्यास सांगितले. पुढे ऑक्टोबर १९३८ ते एप्रिल १९३९ म्हणजे सात महिने डॉ. देशपांडे यांनी परदेशात राहून संशोधन केले. त्यांचा पूर्ण खर्च पाच हजार रुपये लोकनायकांनी दिला. या प्रवासासाठी दिली येथील भुलाभाई देसाई यांनी सातशे रुपयांचा धनादेश देऊन मदत केली असे लोकनायक सांगत. पण उर्वरित रक्कम लोकनायकांनीच आपल्या परीने उभी केली. डॉ. देशपांडे यांच्या संशोधनाला लोकनायकांची सहृदयी आस्था लाभली होती. हे सारे डॉ. देशपांडे व ॲड. नारायण हूड यांनी लिहून ठेवले, म्हणूनच आज सांगणे शक्य होते.

डॉ. देशपांडे यांनी आयुष्यभर प्राणपणाने प्रचंड संशोधन केले. त्यांनी सुमारे पाच हजार संस्कृत व मराठी हस्तलिखित ग्रंथ, सुमारे दोन हजार मराठी व फारशी ऐतिहासिक कागदपत्रे आणि विविध नाणी, शिलालेख, ताम्रपट, ऐतिहासिक स्थळांची व वास्तू शिल्पांची छायाचित्रे, दुर्मिळ मूर्ती अशी अमूल्य सामुग्री परिश्रमपूर्वक संग्रहित केली. नवी मर्मदृष्टी देणारे विपुल असे मौलिक संशोधन केले.

डॉ. देशपांडे यांचे संशोधन व स्फुट लेखन काळाच्या पडद्याआड जाऊ नये म्हणून संशोधनाप्रति अपार आदर असणाऱ्या प्राचार्य राम शेवाळकर यांनी डॉ. य. खु. देशपांडे यांचा निवडक लेखसंग्रह - यशोधन हा ग्रंथ परिश्रमपूर्वक संपादित केला व महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाने हा ग्रंथ १९८८ मध्ये प्रकाशित केला. म्हणून डॉ. देशपांडे यांचे काही संशोधन पुढील पिढ्यांसाठी जतन करून ठेवले गेले.

त्याकाळी यवतमाळसारख्या ठिकाणीही अत्यंत सजगपणे, निष्ठेने, पदरमोड करून संशोधनाचे कार्य सुरू होते. आता त्या साऱ्या संशोधनकार्याचे स्मरण सुद्धा केले जात नाही. १९५३ मध्ये ''विदर्भ संशोधनाचा इतिहास'' हा ग्रंथ आणि ॲड. नारायण नागोराव हूड हे नाव आता विस्मृतीच्या गर्तेत गेले आहे. ॲड. प्र. रा. देशमुख यांनी सिंधू संस्कृती, ऋग्वेद व हिंदू संस्कृती हा १९६६ मध्ये परिश्रमपूर्वक लिहिलेला महत्त्वाचा संशोधन ग्रंथ विस्मृतीत जाण्याआधीच पुनर्मुद्रित करण्याची गरज आहे. ॲड. द. बा. महाजन यांनी परिश्रमपूर्वक व अपार निष्ठेने संशोधन करून ''सिंदखेडकर राजे जाधवरावांची बखर'' हा ग्रंथ सिद्ध करून १९६८ मध्ये स्वत: प्रकाशित केला. एकूण काय तर डॉ. देशपांडे यांच्यापासून आजतागायत यवतमाळ येथे संशोधनाचे कार्य सुरूच आहे. आजही यवतमाळात डॉ. अशोक राणांसारखे अभ्यासक निष्ठेने एकाकीपणे संशोधन करीत आहेत. पण आज विदर्भात संशोधकांना सहकार्य करणाऱ्या सहृदयी, उदार, निष्ठावंत, खंबीर माणसांची आणि संशोधनाची दखल घेत संशोधनकार्याच्या बाजूने आस्थापूर्वक नि:पक्षपणे उभ्या राहणाऱ्या कृतिशील संस्थांची मात्र मोठी उणीव आहे.

९८५०५९३०३०

### निसर्गाचा लहरीपणा

माणसांप्रमाणे निसर्ग देखील बदलला आहे असे वाक्य हल्ली सर्वांच्या तोंडी ऐकायला मिळते आणि ते खरेही आहे. कारण सध्या निसर्गाचा लहरीपणा वाढत चालला आहे. आता हेच पाहा ना. नोव्हेंबर महिना सुरू झाला तरी पावसाने विश्रांती घेतली नाही. नोव्हेंबर महिन्यातही राज्यातील अनेक भागांत पाऊस



सुरू आहे. आंध्रप्रदेश आणि ओडिशाच्या समुद्र किनाऱ्यावर मोंथा नावाचे चक्रीवादळ धडकले आहे. या चक्रीवादळाने राज्यातच नाही तर देशात मुसळधार पावसाचा अंदाज वर्तवला जात आहे. सहा महिने झाले तरी पाऊस थांबायचे नाव घेत नाही. अलिकडे ऋतुमान बदलत आहे. कोणत्याच ऋतूची सुरुवात वेळेवर होत नाही. उन्हाळा, पावसाळा, हिवाळा असे तिन्ही ऋतू उशिराच सुरू होतात. नोव्हेंबर महिन्यात पूर्वी कडाक्याची थंडी पडत असे आता मात्र नोव्हेंबर महिना उजाडूनही थंडीचा साधा लवलेशही नाही. निसर्गाच्या लहिरपणाचा सर्वाधिक फटका शेतकऱ्यांना बसत आहे. निसर्गाच्या या अवकृपेच्या संकटाकडे जर मानवाने दुर्लक्ष केले तर भविष्यात त्याची मोठी किंमत संपूर्ण जीवसृष्टीला चुकवावी लागेल.

**श्याम ठाणेदार**/९९२२५४६२९५

## वाचक पत्रे

### निर्ढावलेल्या मानसिकतेला जबाबदार कोण?

डॉ. संपदा मुंढे ही फलटण येथील उपजिल्हा रुग्णालयात वैद्यकीय अधिकारी म्हणून कार्यरत होती. शासकीय रुग्णालयाचा आणि पोलिस स्टेशनमधील कर्मचाऱ्यांचा सतत संबंध येत असतो. अपघातात मरण पावलेल्या अथवा खून झालेल्या व्यक्तीचा आपल्याला हवा तसा शवविच्छेदन अहवाल द्यावा म्हणून पैसा आणि मनगटाद्वारे दबाव आणण्याचा प्रयत्न अनेकदा केला जातो. संपदावरही असाच दबाव आणला गेला. आरोपींना पोलिस कोठडी मिळावी म्हणून फिटनेस सर्टिफिकेट देण्यासाठी आणि शवविच्छेदन अहवालात फेरबदल करण्यासाठी पोलिस दबाव आणत असल्याची तक्रार संपदाने फलटण उपविभागीय पोलिस अधिकाऱ्याकडे केली होती. या तक्रारीत गोपाल बदनेचेही नाव होते. या तक्रारींवर कोणतीही कारवाई करण्यात आली नाहीच उलट संपदाने आरोपी अनफिट असल्याचे प्रमाणपत्र मुद्दाम दिल्याचे आणि यामुळे आरोपींच्या अटकेस उशीर होत असल्याची संपदाविरुद्ध लेखी तक्रार सातारा सिव्हिल सर्जनकडे फलटण पोलिस स्टेशनच्या अधिकाऱ्यांनी केली. यावरून फलटण पोलिस स्टेशनचे इतर अधिकारी आणि गोपाल बदने कशाप्रकारे संपदाचा मानसिक छळ करीत होते हे लक्षात येते. संपदाने आपल्या तक्रारीत पोलिस स्टेशनमधील कर्मचारीअपशब्द वापरत असल्याची आणि मानसिक त्रास देत असल्याचे लिहिले होते तसेच आपल्या जिवाचे काही बरेवाईट झाल्यास पोलिसच जबाबदार राहतील असे या तक्रारीची चौकशी करणाऱ्या समितीला लिहिलेल्या चार पानी पत्रात तिने म्हटले होते.

दुर्दैवाने बदनेवर कोणतीही कारवाई झाली नाही. शेवटी संपदाने माहितीच्या अधिकारांतर्गत १३ ऑगस्ट रोजी उपविभागीय पोलिस अधिकाऱ्यांना पत्र लिहून काय कारवाई केली अशी विचारणा केली. तक्रारीची वरिष्ठ पातळीवर दखल घेतली जात नसल्याने संपदा मनाने खचली असावी. समाजातील प्रत्येकाच्या सुरक्षेची जबाबदारी असलेले पोलिसच जेव्हा अत्याचारी होतात तेव्हा न्याय कोणाकडे मागायचा? सरकारी यंत्रणेतील भ्रष्ट, नीच कर्मचाऱ्यांनी संपदाचा बळी घेतला आहे. गुन्हेगारांशी साटेलोटे असलेल्या समाजकंटक यंत्रणा त्यांच्यासाठी सरसावून पुढे येतात. त्यामुळे आज 'जेल' उद्या 'बेल ' त्यानंतर पुन्हा हाच 'खेल' याची गुन्हेगारांना खात्री असते.

**कल्पना माहूरकर**/नागपूर

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास ९८५०७५३२८१ या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

## आजचे संघगीत-२९

शनिवार, १ नोव्हेंबर २०२५

### राष्ट्रोन्नति एक मात्र ध्यान हेच चालु दे

राष्ट्रोन्नति एक मात्र ध्यान हेच चालु दे
राष्ट्रजीवनात जीव जीवनान्त पाहु दे ॥धृ.॥

सोड भोग मोह स्वार्थ देह तुझा झिजो परार्थ
चंदनी सुगंध मंद आसमंत भारु दे ॥१॥

ध्येयभाव जो मनात येउ दे तुझ्या कृतीत
कार्याची कीर्तिध्वजा दुरदेशि फडकु दे ॥२॥

कर्मयोग हा ज्वलंत स्वीकारी तू नितांत दिव्य
तुझ्या हवनातुनि दीपमाळ उजळु दे ॥३॥

नकोत अन्य यज्ञ याग त्याग हाच मान याग
बंदिवान आत्मतेज आज मुक्त होउ दे ॥४॥



# सांगोला महाविद्यालयात राष्ट्रीय एकता दिवस साजरा

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि. ३१ ऑक्टोबर -**

सांगोला महाविद्यालयामध्ये शुक्रवार दि.३१ ऑक्टोबर रोजी सरदार वल्लभभाई पटेल यांची जयंती व भारताच्या माजी पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी यांची पुण्यतिथी व राष्ट्रीय एकता दिवस साजरा करण्यात आला.

याप्रसंगी वल्लभभाई पटेल व इंदिरा गांधी यांच्या प्रतिमेस प्र.प्राचार्य डॉ.सुरेश भोसले यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आला. तसेच यावेळी राष्ट्रीय एकता दिवसाची शपथ घेण्यात आली.

याप्रसंगी आय.क्यु.ए.सी. समन्वयक डॉ.रामचंद्र पवार, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे नियोजन डॉ.सदाशिव देवकर व प्रदिप आसबे यांनी केले.

# मंगळवेढा शहरात कल्याण नावाचा अवैध मटका घेणाऱ्या दोघांवर पोलिसांची धडक कारवाई

**मंगळवेढा, दि. ३१ ऑक्टोबर-**

शहरातील भाजी मंडईच्या कट्टयावर बसून कल्याण नावाचा मटका जुगार घेत असलेल्या ठिकाणी पोलिसांनी छापा टाकून ५ हजार ३६० रुपये रोख रक्कम जप्त करून नईम सिरारोद्दीन खतीब वय ५७, मालक अभिजीत गणपत घुले या दोघांविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दि.३० रोजी पोलिस निरिक्षक दत्तात्रय बोरीगिड्डे यांच्या मार्गदर्शनाखाली शहर बीटचे पोलिस हवालदार दत्तात्रय व्हरे व अन्य पोलिस कर्मचारी पेट्रोलिंग करीत असताना शहरातील भाजी मंडईत एका कट्टयावर एक इसम रस्त्याने येणाऱ्या जाणाऱ्या लोकांकडून अंक आकडयावर पैसे घेवून कल्याण मटका नावाचा जुगार खेळत असल्याची माहिती मिळाल्यावर ५.४५ वाजता पोलिसांनी छापा टाकला त्यावेळी एक इसम कट्टयावर बसून आकडेमोड करीत होता. पोलिसांनी नईम खतीब यास ताब्यात घेवून जुगार खेळून आलेली रोख रक्कम कोणास देतो व कोणाच्या सांगण्यावरून जुगाराची रक्कम घेतो असे विचारले असता त्याने मालक अभिजीत गणपत घुले यांचे सांगण्यावरून घेत असल्याचे सांगितले असल्याचे पोलिस अंमलदार विनायक जाधव यांनी दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे. मंगळवेढा शहरात बोकाळलेल्या अवैध धंदयाबाबत कर्तव्यदक्ष पोलिस अधिक्षक अतुल कुलकर्णी यांच्याकडे लेखी तक्रार केल्याने सदरची कारवाई तात्काळ दखल घेवून करण्यात आली आहे. भविष्यातही गोरगरीबांचे संसार बेचिराख करणाऱ्या अवैध व्यवसायिकांवर कारवाईचे सत्र सुरुच ठेवावे असाही सूर पुढे येत आहे.

येथे पोलिस उपविभागीय अधिकारी दर्जाचे अधिकारी असतानाही अवैध धंदयाच्या कारवाईसाठी अद्यापतरी पथके नेमली नसल्यामुळे अवैध धंदयाला सुळसुळाट वाढल्याच्या प्रतिक्रिया व्यक्त होत आहेत. पोलिस अधिकार्यांनी अवैध व्यवसायावर आपला अंकुश ठेवावा अन्यथा व्यवसायिक मुजोर होवून कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नसल्याच्या भावना व्यक्त होत आहेत.

**सोलापूर महानगरपालिका, सोलापूर**
**सार्वजनिक आरोग्य अभियंता विभाग**
इंद्रभुवन, रेल्वे लाईन्स, पुण्यश्लोक आप्पासाहेब वारद पथ, सोलापूर -४१३००१
ई मेल:drainsmc@gmail.com टेलिफोन नं:-०२१७-२७४०३५०

जा.क्र./सा.आ.अ./जनि/१४१७ दि. ३१/१०/२०२५

**जाहिर प्रसिध्दीकरणाचा मसुदा**

सोलापुर महानगरपालिका सार्व आरोग्य अभियंता कार्यालकडील ड्रेनेज विभागाकडील खाली नमूद कामाचे ई- निविदेबाबत.

१. Tender ID-2025_SMC_1237211_1

या कामांचे टेंडर शासनाच्या http://www.mahatenders.gov.in या वेबसाईटवर दि. ०१/११/२०२५ पासून पाहण्यास उपलब्ध आहे.

कळावे दि.३१/१०/२०२५

**सही/-**
**सहा अभियंता ड्रेनेज**
**सोलापुर महानगरपालिका**

**मध्य रेल्वे**
**सोलापूर विभाग**
**जैव-शौचालयांचे**

निविदा सूचना क्रमांक: GEM/२०२५/B/६७८९७९७ दिनांक २८.१०.२०२५

डीआरएम (एम) यांचे कार्यालय, मध्य रेल्वे, सोलापूर भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने खालील कामांसाठी नामांकित कंपन्या/कंत्राटदारांकडून सीलबंद निविदा मागवत आहे. कामाचे नाव त्याच्या परिसरासह: सोलापूर विभागातील कोचमध्ये बायो-शौचालयांचे वार्षिक देखभाल आणि ऑपरेशन करार (AMOC). निविदा प्रणाली: दोन पॅकेट प्रणाली. कामाची अंदाजे किंमत: रु. २,३४,४८,८४३.१८/- निविदा फॉर्मची किंमत: शून्य. निविदा फॉर्म जिथून खरेदी करता येईल त्या कार्यालयाचा पत्ता: डीआरएम (एम) यांचे कार्यालय, मध्य रेल्वे, सोलापूर. जमा करावयाची बयाणा रक्कम: रु. २,६७,२५०/- काम पूर्ण होण्याचा कालावधी: ३१ महिने. निविदा सादर करण्याची अंतिम तारीख आणि वेळ: १८.११.२०२५ वेळ १३:००. निविदा उघडण्याची तारीख आणि वेळ: १८.११.२०२५ वेळ १३:३०. वेबसाइट तपशील आणि सूचना फलकाचे ठिकाण जेथे निविदांचे संपूर्ण तपशील पाहता येतील: www.Gem.gov.in

**Sr.DME**/सोलापूर 72

खतरनाक व विस्फोटक सामान के साथ यात्रा करना दंडनीय अपराध है



# सुमित्रा ग्रामिण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्या. अकलुज, ता. माळशिरस जि. सोलापूर

**ताबा नोटीस नमुना झेड (Z NOTICE)**

**म.स.सं. अधिनियम १९६० नियम १९६१ मधील नियम १०७ (११) (ड) (१)**

**स्थावर मालमत्तेचा सिम्बॉलिक ताबा घेतल्याबाबतची नोटीस**

ज्या अर्थी मला प्राप्त म.स.सं. कलम १५६ च्या अधिकारानुसार मी वसुली व विक्री अधिकारी सुमित्रा ग्रामिण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्या. अकलुज, ता. माळशिरस यांच्या खालील थकबाकीदारास म.स.सं. अधिनियम १९६० नियम १९६१ अन्वये मागणी नोटीसव्दारे त्यांच्याकडील येणे रकमा भरण्यास कळविले होते. तरीही त्यांनी रक्कम भरण्यास कसुर केल्याने त्यांच्या स्थावर मालमत्ता जप्त केल्या आहेत. ऋणकोंना नोटीस देण्यात येते की, खाली निर्देशित केलेल्या स्थावर मालमत्तेचा खाली सही करणारे अधिकारी यांनी म.स.सं. अधिनियम १९६१ मधील नियम १०७ (१०) व १०७ (११) (ड) (१) नुसार रितसर बोजा नोंद करून झेड नोटीसव्दारे सिम्बॉलिक ताबा घेतलेला आहे. विशेष करून ऋणको व तमाम नागरिकांना या नोटीसव्दारे सावध करण्यात येते की, या स्थावर मालमत्तेबाबत कोणीही खरेदी विक्री, गहाण खत, दान, टाच, बोजा किंवा इतर हक्कात व्यवहार करू नयेत. याउपर कोणी कोणत्याही प्रकारचा व्यवहार केल्यास तो सुमित्रा ग्रामिण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्या. अकलुज. ता. माळशिरस जि. सोलापूर यांच्या खाली दर्शविलेल्या येणे बोजाची रक्कम व त्यावरील होणारे व्याज, वसुली अधिकारी अंशदान, अनुशांगीक खर्चास कायदेशिररित्या अधिन रहावे लागेल यांची नोंद घ्यावी.

| अ.नं. | कर्जदाराचे नांव व जामिनदाराचे नांव | मिळकतदाराचे नांव | दाखला क्र व दिनांक | झेड नोटीस रक्कम रू. दि. ३०.०६.२५ येणेबाकी | मिळकत ठिकाण | गट.नं. | क्षेत्र |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | **शाखा वेळापूर** | | | | | | |
| १ | कासेगावकर अजय शरदराव<br>जा. १) नवगन दिपक चंद्रकांत<br>जा. २) कुदळे फकीर किसन | कुदळे फकीर किसन | ८२२-२००५<br>०४-११-२०११ | ४३१३.०२ | उघडेवाडी | १३४ | १.०५ आर |
| | **शाखा पिलीव** | | | | | | |
| १ | गोटे वनिता अशोक<br>जा.१) मदने सदाशिव दतू<br>जा.२) देवकर रघूनाव गणपत | मदने सदाशिव दतू | १७०४-२००७<br>०४-१२-२०१४ | ४९९२९१ | झिंजेवस्ती | २९३ हिश्यावर<br>२८७ हिश्यावर | ०.३८ आर पै. हिश्यावर<br>०.८३ आर पै. हिश्यावर |
| २ | सुळे लक्ष्मण निवृत्ती<br>जा.१) गलांडे रामचंद्र मारुती<br>जा.२)बुगड दत्तात्रय दिनकर | गलांडे रामचंद्र मारुती<br>सुळे लक्ष्मण निवृत्ती | १३२७-२००८<br>२३-०४-२०१२ | ८८०३३२ | पिलीव<br>सुळेवाडी | ७८१/३<br>४६४/२ | ६० आर<br>१.१० आर |
| ३ | देवकर शोभा रघुनाथ<br>जा.१) भैस लक्ष्मण बाबुसिंग<br>जा.२) टकले महेंद्र नारायण | भैस लक्ष्मण बाबुसिंग | १३४९-२००७<br>०९-०६-२०१० | ६६११७१ | पिलीव | १२८४<br>१२८५ | ३० आर<br>३८ आर<br>१ हे. ०२ आर |
| ४ | शेटे रमेश महादेव<br>जा.१) बुगड दत्तात्रय दिनकर<br>जा.२) खलिपे राहुल शरद | शेटे रमेश महादेव | १७०२-२००७<br>०४-१२-२०१४ | ४९२२१० | पिलीव<br>पठाणवस्ती | ३७४/१/अ/२/प/५ब<br>१२८ | २.७२ चौ.मी. बिगरशेती<br>०.२४ आर |
| ५ | बुगड मारती दत्ताशय<br>जा. १) तांबोळी रफीक कासीम<br>जा. २) देवकर रघुनाथ गणपत | बुगड मारती दत्तात्रय | १३४७-२००७<br>११-०७-२०१३ | ७९७४६२ | पिलीव | २८१/८<br>२८१/५<br>२८१/३<br>२८१/२/ब | ६८ आर<br>६९ आर<br>६९ आर<br>२० आर |
| ६ | रजपुत महेश सुरेंद्र<br>जा.१) खलिपे सचिन प्रकाश<br>जा.२) देवकर रघुनाथ गणपत | रजपुत सुरेंद्र मल्हारसिंग | २११-२००८<br>२८-०८-२०१५ | ४९३९८९ | कुसमोड | २३८ | १ हे.२० आर |
| ७ | तांबोळी रफीक कासीम<br>जा.१) मुलाणी अजीज मुसा<br>जा.२) गांधी कैलास मोतीचंद | तांबोळी कासीम सय्यद | ९२१-२००९<br>२०-१०-२०११ | २०४६०१ | पिलीव | ७५७/२ | १.५३.२३ चौ.मी. बिगरशेती |
| | **शाखा मुख्य कार्यालय** | | | | | | |
| १ | माने-देशमुख बाळासो भानुदास व उर्मिला<br>जा. १) पवार वसंत शिवदास<br>जा. २) माने देशमुख संजय विठ्ठलराव | माने-देशमुख बाळासो भानुदास | ३७३-२०१४<br>२७-०६-२०२२ | १४६३५६४ | खळवे | ३१५/१<br>३१६/२/ब<br>३१६/१/अ<br>३१४/१/अ | १ हे.३६ आर<br>०.६५ आर<br>०.२० भार<br>०.५१ आर |
| २ | माने देशमुख बाळासो भानुदास व दिनेश<br>जा.१) पवार वसंत शिवदास<br>जा.२) माने-देशमुख संजय विठ्ठलराव | माने-देशमुख बाळासो भानुदास | ३७१-२०१४<br>२७-०६-२०२२ | ४१९२४७ | खळवे | ३१५/१<br>३१६/२/ब<br>३१६/१/अ<br>३१४/१/अ | १ हे.३६ आर<br>०.६५ आर<br>०.२० आर<br>०.५१ आर |
| ३ | बागाव अंकुश लक्ष्मण<br>जा.१) चौगुले लक्ष्मण नामदेव<br>जा.२) कसबे सुनिल बळीराम | बागाव श्रीमंत अंकुश | २८५-२०१५<br>२२-०३-२०१८ | १०१७९१ | अकलुज | १०७/१/ब/२ | ०.५४ आर पै. |
| ४ | वाघुले अतुल नामदेव<br>जा.१) कळकतील ईस्माईल हसन<br>जा.२) साळूंखे यशवंत रामभाऊ | जा.) कळवतील ईस्माईल हसन<br>जा.) साळुंखे यशवंत रामभाऊ | १७१-२००९<br>०५-०९-२०११ | ५८७९१७८ | अकलूज<br>आनंदनगर | ११३/२/ब/६<br>१०३/२/ब/२ | ११.१० आर पै<br>०.३२.५२ चौ.मी.पै |
| ५ | कुंभार लक्ष्मण सावळा<br>जा-१) मोहिते शिवाजी नामदेव<br>जा-२) कुंभार अनिल गोविंद | जा.) कुंभार अनिल गोविंद | १२०१-२००९<br>१४-०१-२०१० | ९२७२५८ | अकलुज | १४५/२/अ/१/ब/१ | १९.३० चौ.मी. |
| ६ | डोईफोडे केरु लक्ष्मण<br>जा.१) काळकुटे उत्तम विठोबा<br>जा.२) बोराडे वसंत लालासो | डोईफोडे हौसराव केरु<br>डोईफोडे वैशाली अर्जुन | २४०-२००७<br>१४-१२-२००७ | ६२२४५२ | रेडणी | ४४७/१ | ०.६० आर |
| ७ | भोसले गौतम महादेव<br>जा.१) महिडा बैजू महिजी<br>जा-२) महिडा लता बैजु | भोसले आम्रपाली गौतम<br>भोसले सुकेशनी गौतम<br>भोसले मंदा गीतम | ६११-२०१३<br>०१-०३-२०१४ | १९८७२९ | तांबवे | १५/१ | २.२२ हे. आर पै. |
| ८ | शिंदे प्रकाश ज्ञानेश्वर<br>जा.१) काळे पांडुरंग तुकाराम<br>जा.२) माने ज्ञानेश्वर जगन्नाथ | काळे पाडुरंग तुकाराम | ४०८-२०१३<br>०१-०३-२०१४ | १०८६४६ | माळशिरस | १४९७/२<br>१४९३<br>१५०८/४ | ०.५० आर<br>१.१७ हे. आर.<br>१.११ हे. आर.पै. |
| ९ | पाटोळे सदाशिव बाळकु<br>जा.१) बोडरे निवुनी लक्ष्मण<br>जा.२) होले प्रदीप सोपान | पाटोळे सदाशिव बाळकु<br>ज्ञानदेव आप्पा पवळे | २४०-२००७<br>१४-१२-२००७ | ८३१९३७ | पानीव | १०७ | ४.९४ हे आर. |
| | **शाखा जयशंकर उद्यान** | | | | | | |
| १ | लोखंडे दिलीप मारूती<br>जा.१) जगताप बाळासाहेब रमेश<br>जा.२) भोसले दिपक किसन | जगताप बाळासाहेब रमेश | ५५०-२०१०<br>०४-०९-२०१३ | ४८५११९ | बागेवाडी | ४८/१/ब/१<br>६५/१/ब/१/ब/प/१ | ०.९१.९३ आर. चौ.मी.<br>२.१९.२९ आर. चौ.मी. हिश्यापुरती |
| २ | शेंडगे आप्पा बापू<br>जा.१) होनमाने शहाजी लिंबाजी<br>जा.२) पिसे नवनाथ पांडुरंग | पिसे नवनाथ पांडुरंग | १२५०-२००६<br>१२-०३-२००८ | १५१०५१ | पिसेवाडी | ६१०<br>६२४<br>५८४<br>६४२ | ०.१२.७५<br>०.१५.००<br>०.२५.५०<br>०.०८.०० |
| | **शाखा भाजी मंडई** | | | | | | |
| १ | खंडागळे पांडुरंग तुकाराम<br>जा. १) क्षीरसागर सुखदेव शिवाजी<br>जा २) सुर्यवंशी औदुंबर बबनराव | खंडागळे पांडुरंग तुकाराम | ५३१-२०१३<br>२९-०३-२०१४ | २७३३३८ | माळेवाडी (अ) | १०/२/अ/२/अ<br>१०/१/ब/१/अ/२ | ०.०२.०० आर<br>०.६३.५० आर. चौ.मी. पैकी |
| २ | गुंड प्रमोद चांगदेव<br>जा.१) देशमुख श्रीराज दिलीपराव<br>जा.२) बोडके राजेंद्र नारायण | बोडके राजेंद्र नारायण | ३९१६-२०१८<br>३१-३-२०१६ | १३१६३६६ | माळेवाडी (अ) | ४२/१/ब/२/ब/२/अ/२/ब/२ | ०.०७.०० आर. चौ.मी. |
| ३ | मिसाळ पांडुरंग गोरख<br>जा.१) चव्हाण अशोक विठोबा<br>जा.२) मिसाळ बबन नरहरी | मिसाळ पांडुरंग गोरख<br>जा.) चव्हाण अशोक विठोबा | ७९७-२०१५<br>२५-०१-२०२२ | १६७१८६१ | वाघोली<br>वाघोली | ३७८/२<br>३६२/२ | ०.३० हे. आर.<br>२.०३ हे. आर |
| ४ | डांगे जोतीराम महादेव<br>जा.१) ओसवाल देवचंद चुनीलाल<br>जा.२) साळुंखे प्रदीप मोहन | ओसवाल देवचंद चुनीलाल | २९०-२०१७<br>२३-०५-२०१५ | १६६५६७ | अकलुज | १२२/१/ब/२/प/१ | ०.०३.३५ आर. चौ.मी. |
| ५ | शिंदे गोपाळ समचंद्र<br>जा. १) पठाण हबीब लालखान<br>जा.२) गिरमे वसंत दत्तात्रय | जा.) पठाण हबीब लालखान | २६९६-२०१४<br>२९-०३-२०१४ | ५०४२६५ | अकलूज | ८१/१/ब/१/ब/२/प/४ | १.८२.०४ आर चौ. मी. पैकी हिश्यावर |
| ६ | कुंभार अनिल गोविंद व ज्योती अनिल कुंभार<br>जा.१) गुन्हाळकर सतिश गणपत<br>जा.२) रुपनवर बाबासो साधु | कुंभार अनिल गोविंद | २९१८-२०१६<br>३१-०३-२०१६ | १८९७५२० | अकलुज | १४५/२/अ/१/ब/१ | २.९० आर. ची. मी.पैकी हिश्यावर |
| ७ | बुराडे रविंद्र सुर्यकांत<br>जा.१) बोडके हरिदास काळबा<br>जा.२) रेवंडे संजय दत्तात्रय | बुराडे रविंद्र सुर्यकांत | ५५३९-२०१५<br>०२-०३-२०१५ | १२५१८६६ | आनंदनगर<br>आनंदनगर | २८/१<br>२५/२ब२ | १.३६ हे. आर<br>०.०४ पैकी हिश्यावर |
| ८ | मस्तुद रघुनाय सोपान<br>जा.१) भोसले गणपत शंकर<br>जा.२) साळवे भास्कर भिमराव | मस्तुद रघुनाथ सोपान | ४६०-२०१३<br>२९-०३-२०१४ | ३३९७७७ | अकलुज | १४५/१/१/२/प/१/अ | ०.५३.२५ आर चौ.मी. |
| ९ | कुरेशी आयुब फकिरमहंमद<br>जा.१) बागवान वाशीन हसन<br>जा.२) गोसावी संजय शिवाजीराव | कुरेशी आयुब फकिरमहंमद | ५८१-२०१५<br>०५-१०-२०१५ | ५५५०३ | अकलुज | ५२/१/अ | २.१० हे. आर. पैकी हिश्याचे |
| १० | बागवान हुसेन बाबुलाल<br>जा.१) लोंढे अशोक गुलाब<br>जा.२) बागवान अहमद महिबुब | बागवान हुसेन बाबुलाल | ४५९-२०१३<br>०१-०३-२०१४ | ३७१९२५ | अकलूज | ८८/१/प/१४ | ६१.७७ चौ.मी. |
| ११ | गुंड-पाटील केशव सुभाष<br>जा.१) खटके अमर बाळासो<br>जा-२) खंडागळे बाळासो शंकर | गुंड-पाटील केशव सुभाष | ३३३३.२०१६<br>२९-०२-२०१६ | ८८०३५८ | अकलूज | १३६६/१ | १.११ हे. आर. |
| १२ | सपताळे तानाजी तुकाराम<br>जा.१) गायकवाड जयकुमार संभाजी<br>जा.२) गायकवाड दत्तात्रय बबन | सपताळे तानाजी तुकाराम | २३६-२०१४<br>३०-०३-२०१५ | १५८७१० | अकलूज | ५२/१/अ | २.१० हे. आर. पैकी हिश्याची |
| १३ | शेख चाँद युसूफ<br>जा. १) शेख गफूर युसूफ<br>जा. २) लखेरी प्रताप पन्नालाल | जा.) शेख गफूर युसूफ | ३८९-२०१५<br>३०-०६-२०१५ | २५७३३३ | अकलुज | १४५/१/क/१/प/६ | १७०.००.०० आर चौ.मी. |
| १४ | तांबोळी नजीर खबुल<br>जा.१) शेख हाजीमलंग अब्दुल<br>जा.२) तांबोळी नजीर मौला | जा) शेख हाजीमलंग अब्दुल | २६९७-२०१४<br>२९.०३.२०१४ | २०१७१६ | अकलूज | ७८ | ०.०२.७८ आर चौ.मी. पैकी हिश्याची |
| १५ | अमोलिक रजनीकांत प्रभाकर<br>जा. १) अमोलीक हेमंत प्रभाकर<br>जा. २) कांबळे ऊमेश धर्मा | अमोलीक रजनीकांत प्रभाकर | २९२-२०१७<br>२३-०५-२०१७ | १४७०१०० | अकलूज | सि.स.नं. १५५१ | ६८.०३ चौ. मी. (घरजागा) |
| १६ | गाडेकर युवराज विष्णु<br>जा.१) गाडेकर रविराज विष्णु<br>जा.२) तांबोळी राजू चाँद | जा) गाडेकर रविराज विष्णु | २२९९-२०१४<br>०१-०३-२०१४ | ९३०४६४ | अकलुज | ८१/१/क/१अ | ०.००.६० आर चौ.मी. |
| १७ | साळवे भास्कर भिमराव<br>जा.१) मस्तुद रघुनाथ सोपान<br>जा.२) जाधव दत्ताय चांगदेव | साळवे भास्कर भिमराव | २५०-२०१०<br>२३-१०-२०१२ | ६६३९८३ | यशवंतनगर | ९१/१/ब/४८/प | ०.०२.८८ आर. ची. मी. |
| १८ | शेख रमजान साहेबलाल<br>जा.१) नागणे राजेंद्र तुकाराम<br>जा.२) शिनगारे कैलास मधुकर | जा.) नागणे राजेंद्र तुकाराम | ७६०-२००७<br>०३-०७-२०१२ | २९४३०५९ | अकलूज | ८८/१/प१४ | ०.०२.१३ आर चौ.मी. |
| १९ | शिवशरण बाबासो तेजप्पा<br>जा-१) शेख चाँद युसुफ<br>जा-२) साठे सुखदेव जगन्नाथ | शिवशरण बाबासो तेजप्पा | ८७७-२०१५<br>२५-०१-२०२२ | १४८१९७७ | अकलूज | १४८/१/ब/२/अ | ०.०३ हे. आर |
| २० | साठे सुखदेव जगन्नाथ<br>जा.१) शेख चाँद युसुफ<br>जा-२) शिवशरण बाबासो तेजप्पा | साठे सुखदेव जगन्नाथ | २२९-२०१४<br>२५-०१-२०२२ | १४४४५८३ | अकलुज | १४८/१/ब/२/अ | ०.०३ हे. आर |
| २१ | शेख मदिना आदम<br>जा.१) भोरी युसुफमहमद हुसेन<br>जा.२) शेख महमद अब्बास | शेख मदिना आदम | ३८८-२०१५<br>३०-०६-२०१५ | १७०१३९ | अकलूज | ५६/४/क | ०,००,७४०.०२ आर.चौ.मी. |
| २२ | ठोंबरे चंद्रकांत भागवत<br>जा.१) कारंडे अरुण महादेव<br>जा.२) एवतपुरे बबन निवृत्ती | ठोंबरे चंद्रकांत भागवत | ४७८-२०१५<br>१७-०७-२०१५ | ४१८९६६ | अकलुज | १०७/२/अ१ | १८५.७७ चौ.मी. |
| | **शाखा माळशिरस** | | | | | | |
| १ | १ नागरगोजे पांडुरंग दगडू<br>जा.१) पाटील अरूण नरहरी<br>जा.२) राखुंडे रामदास संदीपान | नागरगोजे पांडुरंग दगडू | ३१०-२००९<br>०९-०३-२०११ | १२७०९३७ | तोंडल<br>ता. पुरंदर<br>जि.पुणे | २५१<br>२६०<br>३६६<br>२४१<br>१११ | ०.२२ आर पैकी<br>२.२६. आर पैकी<br>०.२९ आर. पैकी<br>०.३७ आार पैकी<br>१ हे. ०४ आर पैकी |

ही ताबा नोटीस दिली असे
दि. / /२०२५

सील

**सही /-**
**वसुली व विक्री अधिकारी**
**सुमित्रा ग्रामिण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्या. अकलुज**
**ता. माळशिरस जि.सोलापुर**

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## ▶▶ महत्वाचे...

### 'आयएमएस'च्या अपूर्वा अंधारेस तिहेरी मुकुट

**सोलापूर, दि. ३१ ऑक्टोबर-**

इंडियन मॉडेल स्कूल स्टेट बोर्डच्या अपूर्वा अंधारे हिची राज्य शालेय डायव्हिंग स्पर्धेसाठी निवड झाली. येथील मार्केंडय जलतरण तलावावर झालेल्या पुणे विभागीय स्पर्धेत अपुर्वाने १७ वर्षाखालील मुलींच्या गटात १ व ३ मीटर स्प्रिंग बोर्ड आणि हायबोर्ड अशा प्रकारात तीन सुवर्णपदक पटकावित तिहेरी मुकुट संपादिला. या कामगिरीवर तिची निवड झाली. तिला क्रीडा शिक्षक अक्षय माने व प्रशिक्षक श्रीकांत शेटे यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांचे संस्थापक अध्यक्ष ए. डी. जोशी सचिव अमोल जोशी, श्री साई महिला प्रतिष्ठानच्या सचिवा सायली जोशी मुख्याध्यापिका सुजाता बुट्टे व ममता बसवंती यांनी अभिनंदन केले.



### उमाबाई श्राविकाचा यश लोंढे जिल्हा क्रिकेट संघात

**सोलापूर, दि. ३१ ऑक्टोबर-**

पुणे येथे होणाऱ्या आंतर जिल्हा क्रिकेट स्पर्धेसाठी येथील उमाबाई श्राविका विद्यालयातील यश लोंढे यांची १४ वर्षाखालील जिल्हा संघात निवड झाली.



यश हा युनायटेड क्रिकेट क्लबचा खेळाडू असून क्लबचे प्रशिक्षक चंद्रशेखर लोखंडे व क्रीडाशिक्षक सुहास छंचुरे यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांचे मुख्याध्यापक सुकुमार मोहोळे, उपमुख्याध्यापिका अश्विनी पंडित, वरिष्ठ दिप्ती शहा, पर्यवेक्षक बाळासाहेब पौळ यांनी अभिनंदन केले.

### गुरुकुल पब्लिक स्कूल करमाळाच्या ओम नरुटेला राज्य आर्चरी स्पर्धेत रौप्य

**सोलापूर, दि. ३१ ऑक्टोबर-**

यवतमाळ येथे झालेल्या राज्य शालेय धनुर्विद्या स्पर्धेत १४ वर्षाखालील मुलांच्या गटात रिकव्हर राउंड या प्रकारात गुरुकुल पब्लिक स्कूल करमाळाच्या ओम नरुटे याने ६८५ गुण मिळवत रौप्य पदक मिळवले.



या कामदगिरीवर त्याची राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड झाली. त्यास क्रीडा शिक्षक सागर शिरस्कर यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांचे संस्थेचे अध्यक्ष भोगे व सचिव भोगे व एचओडी शिंदे, पवार यांनी अभिनंदन करून राष्ट्रीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

### श्रीकृष्ण मेटकरीची राष्ट्रीय नेमबाजी स्पर्धेसाठी निवड

**वेळापूर, दि. ३१ ऑक्टोबर-**

वेळापूर येथील इंग्लिश स्कूल व संकल्प स्पोर्ट्स शूटिंग क्लबच्या श्रीकृष्ण ज्योती



बापू मेटकरी याची भोपाळ येथे होणाऱ्या राष्ट्रीय नेमबाजी स्पर्धेसाठी निवड झाली. नागपूर येथे झालेल्या राज्य शालेय नेमबाजी स्पर्धेत १४ वर्षांखालील गटात श्रीकृष्णने सर्वोत्तम खेळाचे प्रदर्शन करत कांस्य संपादिले. त्याला अक्षय राऊत, सतीश कदम, शिवाजी जाधव यांचे मार्गदर्शन मिळाले.




### जिल्हा रोल बॉल अजिंक्यपद स्पर्धा सोमवारी

**सोलापूर, दि. ३१ ऑक्टोबर-**

सोलापूर रोल बॉल असोसिएशनच्या वतीने ३ नोव्हेंबर २०२५ रोजी सा. ५ ते ६ वाजता शिंदे चौक येथील इंदिरा प्रशालेत १७ वर्षाखालील मुले आणि मुलींची जिल्हा रोल बॉल अजिंक्यपद व निवड चाचणी स्पर्धा होईल. एक जानेवारी २००९ नंतर जन्मलेले खेळाडू यासाठी पात्र आहेत. या निवड चाचणीतून ८ व ९ नोव्हेंबर रोजी जळगाव येथे होणाऱ्या राज्य स्पर्धेसाठी संघ निवडण्यात येणार आहे. नोंदणीसाठी प्रमोद म्हेत्रे (मो. ८६५७९०४१४३) यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन रोलबॉल असोसिएशनचे जिल्हा संघटनेचे अध्यक्ष दशरथ गुरव, उपाध्यक्ष विठ्ठल कुंभार, सचिव प्रमोद चुंगे यांनी कळविले आहे.

# ऑस्ट्रेलियाचा ४ गड्यांनी विजय

### हेझलवूड, एलिसचा प्रभावी मारा

◆ **मेलबर्न, ३१ ऑक्टोबर**

शुक्रवारी येथे खेळल्या गेलेल्या दुसऱ्या टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेट सामन्यात ऑस्ट्रेलियाने भारतावर ४० चेंडू शिल्लक ठेवित ४ गडी राखून विजय मिळवला. वेगवान गोलंदाज जोश हेझलवूड व नॅथन एलिसच्या प्रभावी माऱ्यामुळे भारताच्या फलंदाजीची अव्वल फळी कोसळली.



मिचेल मार्श व ट्रॅव्हिस हेडची विजयी खेळी



अभिषेक शर्माची एकाकी झुंज

८२,४३८ प्रेक्षकांसमोर, भारताला सर्वात लाजिरवाण्या पराभवांपैकी एकाचा सामना करावा लागला. ऑस्ट्रेलियाने प्रथम फलंदाजी करणाऱ्या भारताला १८.४ षटकांत एकूण १२५ धावांत गुंडाळले, यात अभिषेक शर्मा व हर्षित राणा वगळता नऊ फलंदाजांना दुहेरी आकडाही गाठता आला नाही. ऑस्ट्रेलियाने १३.२ षटकांत ६ गडी गमावित विजयाचे लक्ष्य गाठले आणि पाच सामन्यांच्या टी-२० मालिकेत १-० अशी आघाडी घेतली.

अभिषेक शर्माने ३७ चेंडूत ८ चौकार व २ षट्कारांसह ६८ धावा, तर हर्षित राणाने ३३ चेंडूंत ३ चौकार व एका षट्कारसह ३५ धावा नोंदवून ऑस्ट्रेलियाला पाठलाग करण्यासाठी काहीतरी दिले. अभिषेक १९ व्या षटकात बाद झाला. त्याच्यासोबत राहिलेला एकमेव खेळाडू हर्षित राणा होता. हेझलवूडने १३ धावांत ३ बळी मिळविले, तर झेव्हियर बार्लेट व नॅथन एलिसने प्रत्येकी २ बळी टिपले. मार्कस स्टोयनिसने एक बळी मिळविला.

विजयासाठी १२६ धावांचा पाठलाग करताना मिचेल मार्श आणि ट्रॅव्हिस हेडने ५१ धावांची सलामी भागीदारी करून ऑस्ट्रेलियाला अर्धी लढाई जिंकवून दिली. वरुण चक्रवर्तीच्या गोलंदाजीला बळी पडण्यापूर्वी हेडने १५ चेंडूत २८ धावा केल्या, तर कुलदीप यादवच्या फिरकीला बळी पडण्यापूर्वी मार्शने २६ चेंडूत ४६ धावा करताना चार षट्कार मारले. जोश इंग्लिसने २० चेंडूंत २० धावांची भर घातली.

जसप्रीत बुमराहने २६ धावांत २ बळी, वरुण चक्रवर्तीने २३ धावांत २ बळी, तर कुलदीप यादवने ४५ धावांत २ बळी टिपूनही भारताला विजय मिळविता आला नाही. ऑस्ट्रेलियाने ४० चेंडू शिल्लक असताना चार गड्यांनी विजयावर शिक्कामोर्तब केले. ◀*(वृत्तसंस्था)*

# तेंडुलकरसह दिग्गजांनी केले महिला संघाचे कौतुक

◆ **नवी मुंबई, ३१ ऑक्टोबर**

आयसीसी महिला वन-डे विश्वचषक क्रिकेट स्पर्धेत गुरुवारी डी. वाय. पाटील स्टेडियमवर हरमनप्रीत कौरच्या नेतृत्वाखालील भारतीय महिला संघाने गत विजेत्या ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या उपांत्य सामन्यात विक्रमी धावसंख्येचा यशस्वी पाठलाग केल्याचे बघून महान क्रिकेटपटू सचिन तेंडुलकर अनेक दिग्गजांनी आश्चर्य व्यक्त केले व भारतीय महिला क्रिकेटपटूंचे कौतुक केले. हा एक शानदार विजय असून हा इतिहासात कोरला जाईल असे अनेकांनी म्हटले आहे.



विजयाचा आनंद साजरा करताना जेमिमा रॉड्रिग्जसह भारतीय महिला क्रिकेटपटू

जेमिमाह रॉड्रिग्जने आपल्या कारकिर्दीची सर्वोत्तम खेळी केली आणि ऑस्ट्रेलियन संघाला रोखून भारताला तिसऱ्यांदा महिला एकदिवसीय विश्वचषकाच्या अंतिम फेरीत प्रवेश मिळवून दिला.

जेमिमाचे हे तिसरे शतक आणि विश्वचषकातील पहिले शतक आहे. तिने कर्णधार हरमनप्रीत कौर (८८ चेंडूत ८९ धावा, १० चौकार, २ सहाकार) सोबत तिसऱ्या गड्यासाठी १६७ धावांची दमदार भागीदारी केली. या विजयामुळे भारताने गत दोन आवृत्त्यांमध्ये स्पर्धेत ऑस्ट्रेलियाचा १५ सामन्यांचा अपराजित प्रवास संपुष्टात आणला.

३३९ धावांच्या प्रचंड धावांचा पाठलाग करताना, जेमिमाहने आपल्या नाबाद खेळीने भारताला विजय मिळवू दिला. ऑस्ट्रेलियाच्या ३३८ धावांच्या प्रत्युत्तरात भारताने ४८.३ षटकांत ५ बाद ३४१ धावा केल्या. 'अद्भूत विजय! आघाडीवरून नेतृत्व केल्याबद्दल भारतीय महिला संघाचे अभिनंदन. तिरंगा उंच फडकवत ठेवा, असे सचिन तेंडुलकरने पोस्ट केले. भारतीय संघाचे माजी प्रशिक्षक आणि महान लेग-स्पिनर अनिल कुंबळे यांनीही जेमिमाह रॉड्रिग्जच्या खेळीचे कौतुक केले. जेमिमाह रॉड्रिग्जची नाबाद १२७ धावांची खेळी ही परिपक्वता आणि आत्मविश्वास परिभाषित करणारी खेळी आहे, असे कुंबळेने म्हटले आहे.

विराट कोहलीनेही महिला संघाचे अभिनंदन केले आणि संघाच्या लवचिकतेचे, आत्मविश्वासाचे व उत्साहाचे कौतुक केले. ऑस्ट्रेलियासारख्या बलाढ्य प्रतिस्पर्ध्यावर आमच्या संघाचा हा मोठा विजय आहे. मुलींनी केलेला उत्तम पाठलाग आणि जेमिमाहचा उत्कृष्ट कामगिरी प्रशंसनीय आहे. शाब्बास, टीम इंडिया!, असे कोहलीने पोस्ट केले.आणखी एक उपांत्य सामना आम्ही जिंकू व सहज अंतिम फेरीत पोहोचू असा ऑस्ट्रेलिया विचार करीत होता, परंतु आमच्या महिला क्रिकेटपटू विचार करत होत्या की, धमाका करण्याची हीच वेळ आहे. भारतीय महिला क्रिकेटपटूंनी काय कमालीचा खेळ दाखविला, आमच्या महिला संघाचा अभिमान आहे, असे भारताचा माजी सलामीवीर वीरेंद्र सेहवाग म्हणाला.

भारताचा माजी क्रिकेटपटू युवराज सिंगनेही महिला संघाच्या दृढनिश्चय आणि दृढनिश्चयाचे कौतुक केले, विशेषतः रॉड्रिग्ज आणि हरमनप्रीतच्या धाडसी खेळींचे.

रविवारी नवी मुंबईत होणाऱ्या अंतिम सामन्यात भारत दक्षिण आफ्रिकेशी भिडणार आहे.

भारतीय संघाचा यष्टिरक्षक-फलंदाज ऋषभ पंतनेही हरमनप्रीतच्या नेतृत्वाखालील संघाचे अभिनंदन केले. दक्षिण आफ्रिकेचा दिग्गज खेळाडू एबी डिव्हिलियर्स म्हणाला की हा भारताकडून अविश्वसनीय विक्रमी पाठलाग होता. भारताचा माजी डावखुरा वेगवान गोलंदाज आणि समालोचक इरफान पठाण यांनीही महिला संघाच्या संयमाचे कौतुक केले. ◀*(वृत्तसंस्था)*

### क्रीडा मंत्री मांडविया यांनीही केले अभिनंदन

ही भारताची स्त्रीशक्ती आहे, अशा शब्दात क्रीडा मंत्री मनसुख मांडविया यांनी महिला वन-ड़े विश्वचषकाच्या उपांत्य सामन्यात ऑस्ट्रेलियावर मिळविलेल्या भारताच्या विजयाचे कौतुक केले. महिला सक्षम...या साध्या पोस्टसह बीसीसीआयचे सचिव देवजित सैकिया यांनी संघाचे अभिनंदन केले. ■

# प्रज्ञानंद, अर्जुन, गुकेशकडून उत्तम कामगिरीची आशा

### फिडे बुद्धिबळ विश्वचषक आजपासून

◆ **पणजी, ३१ ऑक्टोबर**

शनिवारपासून येथे फिडे विश्वचषक बुद्धिबळ स्पर्धेला प्रारंभ होणार आहे. भारताला विश्वविजेत्या डी. गुकेश, आर. प्रज्ञानंद व अर्जुन एरिगसीकडून पुन्हा एकदा चांगली कामगिरी करण्याची आशा आहे.



नॉर्वेचा मॅग्नस कार्लसन, हिकारू नाकामुरा व फॅबियानो कारुआना ही अमेरिकन जोडी स्पर्धा करत नसल्यामुळे विश्वविजेता डी. गुकेश आणि अर्जुन एरिगाइसी हे दोन प्रतिभावान खेळाडू या प्रतिष्ठेच्या स्पर्धेत आपला ठसा उमटवण्याचा प्रयत्न करतील. या स्पर्धेत रोख बक्षीस निधी दोन दशलक्ष अमेरिकन डॉलर्स आहे.

या स्पर्धेत अव वल ठरणारे तीन खेळाडू २०२६ च्या कॅण्डिडेट बुद्धिबळ स्पर्धेसाठी पात्र ठरणार आहे. ८० देशांमधील २०६ अव्वल बुद्धिबळपटू पुढील चार आठवडे गोव्यात आठ फेऱ्यांच्या, सिंगल-एलिमिनेशन नॉकआउट स्पर्धेत खेळण्यासाठी असतील. प्रत्येक सामन्यात मानक वेळेच्या नियंत्रणाखाली खेळले जाणारे दोन शास्त्रीय खेळ असतात. जर शास्त्रीय खेळांनंतर गुण बरोबरीत राहिले, तर खेळाडू तिसऱ्या दिवशी जलद आणि ब्लिट्झ टाय-ब्रेकच्या मालिकेसाठी परततील आणि कोण पुढे जाईल हे ठरवतील.

तीन अव्वल भारतीयांपैकी एक गुकेश हा विश्वविजेता आहे आणि पुढच्या वर्षीच्या अखेरीस जागतिक अजिंक्यपद स्पर्धेसाठी पात्र होण्यासाठी त्याला कॅण्डिडेट सायकलमधून जाण्याची आवश्यकता नाही.

प्रज्ञानंदला पुढील कॅण्डिडेट स्पर्धेत स्थान मिळण्याची खात्री झाली असली तरी, अर्जुन एरिगासी पुढील वर्षाच्या सुरुवातीला होणाऱ्या सर्वात मोठ्या स्पर्धेत स्थान मिळविण्याच्या प्रयत्नात आहे, जे पुढील जागतिक अजिंक्यपद सामन्यात गुकेशला कोण आव्हान देईल हे ठरवेल. कॅन्डिडेटेट स्पर्धेसाठी विदित गुजराती आणि पेंटाला हरिकृष्ण यांनाही स्थान मिळण्याची शक्यता आहे. ◀*(वृत्तसंस्था)*

### महिला प्रीमियर लीग दोन टप्प्यात होणार

**नवी दिल्ली :** आगामी महिला प्रीमियर लीग २०२५-२६ हंगाम दोन टप्प्यात खेळवण्यात येणार आहे. पहिला टप्पा डिसेंबर-जानेवारीमध्ये सुरू होणार आहे आणि दुसरा एप्रिल-मे महिन्यामध्ये होईल. अखिल भारतीय फुटबॉल महासंघ (एआयएफएफ) आणि आयडब्ल्यूएल क्लब यांच्यात झालेल्या आभासी बैठकीत हा निर्णय घेण्यात आला, पहिल्या टप्प्याच्या नेमक्या तारखा नंतर निश्चित केल्या जातील. त्यानुसार, लीगचा पहिला टप्पा २० डिसेंबरपासून सुरू होण्याची शक्यता आहे आणि ६ जानेवारीपर्यंत चालेल. ■

# धावपटू साईश्वर व श्रद्धा गुंटूकचा २१ किमीचा नवा विक्रम

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३१ ऑक्टोबर-**

ग्रीन फिट इंडिया स्पोर्ट्सच्या एकता दौड अंतर्गत श्रद्धा सरदार वल्लभभाई पटेल जयंतीनिमित्त झालेल्या एक दिवसीय रन स्पर्धेत राष्ट्रीय धावपटू साईश्वर व श्रद्धा केशव गुंटूक यांनी २१ किमी अंतर कमी वेळेत पूर्ण करत स्वतःचाच विक्रम मोडीत



साईश्वर गुंटूक



श्रद्धा गुंटूक

काढला. जुळे सोलापुरातील स्वामी विवेकानंद प्रशालेतील साईश्वरने २१ किमी अंतर १ तास २७ मिनीटे २० सेकंदात तर तेवढेच अंतर श्रद्धाने अंतर १ तास ४० मिनिटे ३ सेकंदात पूर्ण केले. चॅम्पियन्स फिटनेस फिजिशियन एस एम एस हॉस्पिटलचे संस्थापक प्रशांत बटर यांच्या अध्यक्षतेखाली या स्पर्धेचे आयोजन केले.

ही स्पर्धा एसआरपीएफ कॅम्प सोरेगाव येथून सुरुवात करून जुळे सोलापूर भंडारी ग्राऊंड येथून पुन्हा एसआरपीएफ कॅम्प सोरेगाव अशा क्रमाने २१ किमी अंतर पार करण्यात आले. साईश्वर व श्रद्धा यांना सिनियर ऑलिम्पियन केशवराज सिंह, स्वामी विवेकानंद प्रशालेचे प्राचार्य अंबादास पांढरे, प्राचार्य चिदानंद माळी, क्रीडाप्रशिक्षक कृष्णा कोळी यांचे मार्गदर्शन लाभत आहे.



# हँडबॉल स्पर्धेत 'संगमेश्वर'ला उपविजेतेपद

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३० ऑक्टोबर-**

शालेय शहर हँडबॉल स्पर्धेत संगमेश्वर कॉलेजच्या मुलांच्या संघाने उपविजेतेपद संपादिले. या खेळाडूंना शारीरिक शिक्षण संचालक डॉ. आनंद चव्हाण, शारीरिक शिक्षण शिक्षक प्रा.संतोष खेंडे, प्रा. विक्रांत विभुते, प्रा. शरणबसवेश्वर वांगी यांचे मार्गदर्शन लाभले.

या खेळाडूंना श्री संगमेश्वर एज्युकेशन सोसायटीचे चेअरमन धर्मराज काडादी, सचिव ज्योती काडादी, व्यवस्थापन समिती सदस्य पुष्पराज काडादी, प्राचार्य डॉ .ऋतुराज बुवा, उपप्राचार्य प्रा.प्रसाद कुंटे यांनी अभिनंदन केले

**उपविजयी संघ :** ओम सुरेश देवकांबळे, सिद्धेश्वर किशोर लादे, बालाजी जयकुमार कलागते, सुशांत श्रीशैल टुमणे, ऋतुराज अनंत जाधव, सुजलकुमार जितेंद्रकुमार चौहान, अथर्व सिद्धराम हेळवे, श्रेयस सोमनाथ साबणे, ओंकार संजयकुमार जेऊरगी, सोहम लब्बा, अथर्व भोगशेट्टी.

# शिवलीला कराटे अकॅडमीच्या ५ कराटेपटूंना ब्लॅक बेल्ट

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३० ऑक्टोबर-**

येथील शिवलीला स्पोर्ट्स कराटे अकॅडमीच्या पाच कराटेपटूंनी ब्लॅक बेल्ट सेकंड डिग्री प्राप्त केली. सिकंदराबाद हेडकॉटर येथे ग्रँड मास्टर मुख्य परीक्षक एस. श्रीनिवासन व सहाय्यक परीक्षक डी.रमेश हेडकॉटर चिप इन्स्ट्रक्टर यांच्या मार्गदर्शनाखाली ही परीक्षा झाली. त्यांनाअकॅडमीचे मुख्य प्रशिक्षक सेन्साई शिवशरण वाणीपरीट व सहाय्यक प्रशिक्षिका स्मिता वाणी परीट यांचे मार्गदर्शन लाभले

**ब्लॅक बेल्ट : सेकंड डिग्री प्राप्त :** प्रज्वल यशवंत वलेकर, नम्रता महेश कौडकी. **फर्स्ट डॅन कन्फर्मेशन :** आदिती सचिन फताले, जयराज बसवराज नवले, प्रेम प्रशांत जाधव.






# विद्यापीठ व्हॉलिबॉल स्पर्धेत बोरामणीच्या ग्लोबल व्हिलेजला उपविजेतेपद

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३१ ऑक्टोबर-**

कै. ब.ई.चनशेट्टी गुरुजी प्रतिष्ठान संचलित ग्लोबल व्हिलेज कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय बोरामणीच्या संघाने पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या आंतर महाविद्यालयीन व्हॉलिबॉल स्पर्धेत उपविजेतेपद संपादन केले.

माढा येथील कला व वाणिज्य महाविद्यालयात झालेल्या विद्यापीठस्तरीय आंतर महाविद्यालयीन हॉलीबॉल संगमेश्वर महाविद्यालय विरुद्धच्या अटीतटीच्या अंतिम लढतीत उपविजेतेपद संपादले. त्यांचे संस्था अध्यक्ष प्राचार्य डॉ. उमाकांत चनशेट्टी, उपाध्यक्ष प्रा. अनिकेत चनशेट्टी, सचिवा संगीता शहा, खजिनदार सुजाता बादोले व प्राचार्य डॉ.वाय.डी. पुजारी यांनी अभिनंदन केले.

**उपविजयी संघ :** कर्णधार सोवीत राठोड, उपकर्णधार सागर आचलकर, अजित राठोड, नागराज राठोड, यश राठोड , श्याम राठोड, सुजल राठोड, राहुल जाधव, चेतन राठोड, प्रेम राठोड, रितेश राठोड ,अमित राठोड. संघ व्यवस्थापक प्रा. प्रदीप राठोड.

### महाराष्ट्र ऑलिंपिक असोसिएशनच्या निवडणुकीसाठी

# अजित पवार गटाच्या ऑलिम्पिक पॅनेलची घोषणा

**मुंबई, दि. ३१ ऑक्टोबर-**

महाराष्ट्र ऑलिम्पिक संघटनेच्या निवडणुकीत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या ऑलिम्पिक पॅनेलचे पारडे जड असल्याचे स्पष्ट झाले आहे. येत्या रविवारी होणाऱ्या एमओएच्या निवडणुकीत २१ उमेदवार अजित पवार गटाचे असून त्यापैकी ३ उमेदवार बिनविरोध निवडून आले आहेत.

मुंबईत २ नोव्हेंबर रोजी होणाऱ्या महाराष्ट्र ऑलिम्पिक संघटनेच्या पंचवार्षिक निवडणुकीसाठी ऑलिम्पिक पॅनलची घोषणा माजी ऑलिम्पिकपटू आदिल सुमारीवाला यांनी केली आहे. मतदार ३१ संघटनांपैकी २५ पेक्षा अधिक संघटनांनी अजित पवार यांना पाठिंबा जाहिर केला आहे. ऑलिम्पिक पॅनेलचे१७ पैकी अधिक संघटनेचे उमेदवार असल्याने उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या गटाचा विजय निश्चित असल्याचे माजी ऑलिम्पिकपटू आदिल सुमारीवाला यांनी सांगितले आहे. आधीच उपाध्यक्ष पदासाठी आदिल सुमारीवाला, प्रदिप गंधे व .प्रशांत देशपांडे यांची बिनविरोध निवड झाली आहे. विजयी उमेदवार आंतराष्ट्रीय बॅडमिंटपपटू प्रदिप गंधे म्हणाले की, गेल्या पाच वर्षात महाराष्ट्राने राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत देशात अव्वल स्थान पटकावले आहे. याचे सर्व श्रेय महाराष्ट्र ऑलिम्पिक संघटनेचे आहे. अजित पवार यांच्या कार्यकुशल नेतृत्वामुळे एमओएच्या संकल्पनेतून महाराष्ट्र ऑलिम्पिक भवनासह देशातील पहिले क्रीडा संग्रहालय साकार होत आहे. यामुळेच निवडणुकीत अजित पवार गटाला संघटनांनी पाठिंबा दिला आहे. महाराष्ट्र ऑलिम्पिक संघटनेतील २५ पेक्षा अधिक संघटनांनी पुण्यातील बैठकीत उपमुख्यमंत्री व महाराष्ट्र ऑलिम्पिक संघटनेचे अध्यक्ष अजित पवार यांना जाहिर पाठिंबा दिला आहे. यावेळी पवार म्हणाले की, खेळीमेळीत होणाऱ्या निवडणुकीसाठी आपण सज्ज झालो आहोत. बिनविरोध निवड झालेल्या तीनही उपाध्यक्षांचे मी मनापासून अभिनंदन करत आहे.



पुण्यातील बैठकीत महाराष्ट्र ऑलिम्पिक संघटनेच्या पदाधिकाऱ्यांना मार्गदर्शन करतना उपमुख्यमंत्री अजीत पवार.

**उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या ऑलिम्पिक पॅनेलचे उमेदवार**

अध्यक्ष - अजित पवार, वरिष्ठ उपाध्यक्ष - अशोक पंडित, उपाध्यक्ष - आदिल सुमारीवाला, प्रदिप गंधे, प्रशांत देशपांडे (तिघे बिनविरोध निवड), सचिव - नामदेव शिरगांवकर, सहसचिव - चंद्रजीत जाधव, उदय डोंगरे, मनोज भोरे, निलेश जगताप, खजिनदार - स्मिता शिरोळे, कार्यकारिणी सदस्य - संदिप चौधरी, संदिप ओंबासे, राजेंद्र निम्बाते, गिरीश फडणीस, रणधीरसिंग, किरण चौगुले, समीर मुणगेकर, संजय वळवी, सोपान कटके



# 'ऑर्किड'ची कुस्ती स्पर्धेत कामगिरी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३१ ऑक्टोबर-**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्र शिक्षण विद्यापीठ अंतर्गत आंतर विभागीय कुस्ती स्पर्धेत एन. के. ऑर्किड महाविद्यालयाच्या मल्लांनी उल्लेखनीय कामगिरी केली. सातारा येथे झालेल्या स्पर्धेत त्यांनी ही कामगिरी केली. त्यांचे प्राचार्य डॉ बी. के. सोनगे, उपप्राचार्य डॉ. श्रीनिवास मेथन, उपप्राचार्य डॉ. विनायक पत्की, सिनेट व व्यवस्थापन सदस्य प्रा सचिन गायकवाड यांनी अभिनंदन केले. या मल्लांना एआयडीएस विभागाचे प्रमुख डॉ एम बी पाटील, मेकॅनिकल विभागाचे विभाग प्रमुख डॉ एस एस काळे, क्रीडा कोऑर्डिनेटर प्रा जामदार, प्रा ऋचा श्रीराम, प्रमोद लिगाडे, दादा पांगळे यांचे मार्गदर्शन लाभले.

**मल्लांची कामगिरी :** सौरभ पांढर मिसे (७९ किलो गटात द्वितीय) गणेश कचरे (७९ किलो गटात तृतीय), पृथ्वीराज गायकवाड (६३किलो खालील गटात चौथा), गणेश बनसोडे (५७ किलो खालील वजन गटात चौथा).

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# फटाके फोडणे, लाऊडस्पीकर वाजवणे कोणत्याही धर्मात लिहिलेले नाही

**निवृत्त न्यायमूर्ती अभय ओक यांचे प्रतिपादन**





◆ **नवी दिल्ली, ३१ ऑक्टोबर**

कोणताही धर्म पर्यावरणाचा ऱ्हास किंवा सजीव प्राण्यांना होणारी हानी मान्य करत नाही. फटाके फोडणे आणि लाऊडस्पीकर वापरणे हे अनिवार्य धार्मिक प्रथा नाहीत. दुर्दैवाने, कोणत्याही राजकारण्याने जनतेला सणांच्या वेळी पर्यावरणाचे प्रदूषण आणि नाश करण्यापासून परावृत्त करण्याचे आवाहन केलेले नाही. असे दिसते की राजकीय वर्गाला या कर्तव्याची जाणीव नाही किंवा त्यांना त्याची जाणीव नाही. काही अपवाद वगळता, आपल्या धार्मिक नेत्यांच्या बाबतीतही असेच आहे, असे प्रतिपादन सर्वोच्च न्यायालयाचे निवृत्त न्यायाधीश अभय एस. ओक यांनी केले.

ते सर्वोच्च न्यायालयाच्या बार असोसिएशनच्या व्याख्यानमालेत बोलत होते. 'स्वच्छ हवा, हवामान न्याय आणि शाश्वत भविष्यासाठी एकत्र' असा या व्याख्यानमालेचा विषय होता.

निवृत्त न्यायमूर्ती ओक म्हणाले, धर्माच्या नावाखाली प्रदूषणाला न्याय देण्याची सवय वाढत आहे, परंतु प्रत्येक धर्म आपल्याला निसर्गाचे आणि सजीव प्राण्यांचे रक्षण करण्याचा संदेश देतो. फटाके फोडल्याने वृद्ध, आजारी, पक्षी आणि प्राण्यांना प्रचंड त्रास होतो, तर कोणी आनंदी कसे होऊ शकते? खरा आनंद आणि आनंद कुटुंब, नातेवाईक आणि मित्रांसोबत सण साजरे करण्यात आहे, फटाके वाजवण्यात किंवा मोठा आवाज करण्यात नाही. (वृत्तसंस्था)

**धार्मिक कार्यक्रम ध्वनिक्षेपकाशिवाय व्हावे**

अजान आणि इतर धार्मिक समारंभ ध्वनिक्षेपकाशिवाय केले जाऊ शकतात. मुंबई उच्च न्यायालयाच्या निकालात असेही म्हटले आहे की, ही धार्मिक कृत्ये नाहीत. सर्वोच्च न्यायालयानेही हाच निर्णय कायम ठेवला आहे. देशातील न्यायालयांनी हे लक्षात ठेवले पाहिजे की पर्यावरणाचे रक्षण करणे हे त्यांचे कर्तव्य आहे, कारण ते सामान्य माणसापेक्षा ते करण्यासाठी खूप चांगल्या स्थितीत आहेत. न्यायाधीशांनी लोकप्रिय किंवा धार्मिक भावनांनी प्रभावित न होता नागरिकांच्या मूलभूत हक्कांचे आणि पर्यावरणाचे रक्षण केले पाहिजे. जर न्यायाधीशांनी त्यांचे मूलभूत कर्तव्य पार पाडले नाही तर कोण करेल, असा सवालही निवृत्त न्या. अभय ओक यांनी केला.

**वायू प्रदूषणावर केली होती सुनावणी**

न्यायमूर्ती अभय ओक आणि न्यायमूर्ती नरसिंह यांच्या एकाच न्यायासनाने २०२३ मध्ये दिल्ली-एनसीआरमध्ये फटाक्यांमुळे होणाऱ्या वायू प्रदूषणाच्या प्रकरणाची सुनावणी केली होती. त्यांनी दिल्लीसह देशभरात फटाक्यांवरील बंदीची कडक अंमलबजावणी करण्याचे आदेश दिले होते.

## चीनचा अंतराळवीर २०३० पर्यंत चंद्रावर उतरणार

◆ **बीजिंग, ३१ ऑक्टोबर**

चंद्रावर मानव पाठवण्याशी संबंधित सर्व संशोधन आणि विकास प्रकल्प सुरळीतपणे सुरू असून २०३० चीनचे अंतराळवीर चंद्रावर उतरणार असल्याची माहिती चीनच्या मानवयुक्त अंतराळ कार्यक्रमाचे प्रवक्ते झांग जिंगबो यांनी गुरुवारी दिली.

जिंगबो यांनी सांगितले की, चीनच्या अंतराळवीरांचा एक गट चंद्रावर जाणार आहे आणि तिथे बांधकाम करण्यासाठी जागेचा शोध घेणार आहे. हे अभियान अंतराळात आघाडीवर राहण्याच्या चीनच्या योजनेचा एक भाग आहे. सध्या लॉन्ग मार्च-१० रॉकेट, चंद्र लॅण्डिंग सूट आणि एक्सप्लोरेशन व्हेईकल्ससारखे प्रकल्प वेगाने प्रगती करीत आहेत. तियांगोंग अंतराळ स्थानकावर नियमित संशोधनदेखील सुरू ठेवत आहे. अंतराळ स्थानकावर अंतराळवीरांचा एक गट लवकरच अंतराळ स्थानकावर जाणार आहे.

वातावरणाच्या परिणामांचा अभ्यास करण्यासाठी हे पथक चार उंदीर सोबत घेऊन जाणार आहे. दरम्यान, अमेरिकेने चीनच्या अंतराळ कार्यक्रमाचे पीपल्स लिबरेशन आर्मीशी थेट संबंध असल्याबद्दल सुरक्षा चिंता व्यक्त केली होती. (वृत्तसंस्था)

## तेजश्री प्रधान दिसणार नवीन वेबसिरीजमध्ये

**मुंबई :** तेजश्री प्रधान सध्या 'वीण दोघांतली तुटेना' या मालिकेत दिसते आहे. नुकतेच तिने समाजमाध्यमावर एक व्हिडीओ शेअर केला आहे. या व्हिडीओवर तिने 'नवीन वेबसिरीज आणि नवीन काम' असे इंग्रजीमधील हॅशटॅग दिले आहे. यावरून ती आता एका नव्या वेबसिरीजमध्ये दिसणार असल्याचेही समोर आले आहे. ही वेबसिरीज कुठे प्रदर्शित होणार आणि कधी येणार याबाबत तिने अद्याप कोणताही खुलासा केलेला नाही. या नवीन येणाऱ्या वेबसिरीजसाठी ती 'वीण दोघांतली तुटेना' ही मालिका सोडणार आहे का हे देखील अद्याप स्पष्ट झालेले नाही.

**खरेदीपूर्व जाहीर नोटीस**

तमाम लोकांस कळविण्यात येते की,

**मिळकतीचे वर्णन :-** डि. व सब डि. सोलापूर, तालुका उत्तर सोलापूर पैकी सोलापूर शहर महानगरपालिका हद्दवाढ भागातील कसबे सोलापूर येथील जुना सर्व्हे नं. १२२/१ क व १२२/१ ड यांसी नविन सर्व्हे नं.१२०/१/क/१/ड यापैकी गंगाई केकडे नगर मधील कोटा ताता नगर या नांवाने ओळखले जाणारे वसाहती मधील बिनशेती प्लॉट नं. ३९० याचे क्षेत्र ४५.१२ चौ. मीटर इतकी आहे.

यासी चतुःसीमा :- पुर्वेस :-रस्ता, दक्षिणेस :-प्लॉट नं.३८९, पश्चिमेस : प्लॉट नं. ३८५, उत्तरेस :-प्लॉट नं.३९१ येणेप्रमाणे चतुः सीमेतील खुली प्लॉट जागा त्यातील दगड, माती वगैरे तदंगभुत वस्तूंसह.

ही मिळकत, १. निलेश केशव मच्छा, २. सौ. लावण्या निलेश मच्छा, रा. ६०४, साखर पेठ, सोलापूर यांचे मालकीचे असून त्यांनी ही प्लॉट जागा आमचे अशिलास मालकी व कब्जेवहिवाटीचे हक्काने कायम खुष खरेदीने देण्याचे ठरवून इसारा पावती लिहून दिला आहे. त्यांनी ही प्लॉट जागा निर्वेध, निजोखमी व बिनबोजाची असल्याचे खात्री दिली आहे, तरीही या प्लॉट जागेवर कोणाचाही, कोणताही, कसलाही गहाण, दान, बक्षिस, इसारा पावती, साठेखत, खरेदीखत, वारसा, पोटगी, टाच, बोजा, जप्ती, कोर्ट केसेस अथवा अन्य कोणत्याही स्वरुपाचा हक्क, हितसंबंध वा वाद असल्यास, त्यांनी खालील नमूद पत्यावर योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी सदर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून सात दिवसांचे आत लेखी कळवावे. मुदतीत कोणाचेही हरकत न आल्यास सदर मिळकतीवर कोणाचाही, कोणताही, कसल्याही प्रकारचा हक्क वा हितसंबंध नसल्याचे समजून अथवा त्यांनी तो जाणीवपुर्वक स्वेच्छेने सोडून दिला असे समजून आमचे अशिल ठरल्यानुसार खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. नंतर कोणाचीही तक्रार चालणार नाही, कोणाचीही फसगत होऊ नये म्हणून ही जाहीर नोटीस दिली असे. दि. ३१/१०/२०२५

सही/-
अशिलातर्फे ॲड. राजरतन द. श्रीराम
ऑ. १६२१/१/१, कुचन नगर, सोलापूर-५
मो.नं. ९८८१२४०५१६

# पाकिस्तान तालिबानसमोर झुकला

## तुर्की, कतारच्या मध्यस्थीनंतर युद्धबंदीवर सहमती, अफगाणिस्तानच्या सर्व अटी मान्य



◆ **इस्तांबूल, ३१ ऑक्टोबर**

हिंसक संघर्षांनंतर पाकिस्तान आणि अफगाणिस्तानमध्ये तणावाची परिस्थिती कायम होती. आठवडाभर चाललेल्या चर्चेनंतर सुरुवातीला पाकिस्तान दहशतवादी कारवायांसाठी अफगाणच्या भूमिचा वापर करण्याच अट ठेवली होती. मात्र, अफगाणमधील तालिबान सरकारने त्यांची अट फेटाळून लावल्याने युद्धबंदी करार रखडला होता. शुक्रवारी दोन्ही देशांच्या शिष्टमंडळाची तुर्कीच्या इस्तांबूल येथे पुन्हा बैठक झाली. यावेळी पाकिस्तानने अफगाणच्या अटी मान्य करीत करारावर सहमती दर्शवली.

तुर्की आणि कतारच्या मध्यस्थीनंतर दोन्ही देशांनी युद्धबंदी करार केला आणि शांतता कायम ठेवण्याचे मान्य केले. दोन्ही देशात मध्यस्थी करणाऱ्या तुर्कीने युद्धबंदी कराराची माहिती दिली. या महिन्यात प्राणघातक संघर्षांनंतर पाकिस्तानने अफगाणची राजधानी काबूल आणि कंदहार शहरावर हवाई हल्ले केले. तुर्कीच्या परराष्ट्र मंत्रालयाने सांगितले की २५-३० ऑक्टोबरच्या चर्चेनंतर, सर्व पक्षांनी शांतता राखण्यासाठी आणि उल्लंघन करणाऱ्यांवर दंड आकारण्यासाठी एक देखरेख आणि पडताळणी यंत्रणा स्थापन करण्यास सहमती दर्शविली. ६ नोव्हेंबर रोजी इस्तंबूलमध्ये ही यंत्रणा कशी अंमलात आणायची हे ठरवण्यासाठी एक पुढची बैठक होईल. तुर्की आणि कतार कायमस्वरूपी शांतता आणि स्थिरतेसाठी दोन्ही बाजूंशी सहकार्य सुरू ठेवण्यास तयार आहेत. तालिबान सरकारचे प्रवक्ते जबीहुल्लाह मुजाहिद यांनी सांगितले की दोन्ही बाजूंनी भविष्यातील बैठकांमध्ये चर्चा सुरू ठेवण्यास सहमती दर्शविली.

**संघर्षासाठी पाकच्या हवाई हल्ल्याला धरले जबाबदार**

मुजाहिद यांनी सांगितले की, युद्धविरामासाठी पाकिस्तानने आमच्या सर्व अटी मान्य केल्या आहे. बैठकीत दोन्ही देशातील संघर्षासाठी पाकने केलेल्या हवाई हल्ल्याला जबाबदार धरण्यात आले. इस्तंबूलमध्ये झालेल्या बैठकींचा उद्देश १८-१९ ऑक्टोबर रोजी दोहा येथे झालेल्या युद्धबंदी कराराला बळकटी देणे होता. सर्व पक्षांनी युद्धबंदी कायम ठेवण्यास सहमती दर्शविली. अफगाणिस्तान आणि पाकिस्तानमधील शाश्वत शांतता आणि स्थिरतेसाठी सहकार्य सुरू ठेवण्यास तयार आहेत. (वृत्तसंस्था)

**पुन्हा कारवाई केल्यास सडेतोड प्रत्युत्तर देणार**

जबीहुल्लाह मुजाहिद यांनी म्हटले, की अफगाणिस्तान त्याचा शेजारी देश पाकिस्तानशी परस्पर आदर आणि हस्तक्षेप न करण्याच्या आधारावर चांगले संबंध प्रस्थापित करण्यास इच्छुक आहे. यापुढे अफगाण भूमीवर हल्ला झाला तर पाकिस्तानला जबाबदार धरले जाईल. तुर्की आणि कतारच्या राजनैतिक प्रयत्नांमुळे आम्ही युद्धविराम आणि शांततेसाठी तयार झालो आहेत.

## इराणमध्ये युरेनियम समृद्धीचे कोणतेही पुरावे नाहीत

**न्यूयॉर्क, ३१ ऑक्टोबर -**

इराणमध्ये युरेनियम समृद्धीचे कोणतेही पुरावे आढळेले नाही, परंतु अणुभट्टी केंद्रांवर हालचाली दिसून आल्या, अशी माहिती आंतरराष्ट्रीय अणुऊर्जा संस्थेचे महासंचालक राफेल मारियानो यांनी दिली. बुधवारी वृत्तसंस्थेला दिलेल्या मुलाखतीत मारियानो म्हणाले, आमच्या तपासणीत इराण सक्रियपणे युरेनियम समृद्ध करीत नसल्याचे दिसून आले, परंतु अलिकडेच अणुभट्टी केंद्रावर हालचाली निदर्शनास आल्याचा दावा इस्त्रायल व अमेरिकेच्या संरक्षण दलाने केला होता. आमच्या निरीक्षणात अणु केंद्राच्या ठिकाणी हालचाली दिसून आल्या. याची खातरजमा करण्यासाठी आमच्या निरीक्षकांना इराणच्या अणुस्थळांपर्यंत पोहोचता आले नाही.

## डिजिटल अरेस्ट फसवणुकीनंतर वृद्धाचा मृत्यू

**पुणे :** डिजिटल अरेस्ट घोटाळ्यात १.२ कोटी रुपयांची फसवणूक झाल्यानंतर अवघ्या एका महिन्यातच पुण्यातील एका वृद्धाचे हृदयविकाराने निधन झाले. यामध्ये फसवणूक करणाऱ्यांनी पोलिस आणि सीबीआय कर्मचारी असल्याचे भासवून त्याला आणि त्याच्या पत्नीला लक्ष्य केले, असे अधिकाऱ्यांनी गुरुवारी सांगितले. हृदयविकाराच्या झटक्याने मृत्यू झाल्यानंतर एका आठवड्याने मंगळवारी या संदर्भात तक्रार दाखल केली, असे सायबर पोलिस स्टेशनच्या अधिकाऱ्यांनी सांगितले. फोन करणाऱ्याने नरेश गोयल मनी लॉण्ड्रिंग प्रकरणाचा उल्लेख केला आणि या प्रकरणातील त्यांचा सहभाग उघडकीस आला असल्याच फसवणूक करणाऱ्याने सांगितले. दुसऱ्या व्हिडीओ कॉल दरम्यान आयपीएस अधिकारी विजय खन्ना आणि सीबीआय अधिकारी दया नायक म्हणून ओळख असलेल्या दोन फसवणूक करणाऱ्यांनी त्याला आणि त्याच्या पत्नीला अटक करण्याची धमकी दिली, असे सायबर पोलिस अधिकाऱ्याने सांगितले.

## १४६६ सुरक्षा कर्मचाऱ्यांना केंद्रीय दक्षता पदक

**नवी दिल्ली :** गृह मंत्रालयाने देशभरातील १४६६ सुरक्षा कर्मचाऱ्यांची केंद्रीय गृहमंत्री दक्षता पदक २०२५ साठी निवड केली आहे. याबाबतची घोषणा गृह मंत्रालयाने शुक्रवारी केली. हे पदक विशेष ऑपरेशन्स, इन्हेस्टिगेशन्स, इंटेलिजन्स आणि फॉरेन्सिक सायन्स या चार क्षेत्रातील कर्मचाऱ्यांच्या उत्कष्ट कामगिरी, व्यावसायिकता आणि त्यांच्या सहकाऱ्यांना प्रेरित केल्याबद्दल प्रदान केली जातील.

**श्री महावीर अर्बन को-ऑप बँक ली., सोलापूर**
५०/६१ पूर्व मंगळवार पेठ, सोलापूर ४१३००२
फोन ०२१७-२६२२९३४४/२६२२९३३

**महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व नियम १९६१ च्या नियम १०७ मधील तरतुदीनुसार स्थावर मालमत्तेचे जाहीर लिलाव व विक्री नोटीस**

ज्या अर्थी सही करणार, विशेष वसुली व विक्री अधिकारी श्री महावीर अर्बन को ऑप बँक ली, सोलापूर हि संस्था महाराष्ट्र कायदा १९६१ अन्वये नोंदणीकृत संस्था असून यांनी महाराष्ट्र सहकारी अधिनियम १९६० व निगम १९६१ च्या नियम १०७ मधील तरतुदीनुसार दिनांक ०६/०६/२०२३ रोजी मागणी नोटीस कर्जदार समर्थ श्रीशैल माळी प्रो. प्रा. श्रीशैल शरणप्पा माळी रा. प्लॉट नं. २१०/११/३ हेरीटेज मनिधारी एम्पायर, अक्कलकोट रोड, सोलापूर व जामीनदार १) कुंडलिक झुंबर खंडागळे रा. खंडागळे वस्ती उळे, दक्षिण सोलापूर २) लक्ष्मण ज्योती जोगदनकर रा. खंडोबाची वाडी सावरगाव ता. तुळजापूर, जि. उस्मानाबाद ३) गीतांजली श्रीशैल माळी रा.प्लॉट नं. २१०/११/३, हेरीटेज मनिधारी एम्पायर, अक्कलकोट रोड, सोलापूर यांना पाठवून रक्कम रुपये ३८,९२,०५८/- या वर दि. १७/११/२०२२ पासून पुढे ही सर्व रक्कम परतफेड होईपर्यंत द.सा.द.शे. १४% दराने होणाऱ्या व्याजाची रक्कमेची मागणी केलेली होती व आहे. सदर नोटीस मिळाल्याच्या दिनांकापासून थकबाकीदार यांनी सदर थकीत रक्कम जमा करण्यास कसूर केलेला आहे. तरी बँकेने महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व नियम १९६१ च्या नियम १०७ मधील तरतुदीनुसार पुढील कारवाई करत, सदर स्थावर मिळकतीचे कायदेशीररित्या ताबा घेतलेले आहे. तरी सदर वर नमूद थकीत कर्ज रक्कमेपोटी बँकेने या खाली नमूद केलेले स्थावर मालमत्तेचा जाहीर लिलाव जेथे आहेत व जैसे आहेत अशा त्या त्या मिळकती त्या त्या परीस्थिती मध्ये विक्री करणार आहेत.

**जाहिर लिलाव व विक्री करण्यात येणाऱ्या मालमत्तेचे वर्णन पुढील**

| मिळकतदाराचे नांव | मिळकतीचे वर्णन | | पूर्व | दक्षिण | पश्चिम | उत्तर | राखीव किंमत |
|---|---|---|---|---|---|---|---|
| श्रीशैल शरणप्पा माळी | डि व सब डि सोलापुर पैकी ता उत्तर सोलापूर, सोमपा हद्दीमधील सर्व्हे न १५/२, सि.स. नं. ६३० सी, पैकी प्लॉट नं. १३. गौरी अपार्टमेंट, तळमजला, फ्लॅट न. २ चटई क्षेत्र ४९.१८ चौ.मी. व बिल्ट अप ५८.४२ चौ.मी (उताऱ्याप्रमाणे सुपर बिल्ट अप क्षेत्र ५२.२ चौ. मी) | | साईड मार्जिन | स्टेअर केस व लिफ्ट | साईड मार्जिन | रिअर मार्जिन | रु. २०,००,०००/- |
| श्रीशैल शरणप्पा माळी | डि व सब डि सोलापूर पैकी ता. दक्षिण सोलापूर, मौजे मुळेगांव, धवल नगर गट नं. १०६/अ + ब / ३ (ऑनलाईन उताऱ्याप्रमाणे गट नं. १०६/अ/ब/३) | प्लॉट नं. १३१ क्षेत्र ९२.९३ चौ.मी | गट नं. १०६/४ | प्लॉट नं. १३१ | ले आ रस्ता | प्लॉट नं. १२९ | रु. २,५०,०००/- |
| | | प्लॉट नं. १३२ क्षेत्र ९२.९३ चौ.मी | गट नं. १०६/४ | प्लॉट नं. १३२ | ले आ रस्ता | प्लॉट नं. १३१ | रु. २,५०,०००/- |
| | | प्लॉट नं. १३३ क्षेत्र ९२.९३ चौ.मी | गट नं. १०६/४ | प्लॉट नं. १३४ | ले आ रस्ता | प्लॉट नं. १३२ | रु. २,५०,०००/- |
| | | प्लॉट नं. १३४ क्षेत्र ९२.८१ चौ.मी | गट नं. १०६/४ | प्लॉट नं. १३५ | ले आ रस्ता | प्लॉट नं. १३३ | रु. २,३०,०००/- |
| | | प्लॉट नं. १३५ क्षेत्र ९२.९३ चौ.मी | गट नं. १०६/४ | प्लॉट नं. १३६ | ले आ रस्ता | प्लॉट नं. १३४ | रु. २,५०,०००/- |
| | | प्लॉट नं. १३६ क्षेत्र ९२.९३ चौ.मी | गट नं. १०६/४ | प्लॉट नं. १३७ | ले आ रस्ता | प्लॉट नं. १३५ | रु. २,५०,०००/- |
| | | प्लॉट नं. १३७ क्षेत्र १३७.५४चौ.मी | गट नं. १०६/४ | ले आ रस्ता | ले आ रस्ता | प्लॉट नं. १३६ | रु. ४,००,०००/- |
| लिलावाचे ठिकाण तारीख व वेळ | | | श्री महावीर अर्बन को-ऑप बँक ली., सोलापूर ६०/६१, पूर्व मंगळवार पेठ, सोलापूर-४१३००२ बंद लिफाफ्यात निविदा सादर करणेचे दि. २५/११/२०२५ वेळ - सकाळी ११ ते दुपारी ३ वाजेपर्यंत निविदा उघडण्याची तारीख व वेळ दि. २६/११/२०२५ सायं. ५:०० वा. | | | | |
| १७/११/२०२२ अखेर येणेबाकी | | | रु. ३८,९२.०५८/- दि. १८.११.२०२२ पासून होणारे व्याज, दंड व्याज व इतर खर्च | | | | |

टिप- १. लिलावात भाग घेणार यांनी राखीव किमतीच्या १०% बयाणा रक्कम लिलाव सुरु होण्यापूर्वी भरणा केल्याशिवाय लिलावात भाग घेता येणार नाही. राखीव किमतीच्या १०% बयाणा रक्कम दि. २४/११/२०२५ पूर्वी दुपारी ३:०० वाजेपर्यंत डिमांड ड्राफ्ट अथवा पे ऑर्डर, आर.टी.जी.एस ने भरणा करावी.
२. लिलावाच्या अटी व शर्ती लिलावाच्या दिवशी लिलावपूर्वी वाचून दाखविण्यात येईल आणि त्या बँकेच्या सूचना पत्रकामध्ये दिले जातील.
३. लिलावापूर्वी थकबाकीदाराने रक्कम भरल्यास लिलाव रद्द करण्यात येईल.
४. लिलाव मिळकतीसंबंधी अधिक माहिती पाहिजे असल्यास बँकेच्या प्रधान कार्यालयात संपर्क साधावा.

**दिनांक - २३/१०/२०२५**
**स्थळ - सोलापूर**

**सही/-**
**विशेष वसुली व विक्री अधिकारी,**
**श्री महावीर अर्बन को-ऑप बँक ली. सोलापूर**

**जाहीर समन्स प्रसिध्दीकरण**

क्रमांक जमा-२/१५५/एसआर/६६/२०२५

**बार्शी येथील मे. तहसिलदार सो. यांचे न्यायालयात**

**१. महादेव सिताराम सोनके,**
रा. ममदापुर ता. बार्शी जि. सोलापूर
विरूध्द
१. पद्मीन मोतीराम चव्हाण,
२. प्रभाबाई शिवाजी शिंदे,
३. गिनाबाई दशरथ शिंदे. -- **सामनेवाला**
४. बाई भुजाबा सोनके,
५. साळूबाई भुजाबा सोनके
रा. पिंपळगाव (पां) ता. बार्शी जि. सोलापूर

**ज्याअर्थी,** सदरचा अर्ज यातील अर्जदाराने तुम्ही सामनेवाला नं. १ ते ५ यांचे विरुध्द मौजे पिंपळगाव (पां) ता. बार्शी येथील जमीन गट नं. ६२/१ चे ७/१२ उताऱ्यावरील इतर हक्कातील पोकळ नावे कमी करणेबाबत अर्ज दाखल केलेला आहे. सदर अर्जाचे कामी तुम्ही हजर राहावे म्हणून तुम्हांला वर अर्जात नमूद केलेल्या अर्जदार यास माहित असलेल्या वरील पत्त्यावर मे. न्यायालयामार्फत यापूर्वी नोटीस पाठविले असता तुम्ही सदर अर्जामध्ये नमूद पत्त्यावर राहता किंवा कसे याबाबत कोणताही खुलासा मिळत नाही व तुम्ही सध्या कोठे राहता याबाबत सखोल चौकशी केली असता तुमचा पत्ता मिळून येत नाही त्यामुळे तुमचे विरुध्दचे सदर अर्जाच्या नोटीसीची बजावणी होत नाही.

**त्याअर्थी,** तुम्ही सामनेवाला नं. १ ते ५ यांनी सदर अर्जाचे कामी सदर जाहीर समन्स प्रसिध्द झालेपासून ३० दिवसाचे आत अगर सदर प्रकरणाची पुढील नेमली ता. ०४/१२/२०२५ रोजी दुपारी ३.०० वाजता मे. कोर्टात या अर्जाचे कामी स्वतः अगर कुलमुखत्यार यांचे मार्फत विधिज्ञामार्फत हजर राहून व आपला पत्ता मेमो दाखल करुन तुमचे म्हणणे याकामी दाखल करावे. तुम्ही सदर अर्जाचे कामी नेमलेले तारखेस हजर न राहिल्यास अगर तुमचे म्हणणे दाखल न केल्यास तुमचे कांही म्हणणे नाही, असे समजून मे. कोर्टाचे तुमचे विरुध्द एकतर्फा आदेश होतील. मागाहून तक्रार चालणार नाही.

कळावे हे जाहीर समन्स प्रसिध्दीकरण मे. कोर्टाचे सही शिक्क्यानिशी दिले. दिनांक :- ३०/१०/२०२५

**सही/-**
**(एफ.आर.शेख)**
**तहसिलदार बार्शी**

**मध्य रेल्वे**

**नोव्हेंबर २०२५ महिन्यासाठी ई-लिलाव कार्यक्रम**

भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने आणि त्यांच्या वतीने, मुख्य मुख्य साहित्य व्यवस्थापक नोव्हेंबर २०२५ दरम्यान खालील वेळापत्रकानुसार भंगार विक्रीसाठी ई-लिलाव आयोजित करतील:

**महत्वाची सूचना:** नजीकच्या भविष्यात वर्तमानपत्रात ई-लिलाव कार्यक्रमाचे प्रकाशन बंद केले जाईल. खरेदीदारांना मध्य रेल्वे वेबसाइट ... ला भेट देण्याचा सल्ला देण्यात येत आहे.

| लिलाव संचालक अधिकारी | लिलावाची तारीख आणि दिवस | | | | संपर्क क्रमांक |
|---|---|---|---|---|---|
| सीनियर डीएमएम/ एनजीपी | ०३.११.२०२५ सोमवार | १०.११.२०२५ सोमवार | १८.११.२०२५ मंगळवार | २४.११.२०२५ सोमवार | ७२१९६१२७५० |
| सीनियर डीएमएम/ बीएसएल एमएम आर डेपोसह | ०४.११.२०२५ मंगळवार | ११.११.२०२५ मंगळवार | १९.११.२०२५ बुधवार | २५.११.२०२५ मंगळवार | ७२१९६११७५१ |
| एसआर. डीएमएम/पीए | ०६.११.२०२५ गुरुवार | १३.११.२०२५ गुरुवार | २०.११.२०२५ गुरुवार | २६.११.२०२५ बुधवार | ७२१९६१३७५० |
| सीनियरडीएमएम/ बीबी | ०७.११.२०२५ शुक्रवार | १४.११.२०२५ शुक्रवार | २१.११.२०२५ शुक्रवार | २७.११.२०२५ गुरुवार | ८८२८११९७५० |
| सीनियर डीएमएम/ एसयूआर | ०६.११.२०२५ गुरुवार | १२.११.२०२५ बुधवार | २०.११.२०२५ गुरुवार | २८.११.२०२५ शुक्रवार | ७२१९६१४७५० |
| उपमुख्यमंत्री (एम) पीआर साठी (जी) | ०३.११.२०२५ सोमवार | १०.११.२०२५ सोमवार | १८.११.२०२५ मंगळवार | २४.११.२०२५ सोमवार | ८८२८११९७५५ |
| नियुक्त मुख्य कार्यकारी अधिकारी (एम) | ०६.११.२०२५ गुरुवार | १३.११.२०२५ गुरुवार | २०.११.२०२५ गुरुवार | २६.११.२०२५ बुधवार | ८८२८११९७५५ |
| नियुक्त मुख्य कार्यकारी अधिकारी (सीडब्ल्यूई) | ०४.११.२०२५ मंगळवार | ११.११.२०२५ मंगळवार | १९.११.२०२५ बुधवार | २५.११.२०२५ मंगळवार | ८८२८११९७७० |
| सिनियर मुख्य कार्यकारी अधिकारी | ०३.११.२०२५ सोमवार | १०.११.२०२५ सोमवार | १८.११.२०२५ मंगळवार | २४.११.२०२५ सोमवार | ८८२८११९७५० |
| नियुक्त मुख्य कार्यकारी अधिकारी (एसीएल) | ०७.११.२०२५ शुक्रवार | १४.११.२०२५ शुक्रवार | २१.११.२०२५ शुक्रवार | २७.११.२०२५ गुरुवार | ७२१९६११७५० |

**टीप:** आवश्यक असल्यास पात्र लॉटसाठी लिलावाच्या मूळ तारखेपासून आणि वेळेपासून पुढील कामकाजाच्या दिवशी पुरवणी लिलाव केला जाईल. रेल्वे प्रशासनाला स्वतःच्या विवेकबुद्धीनुसार कोणताही पुरवणी लिलाव रद्द करण्याचा अधिकार आहे.

**टीप: अ)** ई-लिलावातून कोणताही लॉट मागे घेण्याचा अधिकार रेल्वे राखून ठेवते. त्यानंतरच्या कोणत्याही लिलावात कोणत्याही डेपो/विभागातील कोणत्याही लॉटचा कोणत्याही योग्य पद्धतीने लिलाव करण्याचा अधिकार रेल्वे राखून ठेवते. तसेच कोणत्याही डेपो/विभागातील न विकलेले लॉट मध्य रेल्वेच्या इतर डेपो/विभागाच्या नंतरच्या लिलावात विकले जाऊ शकतात **ब)** सरकारच्या धोरणानुसार, जिथे भंगार साहित्याच्या पुनर्वापरात पर्यावरण आणि प्रदूषणाच्या समस्यांचा समावेश असेल, तिथे असे लॉट केवळ अधिकृत बोलीदारांनाच विकले जातील ज्यांना केंद्राने जारी केलेले वैध परवाने आहेत.

प्रदूषण नियंत्रण मंडळ (CPCB)/राज्य प्रदूषण नियंत्रण मंडळ (SPCB). क) ई-लिलाव कॅटलॉग www.ireps.gov.in या वेबसाइटवर उपलब्ध असेल. ड) ई-लिलाव डिजिटल स्वाक्षरी, नोंदणी प्रक्रिया आणि सहभाग इत्यादींबाबत कोणत्याही प्रकारची मदत हवी असल्यास, कृपया वरील संबंधित लिलाव संचालक अधिकाऱ्यांशी किंवा उपमुख्यमंत्री / विक्री / मुख्यालय, मोबाईल क्रमांक ८८२८११०७६१, पत्ता: dycmm.s.cstm@gmail.com किंवा dycmms@cr.railnet.gov.in वर संपर्क साधा.

**मुख्य मुख्य साहित्य व्यवस्थापकासाठी** 611

रेल्वे फाटक को बंद स्थिति में पार करना मना है

**जाहीर समन्स**

**मे. उपनिबंधक, सहकारी संस्था, (परसेवा), सोलापूर जिल्हा नागरी सहकारी बँक्स् को-ऑप असोसिएशन लि., सोलापूर**
११३ (अ), सिध्देश्वरपेठ, स्टेट बँक ऑफ इंडीया, ट्रेझरी शाखेशेजारी, सोलापूर

**समर्थ सहकारी बँक लि., सोलापूर** — **अर्जदार बँक**
अंत्रोळीकर शॉपींग सेंटर, दत्तचौक, सोलापूर
**विरूध्द**
खालील तपशीलातील नमूद केलेले बँकेचे थकबाकीदार सभासद — **जाब देणार**

| अ. नं. | केस नंबर | दावा रक्कम | जाब देणार क्रमांक | जाब देणार यांचे नांव व पत्ता |
|---|---|---|---|---|
| १ | ७२५/२५-२६ | ३६४५२.०० | १ | **चौगुले शिला सुधाकर** रा. प्लॉट क्र. ८०/५/०१, मंगळवेढेकर नगर, मोहीर पाटील विद्यालयाजवळ, ता. पंढरपूर, सोलापूर. |
| | | | २ | **प्रभावती पांडुरंग शिंदे** रा. प्लॉट क्र. ८०/२/४, हॉटेल नागालैंड मागे, मंगळवेढेकर नगर, ता. पंढरपूर, सोलापूर. |
| | | | ३ | **अर्चना नागेश लावंड** रा. प्लॉट क्र. ६२०, जुनी पेठ, कोळे गल्ली, ता. पंढरपूर, सोलापूर. |
| | | | ४ | **रेश्मा रवींद्र पोतदार** रा. गट ८०/२, प्लॉट क्रमांक ९, नागालैंड हॉटेलच्या मागे, महेश गृहनिर्माण संस्था, लिंगे माळा, ता. पंढरपूर, सोलापूर, |
| २ | ७२६/२५-२६ | ४०४४७.०० | १ | **पवार कविता सुनील** रा. भूखंड क्र. २३, सावकार नगर, माऊली किराणा दुकन मागे, नागालैंड हॉटेल मागे, ता. पंढरपूर, सोलापूर |
| | | | २ | **अश्विनी सोमनाथ कलागते** रा. प्लॉट नं. २२/८० डी, सावकार नगर, तलाठी कॉलनी, इसबावी, ता. पंढरपूर, सोलापूर, |
| | | | ३ | **रंजना सूर्यकांत बिटकर** रा. प्लॉट नं. ५, मंगळवेढेकर नगर, लिंक रोड, ता. पंढरपूर, सोलापूर, |
| | | | ४ | **सोनाली सागर चौगुले** रा. मंगळवेढेकर नगर, ता. पंढरपूर, सोलापूर. |
| ३ | ७२७/२५-२६ | ४६८१४.०० | १ | **बिटकर रंजना सूर्यकांत** रा. प्लॉट नं. ५, मंगळवेढेकर नगर, लिंक रोड, ता. पंढरपूर, सोलापूर. |
| | | | २ | **अश्विनी सोमनाथ कलागते** रा. प्लॉट नं. २२/८० डी २, सावकार नगर, तलाठी कॉलनी, इसबावी, ता. पंढरपूर, सोलापूर. |
| | | | ३ | **कविता सुनील पवार** रा. भूखंड क्र. २३, सावकार नगर, माऊली किराणा दुकन मागे, नागालैंड हॉटेल मागे, ता. पंढरपूर, सोलापूर. |
| | | | ४ | **सोनाली सागर चौगुले** रा. मंगळवेढेकर नगर, ता. पंढरपूर, सोलापूर. |
| ४ | ७२८/२५-२६ | ३३८९८.०० | ३ | **ज्योती श्रीपती ओव्हाळ** रा. अव्हे, जंभूड, ता. पंढरपूर, सोलापूर. |
| ५ | ७२९/२५-२६ | ३९३०६.०० | १ | **ओव्हाळ ज्योती श्रीपती** रा. अव्हे, जंभूड, ता. पंढरपूर, सोलापूर. |
| ६ | ७३०/२५-२६ | ४९८०५.०० | ४ | **ज्योती श्रीपती ओव्हाळ** रा. अव्हे, जंभूड, ता. पंढरपूर, सोलापूर, |
| ७ | ३९७/२५-२६ | ७८९८२.०० | १ | **शेख शयदा महंमद** रा. मुसलमान गल्ली, पोखरपूर, ता. मोहोळ, सोलापूर. |

याकामी अर्जदार यांनी दाखल केलेल्या अर्जातील जाब देणार यांना रजिस्टर पोस्टाने समन्स पाठविण्यात आलेले आहे. परंतू जाब देणार समन्स रूजू न झाल्याने/त्यांचा नवीन पत्ता उपलब्ध नसल्यामुळे सदरचे जाहीर समन्स देत आहोत.

उपनिर्दिष्ट अर्जासंबंधी आपले म्हणणे मांडण्यासाठी स्वतः जातीने वार- मंगळवार दि १८.११.२०२५ रोजी दुपारी १२.०० वाजता दाव्यासंबंधीच्या कागदपत्रासह आपण या कार्यालयात हजर व्हावे.

या नोटीसीद्वारे जाब देणार यांना असेही कळविण्यात येते की, वरिल तारखेस आपण वेळेवर हजर न राहिल्या आपल्या गैरहजेरीत अर्जाची सुनावणी घेण्यात येईल. याची कृपया नोंद घ्यावी.

त्याचप्रमाणे वरील तारखेस अगर तत्पुर्वी आपला संपूर्ण पत्ता कळविण्यास कसुर केल्यास आपला बचाव रद्द समजण्यात येईल.

म्हणून दिनांक ३१/१०/२५ रोजी माझी सही व कार्यालयीन मुद्रेसह हे जाहीर समन्स दिले.

**सही/-**
**उपनिबंधक, सहकारी संस्था, (परसेवा) सोलापूर जिल्हा नागरी सहकारी बँक्स् को-ऑप. असोसिएशन लि., सोलापूर**

# शहरातील अनधिकृत खोक्यांची यादी तयार करा : आयुक्त

- वजन काटा प्रमाणपत्रासाठी पोलीस अहवाल, मनपाचे ना-हरकत प्रमाणपत्र आवश्यक
- महामार्गावरील वाहतूक व्यवस्थापन, अतिक्रमणाबाबत आढावा बैठक
- अनधिकृत खोक्यांमुळे वाहतुकीस अडथळे



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३१ ऑक्टोबर-**
येथील वजन काट्यांची तपासणी करून प्रमाणपत्र देण्यात आले असून ते डिसेंबर २०२५ पर्यंत वैध आहे. पुढील प्रमाणपत्र देण्यापूर्वी पोलीस अहवाल व मनपाचे ना-हरकत प्रमाणपत्र आवश्यक राहील तसेच शहरातील अनधिकृत खोक्यांमुळे वाहतूक अडथळे निर्माण होत असल्याने त्या ठिकाणांची यादी चार दिवसांत मनपा अतिक्रमण नियंत्रण विभागाकडे सादर करण्याचा निर्णय महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत घेण्यात आला.

सोलापूर महानगरपालिकेच्या वतीने आज सोलापूर-हैद्राबाद महामार्गावरील जुने विडी घरकुल वळण परिसरातील वजन काटे, अतिक्रमण आणि वाहतूक व्यवस्थापनासंदर्भात आढावा बैठक महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली. या बैठकीस सहाय्यक पोलीस आयुक्त (वाहतूक) सुधीर खिरडकर, अतिक्रमण विभागाचे नियंत्रण अधिकारी तपन डंके, विभागीय अधिकारी रऊफ सरकाजी, माजी नगरसेवक विठ्ठल कोटा, कृषी उत्पन्न बाजार समितीचे प्र. सचिव अतुलसिंग राजपूत, उपनियंत्रक अ.ध. गेटमे, चंदन काटा चालक/मालक नविन सोनीमिंदे, प्रविण साका, रियाज मोमीन, भास्कर मरगल आदी पोलीस विभाग, वैधमापनशाळा, कृषी उत्पन्न बाजार समिती आणि राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण (NHI) यांचे अधिकारी उपस्थित होते.

या बैठकीत सहाय्यक पोलीस आयुक्त (ट्रॅफिक) सुधीर खिरडकर म्हणाले, चंदन काटा परिसरातील सर्व्हिस रोडवर जड वाहने उभी केल्याने पादचारी मार्ग अडवला जातो आणि वाहतूक कोंडी निर्माण होते. त्यामुळे गेल्या काही वर्षांपासून वारंवार अपघातांच्या घटना घडत आहेत. यावर उपाययोजना म्हणून तीन दिवसांत अपघातांचा अहवाल, दंड आकारणीची माहिती आणि संबंधित छायाचित्रे सादर करण्याचे निर्देश आयुक्तांनी दिले. वैधमापनशाळा उपनियंत्रक अ.ध. गेटमे यांनी सांगितले की, चंदन काटा येथील वजन काट्यांची तपासणी करून प्रमाणपत्र देण्यात आले असून ते डिसेंबर २०२५ पर्यंत वैध आहे. तथापि, पुढील प्रमाणपत्र देण्यापूर्वी पोलीस अहवाल व मनपाचे ना-हरकत प्रमाणपत्र आवश्यक राहील, असे त्यांनी स्पष्ट केले. बैठकीत समर्थ मेडिकल स्टोअर परिसरातील 'एल' आकाराच्या रस्त्यांवर उभी राहणारी वाहने व अपघातांच्या घटनांबाबतही चर्चा झाली. शाळकरी विद्यार्थ्यांच्या सुरक्षेच्या दृष्टीने राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण कडून सर्व्हिस रोड आणि डिव्हायडरची दुरुस्ती तातडीने करण्याच्या सूचना देण्यात आल्या. कृषी उत्पन्न बाजार समितीच्या प्रतिनिधींनी सांगितले की, बाजार समितीच्या हद्दीतच दोन वजन काटे कार्यरत असल्याने बाहेरील काट्यांची गरज नाही. त्यामुळे बाजार परिसरातील वाहतूक अधिक सुलभ होईल, असे त्यांनी नमूद केले.शहरातील अनधिकृत खोक्यांमुळे वाहतूक अडथळे निर्माण होत असल्याचे पोलिसांनी निदर्शनास आणले. या संदर्भात अडथळा निर्माण करणाऱ्या ठिकाणांची यादी चार दिवसांत मनपा अतिक्रमण नियंत्रण विभागाकडे सादर करण्याचे निर्देश देण्यात आले.

### मुदतीत अहवाल सादर करून आवश्यक कार्यवाही करावी : आयुक्त डॉ. ओम्बासे

बैठकीच्या शेवटी आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी सर्व विभागांना ठरवलेल्या मुदतीत अहवाल सादर करून आवश्यक कार्यवाही हाती घेण्याचे स्पष्ट निर्देश दिले. सोलापूर शहरातील वाहतूक सुसूत्रता, नागरिकांची सुरक्षितता आणि अतिक्रमण निर्मूलनासाठी मनपा प्रशासन व पोलीस विभाग संयुक्तपणे कार्य करणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

## महत्वाचे...



### बार्शी पोलीस ठाण्याच्यावतीने एकता दौड

**बार्शी, दि. ३१ ऑक्टोबर-**
बार्शी शहर पोलीस ठाणे आयोजित सरदार वल्लभाई पटेल यांच्या १५० व्या जयंतीनिमित्त एकता दौड (RUN FOR UNITY) चे आयोजन करण्यात आले. सदर एकता दौड मध्ये सामाजिक संघटना, पत्रकार, वकील, शिक्षक, पोलीस भरती करणारे विद्यार्थी, पोलीस अधिकारी व अंमलदार यांच्यसह वेगवेगळ्या क्षेत्रातील मान्यवर असे एकूण २०० ते २५० जण सहभागी झाले होते. एकता दौड कार्यक्रमा दरम्यान राष्ट्रीय एकात्मतेची शपथ घेवून बार्शी शहरातील मुख्य रस्त्यावर एकता दौड घेण्यात असून सहभाग घेतलेल्या स्पर्धकांना प्रमाणपत्र व पुष्पगुच्छ देऊन गौरविण्यात आले आहे. एकता दौड बार्शी शहर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक बालाजी कुकडेंच्या मार्गदर्शनाखाली निघाली.



### पूरग्रस्तांना आयडीएफ फायनान्स कंपनीकडून मदतीचा हात

**अक्कलकोट, दि. ३१ ऑक्टोबर-**
आयडीएफ फायनान्स कंपनी, अक्कलकोट शाखेच्या वतीने पूरग्रस्तांना मदतीचा हात देण्यात आला आहे. कंपनीच्या सामाजिक उत्तरदायित्व उपक्रमांतर्गत पितापूर आणि सिरसी या गावांतील पूरग्रस्त व गरजू नागरिकांना चादरी तसेच आवश्यक जीवनावश्यक वस्तूंचे वाटप करण्यात आले. या मदतकार्यामध्ये कंपनीचे व्यवस्थापकीय संचालक एम. डी. एन. एम. पाटील, महाराष्ट्र विभागीय व्यवस्थापक बावकर, क्षेत्रीय व्यवस्थापक दत्ता कांबळे, तसेच अक्कलकोट शाखेचे अधिकारी कृष्णा हावळे, रेवणसिद्ध वाघमारे, आणि उठज दिनेश सुतार व किरण धावणे यांनी सक्रिय सहभाग नोंदविला. कंपनीच्या सीएसआर फंडातून राबविण्यात आलेल्या या उपक्रमामुळे पूरग्रस्त कुटुंबांना दिलासा मिळाला असून स्थानिक नागरिकांनी आयडीएफ फायनान्स कंपनीचे मनःपूर्वक आभार मानले.

### कुत्रा आडवा आल्याने दुचाकीस्वार पडून जखमी

**सोलापूर, दि. ३१ ऑक्टोबर-**
कुत्रा आडवा आल्याने दुचाकीस्वार पडून जखमी झाला.बापू श्रीरंग थोरबोले (वय ५०, रा. मोरवंची, ता. मोहोळ) असे जखमी दुचाकीस्वाराचे नाव आहे. ३० ऑक्टोबर रोजी रात्री दहाच्या सुमारास बापू थोरबोले हे दुचाकीवरून लोकमंगल कारखाना ते मोरवंची या रस्त्याने जात होते. त्यावेळी मोरवंची पासून अलीकडे कुत्रा आडवा आल्याने थोरबोले हे दुचाकीवरून पडून जखमी झाले. त्यामुळे त्यांना उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

### चारचाकीच्या धडकेने दोघे जखमी

**सोलापूर, दि. ३१ ऑक्टोबर-**
चारचाकी वाहनाच्या धडकेने दुचाकीवरील दोघे जखमी झाले.बनसिध्द गुरुशांत भरले (वय ५२), सदिच्छा बनसिध्द भरले (वय १७, रा. विश्राम नगर, होटगी नाका, सोलापूर) अशी जखमींची नावे आहेत. ३० ऑक्टोबर रोजी रात्री बनसिध्द भरले व सदिच्छा भरले हे दोघे दुचाकीवरून गांधीनगर ते होटगी नाका दिशेने जात होते. त्यावेळी महावीर चौकाजवळ अज्ञात चारचाकी कारने दुचाकीला पाठीमागून धडक दिली. त्यामध्ये दुचाकीवरील दोघे जखमी झाल्याने त्यांना उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.



# शहरात १४ ठिकाणी मनपातर्फे राबविण्यात आली आजोरा उचलण्याची मोहीम

- महापालिका अतिरिक्त आयुक्त वीणा पवार, सहाय्यक आयुक्त शशिकांत भोसले यांनी केली पाहणी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३१ ऑक्टोबर-**
स्वच्छ सोलापूर सुंदर सोलापूर या उपक्रमांतर्गत शहरात रस्त्यावरील पडलेला आजोरा ,मलबा, बांधकामातील अवशेष, कचरा उचलण्याची विशेष मोहीम आज शनिवारी नियमितपणे राबविण्यात आली. शहरातील १४ ठिकाणी ही मोहीम यशस्वीपणे राबविण्यात आली. '' स्वच्छ सोलापूर सुंदर सोलापूर'' या उपक्रमाच्या अनुषंगाने सोलापूर महानगरपालिकेचे आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांच्या आदेशान्वये तसेच अतिरिक्त आयुक्त विणा पवार यांच्या मार्गदर्शनाखाली सोलापूर शहरात रस्त्यावरील पडलेला आजोरा ,मलबा, बांधकामातील अवशेष, कचरा उचलण्याची विशेष मोहीम दर शुक्रवारी व शनिवारी नियमितपणे राबविण्यात येत आहे.

आज दि. ३१ ऑक्टोबर २०२५ रोजी सकाळपासून या मोहिमेअंतर्गत शहरातील विविध भागांमध्ये मोठ्या प्रमाणावर आजोरा उचलण्यात आला. या अंतर्गत कुमार चौक, स्टेशन रोड, शेळगी ब्रिज, प्रियांका चौक, अक्कलकोट रोडवरील हवामान कार्यालय परिसर, नई जिंदगी रोड पारशी विहीर, सितारा चौक, आसरा चौक, किल्लेदार मंगल कार्यालय परिसर, टिळक विद्यापीठ समोरील रस्ता, मंगळवेढा रोड मरिआई चौक, कोयना नगर, गवळी वस्ती, मुस्लिम पा पेठ, बीप मार्केट, गुरुनानक चौक व शानदार चौक या ठिकाणी अजोरा उचलण्यात आला.

आजोरा उचलण्याची मोहीम सुरू असताना अतिरिक्त आयुक्त वीणा पवार व सहाय्यक आयुक्त शशिकांत भोसले यांनी स्वतः शहरातील विविध मोहिमेतील भागांना भेटी दिल्या. त्यांनी सुरू असलेल्या कामांची पाहणी केली. या वेळी त्यांनी मुख्य आरोग्य निरीक्षक, आरोग्य अधिकारी आणि कर्मचाऱ्यांशी चर्चा करून ही मोहीम अधिक प्रभावीपणे कशी राबवता येईल यासाठी आवश्यक त्या उपाययोजना करण्याचे सूचना दिल्या.

घनकचरा व्यवस्थापन विभागाचे सहायक आयुक्त शशिकांत भोसले, मुख्य सफाई अधीक्षक नागनाथ बिराजदार यांच्या सह अधिकारी, कर्मचारी व विभागीय अधिकारी यांनी या मोहिमेत सक्रीय सहभाग घेतला. या उपक्रमामुळे शहरातील स्वच्छता सुधारण्यास मोठी मदत झाली असून नागरिकांना स्वच्छ आणि सुंदर सोलापूर निर्मितीचा संदेश देण्यात आला. आपल्या परिसरात आजोरा किंवा बांधकामातील अवशेष रस्त्यावर टाकू नयेत. आजोरा उचलण्यासंदर्भात नागरिकांनी संबंधित विभागाशी संपर्क साधून योग्य प्रकारे विल्हेवाट लावावी, जेणेकरून ''स्वच्छ सोलापूर - सुंदर सोलापूर'' हे स्वप्न साकार करता येईल, असे आवाहन महापालिका अतिरिक्त आयुक्त वीणा पवार यांनी केले आहे.

**अशी वापरण्यात आली यंत्रणा**

ही मोहिम शहरातील १४ ठिकाणांवरील आजोरा यशस्वीरित्या हटवला या मोहिमेसाठी घनकचरा विभागाच्या माध्यमातून १ जेसीबी, ४ डंपर तसेच विभागीय कार्यालयांकडून ८ जेसीबी व ८ डंपर अशी यंत्रसामग्री वापरण्यात आली. या माध्यमातून आज एकूण १४ ठिकाणाहून सुमारे ५६ खेपा करून आजोरा उचलण्याचे काम यशस्वीपणे पूर्ण करण्यात आले.



# गोपाष्टमीनिमित्त रंगनाथ गोशाळेत गोमातेचे पूजन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३० ऑक्टोबर-**
गोपाष्टमीचे औचित्य साधून जुना विडी घरकुल येथील रंगराज नगर या भागातील श्री रंगनाथ गोशाळा येथे आम्ही श्रीराम सेना सोलापूर व प्राणिन फाउंडेशन सोलापूर व तसेच सोलापुरातील इतर हिंदुत्ववादी संघटनेचे पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी मिळून उत्साहवर्धक व जल्लोषपूर्ण वातावरणात आर्य सनातन वैदिक पारंपारिक पद्धतीने गोशाळेतील देशी गाईंचे मंत्रोपच्चार करून विधिवत गो पूजन करून गोमातेची आरती करण्यात आली व तसेच भगवान श्री रंगनाथ मंदिर मध्ये सर्व पदाधिकारी व कार्यकर्त्यांच्या वतीने आरती करण्यात आली.

तद्नंतर श्रीराम सेनेचे जिल्हाध्यक्ष या नात्याने शितल परदेशी यांनी आपले मनोगत व्यक्त करताना गोपाष्टमीच्या या पवित्र दिनी गोपूजनाचे महत्त्व सांगायचे झाले तर या पवित्र दिनी भगवान श्रीकृष्णांनी देशी गाईंना रानात, वनात चरायला नेण्यासाठी सुरुवात केली होती. याच पवित्र दिनी भगवान श्रीकृष्णांनी देखील गोपूजन केले होते असे या पवित्र दिनाचे महात्म्य आहे असे सांगितले. तद्नंतर त्यांनी एक खंत देखील व्यक्त केली की भारताची



जगातील कृषिप्रधान देश म्हणून ओळख अबाधित ठेवायची असेल तर देशी गाई पासून बनविलेल्या पंचगव्याचा वापर आपल्या दैनंदिन जीवनामध्ये प्रत्येक भारतीयाने आवर्जून केलाच पाहिजे असे त्यांनी आपले मत व्यक्त करताना ठामपणे सांगितले. त्यानंतर जय गोमाता जय श्रीराम या घोषणांनी संपूर्ण गोशाळेचा परिसर दणाणून गेला. या गोपाष्टमीच्या महापर्वाचे औचित्य साधून आयोजित केलेल्या गोपूजनाच्या कार्यक्रम प्रसंगी श्रीराम सेना जिल्हा गोरक्षा प्रमुख पवन कोमटी श्रीराम सेना शहर गोरक्षा प्रमुख पवन बल्ला श्रीराम सेना शहर अध्यक्ष आनंद चेट्टी श्रीराम सेनेचे गोरक्षक प्रशांत परदेशी, विवेक वंगारी, लिखित कोडम, अभिजीत जिद्दे,नागेश बंडी, LRG प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष सतीश सिरसील्ला आधी गोरक्षक गोप्रेमी उपस्थित होते.

# भाजपा शहर मध्य मतदारसंघात रन फॉर युनिटी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३१ ऑक्टोबर-**
भारताचे लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांच्या १५० व्या जयंतीनिमित्त सोलापूर शहर मध्य विधानसभा मतदारसंघ क्षेत्रात रन फॉर युनिटीच्या उपक्रमाचे आयोजन आ. देवेंद्र कोठे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले.

या उपक्रमाची सुरुवात भाजपा सोलापूर शहर कार्यालय येथे सरदार वल्लभभाई पटेल यांच्या प्रतिमेस शहराध्यक्षा रोहिणी तळवळकर यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. यावेळी भाजपा कार्यालय येथून एकता दौडची सुरुवात केली. सिद्धार्थ चौक- जांबमुनी मोची चौक - मौलाली चौक - जगदंबा चौक,सात रस्ता चौकातील महाराणा प्रताप यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून राष्ट्रगीताने समारोप करण्यात आला.




समारोपाचा वेळी शहराध्यक्ष रोहिणी तडवळकर म्हणाल्या, सरदार वल्लभभाई पटेल यांनी सर्व राज्ये एकत्रित करून भारताची निर्मिती केली. त्याचप्रमाणे सर्व भारतीयांनी एकत्र येण्याची गरज आहे. तरच आपला देश जागतिक नेता बनू शकेल. सरदार वल्लभभाई पटेल यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ आयोजित केलेल्या या धावण्याचा उद्देश एकता आणि परस्पर बंधुत्वाचा संदेश देणे आहे. या रन फॉर युनिटीमध्ये भाजपाचे प्रमुख नेते माजी महापौर श्रीकांचनाताई यन्नम, देवेंद्र भंडारे, अंबादास बिंगी, विजयाताई वड्डेपल्ली, संजय साळुंखे, सुधाताई अळ्ळीमोरे, रंजीताताई चाकोते, विजय कुलथे, नागेश सरगम, अक्षय अंजीखाने, नागेश खरात, बिजू अण्णा प्रधाने, सुरेश पाटील, अशोक कटके, सुनीताताई कामठी, राजश्री चव्हाण, राधिका पोसा, मंदाकिनी तोडकरी, अंजली वलसा, लक्ष्मी बदलापुरे, बजरंग कुलकर्णी, रवी भवानी, मनोज कलशेट्टी, डॉ. राजेश अनगिरे, मेघनाथ येमूल, बिपीन पाटील, आनंद बिर्रू, जेम्स जंगम, भरतसिंग बडूरवाले, नागनाथ कासाळोलकर, यशवंत पाथरूट, रवी कोळेकर, अनिल कदलगी, शिरीष गायकवाड, जय साळुंखे, सिद्धेश्वर कमटम, बंटी क्षीरसागरसह सोलापूर शहरातील भाजपा पदाधिकारी, कार्यकर्ते व शहरातील विविध क्षेत्रातील व्यक्तींची आणि नागरिकांची उत्स्फूर्त उपस्थिती होती.

# माजी सैनिकांसाठी ४ नोव्हेंबर रोजी मेळावा

### माजी सैनिकांच्या विविध समस्यांचे होणार निराकरण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३१ ऑक्टोबर-**
सोलापूर जिल्हा सैनिक कल्याण केंद्र व बॉम्बे इंजिनियर्स ग्रुप, खडकी पुणे यांच्यावतीने येत्या ४ नोव्हेंबर रोजी जुन्या सोलापूर जिल्हाधिकारी कार्यालयातील बहुउद्देशीय सभागृहात सकाळी नऊ ते सायंकाळी चार वाजेपर्यंत माजी सैनिकांसाठी मेळाव्याचे आयोजन केले असून, यावेळी शासनाच्या विविध योजनांसाठी तसेच सैनिकांना मिळणाऱ्या लाभांसाठी ज्या अडीअडचणी आहेत.

शंका कुशंका आहेत त्यांचे निरसन करून त्या तात्काळ सोडविण्याच्या दृष्टीने प्रयत्न केले जाणार असल्याची माहिती जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी मिलिंद तुंगार यांनी आज (दि. ३१) आयोजित पत्रकार परिषदेत दिली.



### सुसज्ज विश्रामगृहासाठी २० कोटीचा निधी मंजूर

जिल्ह्यात जवळपास दहा हजार माजी सैनिक असून, सांगली, सातारा, कोल्हापूर, पुणे, धाराशिव व बाहेरील राज्यातून येणाऱ्या सैनिक व माजी सैनिकांची संख्या मोठी आहे. त्यामुळे पंढरपूर येथे भव्य आणि सुसज्ज असे विश्रामगृह प्रस्तावित आहे. त्यासाठी जागाही उपलब्ध असून जवळपास २० कोटी रुपयांचा निधी बांधकामासाठी मंजूर झालेला आहे.त्यामुळे लवकरच या कामाची सुरुवात होणार असल्याची माहिती जिल्हा सैनिक अधिकारी मिलिंद तुंगार यांनी दिली.




हे पत्र मुद्रक व प्रकाशक दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : विवेक कृष्णाजी घळसासी. ● समूह मुख्य संपादक : दिलीप यशवंत पेठे.● मुख्य संपादक :प्रशांत वसंतराव माने दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. E-mail starunbharatgmail.com. ● Website:http://dainiktarunbharat/ या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi** - Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

# सोलापूर दिनांक

**सोलापूर तरुण भारत,** सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी,
हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## पैशासाठी विवाहितेचा छळ; पतीसह सहाजणांवर गुन्हा

**सोलापूर, दि. ३० ऑक्टोबर-**
पैशासाठी विवाहितेचा छळ करणाऱ्या पतीसह सहाजणांवर सलगर वस्ती पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत हिना रियाज नदाफ (वय २७, रा. कुर्बान हुसेन नगर, सोलापूर) या विवाहितेच्या फिर्यादीवरुन पती रियाज, सासू नसिमा, सासरे हुसेनसाब, दीर गौस, अशपाक, जाऊ कौसर (सर्व रा. विजापूर नाका झोपडपट्टी नं. २, सोलापूर) यांच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

१० सप्टेंबर २०२० ते २५ सप्टेंबर २०२५ या कालावधीत हिना ही पतीसमवेत सासरी नांदण्यास होती. त्यावेळी पती व त्याच्या घरातील लोकांनी मिळून हिना हिस लग्नात जास्त सोने घातले नाही व घर घेण्यासाठी माहेरून ५ लाख रुपये घेऊन ये, रिक्षा घेण्यासाठी ५० हजार रुपये घेऊन ये म्हणून शिवीगाळ, मारहाण करून मानसिक छळ केला. महिला पोलिस हवालदार मोरे पुढील तपास करीत आहेत.



## ▶▶ महत्वाचे...

### विषारी औषध प्राशन करून आत्महत्येचा प्रयत्न

**सोलापूर, दि. ३१ ऑक्टोबर-**
कुरूल (ता. मोहोळ) येथे दारूच्या नशेत विषारी औषध प्राशन करून आत्महत्येचा प्रयत्न करणाऱ्यास उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. अमोगसिध्द राजाराम पवार (वय ४०, रा. कुरूल) असे उपचारासाठी दाखल करण्यात आलेल्याचे नाव आहे. ३१ ऑक्टोबर रोजी सकाळी दहाच्या सुमारास स्वतः च्या शेतात अमोगसिध्द पवार यांनी दारूच्या नशेत पिकावर फवारणी करण्याचे विषारी औषध प्राशन केले. त्यामुळे पवार यांस उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.



### जादा नफ्याचे आमिष दाखवून ७४ हजारांची फसवणूक

**सोलापूर, दि. ३१ ऑक्टोबर-**
जादा नफ्याचे आमिष दाखवून ७४ हजारांची फसवणुक करणाऱ्याविरुध्द फौजदार चावडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत ओजस दत्तात्रय गुंड (रा. शुभारंभ अपार्टमेंट, सीएनएस हॉस्पीटलजवळ, सोलापूर) याच्या फिर्यादीवरुन विकास गतेंद्र जमादार (रा. कुमठे गाव, ता. उत्तर सोलापूर) याच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ओजस गुंड व विजय जमादार हे दोघे एकमेकांचे ओळखी आहेत. विजय जमादार याने ओजस गुंड याचा विश्वास संपादन करून ऑक्टोबर २०२२ ते जानेवारी २०२४ या कालावधीमध्ये फिल इक्युटी फंड या योजनेमध्ये गुंतवणुक केल्यास जादा नफा मिळतो असे सांगून तसेच वायसीएम मध्ये प्रवेश मिळवून देतो कॉलेज फी भरण्याकरीता, बँकेत नोकरी मिळवून देतो असे म्हणून गुंड याच्याकडून ७३ हजार ९०० रुपये घेऊन कोणताही नफा न देता पैसे परत दिलेले नाहीत. त्यामुळे गुंड याच्या फिर्यादीवरुन गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हवालदार घुगे पुढील तपास करीत आहेत.

### केकचे पैसे न देता दुकानदारास मारहाण करणाऱ्यांवर गुन्हा

**सोलापूर, दि. ३१ ऑक्टोबर-**
केकचे पैसे न देता दुकानदारास मारहाण करणाऱ्या चौघांवर विजापूर नाका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत शुभम बसवराज गुरव (रा. वैष्णवी नगर, सोलापूर) याच्या फिर्यादीवरुन सोनू गायकवाड, प्रतिक, कुदळे, फैजल शेख (रा. सोलापूर) यांच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ३० ऑक्टोबर रोजी सायंकाळी सैफुल येथील सिटी केक या दुकानात शुभम गुरव बसला होता. त्यावेळी त्याच्या ओळखीचे सोनू गायकवाड, प्रतिक, कुदळे, फैजल शेख हे सर्व आले. त्यांनी केक मागितल्याने गुरव याने केक दिला. त्यानंतर गुरव याने त्यांना केकचे पैसे मागितले असता त्या सर्वांनी गुरव यास शिवीगाळ करून हातातील कड्याने उजव्या डोळ्यावर मारून जखमी केले. हवालदार गायकवाड तपास करीत आहेत.




### कुदळ न दिल्याच्या रागातून महिलेला लाकडाने मारहाण

**सोलापूर, दि. ३१ ऑक्टोबर-**
कुदळ न दिल्याच्या रागातून महिलेला लाकडी दांडक्याने मारहाण करणाऱ्यावर सलगर वस्ती पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत सुनिता मल्लू पुजारी (वय ४२, रा. सेटलमेंट फ्री कॉलनी नं. १, सोलापूर) या महिलेच्या फिर्यादीवरुन सोमनाथ गायकवाड (रा. सेटलमेंट फ्री कॉलनी नं. १, सोलापूर) याच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. २९ ऑक्टोबर रोजी दुपारी सुनिता पुजारी या घरासमोर बसल्या होत्या. त्यावेळी सोमनाथ गायकवाड याने त्यांस लाईट खांब रोवण्यासाठी कुदळ मागितली. सुनिता यांनी कुदळ नाही दिली. त्याचा राग मनात धरून सोमनाथ गायकवाड याने दारु पिऊन येऊन सुनिता पुजारी यांना लाकडी दांडक्याने डोक्यात मारहाण करून जखमी केले. सहायक फौजदार न्यामणे पुढील तपास करीत आहेत.



# तत्कालीन सरपंच चंद्रकांत बंडगरांचे अपहरण की घातपात?

## अधिकचा तपास करण्याबाबत सत्र न्यायालयाचा पोलिसांना आदेश

### तब्बल १६ वर्षानंतर उलघडा होणार का?

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३१ ऑक्टोबर-**
येथील दुर्योधन तुळशीराम बंडगर, नागनाथ बन्ने व हिरेमठ स्वामी या तिघांनी संगनमत करून चंद्रकांत गुलाब बंडगर यांचे अपहरण केले असे तपासात निष्पन्न झाल्याचे मत नमूद करून सीआयडी पोलीस पुणे यांनी आरोपीविरुद्ध न्यायालयात दोषारोप पत्र दाखल केले. परंतु चंद्रकांत बंडगर अद्यापही न मिळून आल्यामुळे त्याबाबतचा अधिक तपास करण्याचा आदेश सत्र न्यायाधीश जयदीप मोहिते यांनी पोलिसांना दिला.

परमेश्वर पिंपरी (ता. मोहोळ) चे तत्कालीन सरपंच चंद्रकांत गुलाब बंडगर (वय ४२, रा. परमेश्वर पिंपरी, ता. मोहोळ) हे २० फेब्रुवारी २००९ रोजी बेपत्ता झाल्याबाबत फिर्यादी बिभीषन बंडगर यांनी तक्रार दिली होती, त्यानंतर २५ फेब्रुवारी २००९ रोजी फिर्यादी याने आरोपी दुर्योधन, नागनाथ व हिरेमठ स्वामी यांनी व्यावसायिक व आर्थिक वादाचे कारणावरून चंद्रकांत यांचे अपहरण करून घातपात केला असल्याची शक्यता असल्याचे नमूद करून मोहोळ पोलिसात आरोपींविरुद्ध फिर्याद दाखल केली होती. सदर फिर्यादीच्या अनुषंगाने आरोपीविरुद्ध मोहोळ पोलिसात फक्त अपहरणाचा गुन्हा नोंद करण्यात आला. तदनंतर गुन्ह्याकामी आरोपींना अटक करण्यात आली होती. गुन्ह्याचे गांभीर्य पाहता ९ ऑगस्ट २०११ रोजी सदर गुन्हा हा सीआयडी, पुणे यांच्याकडे वर्ग करण्यात आला होता. त्यानंतर तत्कालीन तपास अधिकारी सीआयडीचे पोलीस उपअधिक्षक यांनी करून चंद्रकांत बंडगर यांचे अपहरण आरोपी यांनीच केले असे तपासात निष्पन्न झाल्याचे नमूद करुन मोहोळ येथील प्रथम वर्ग न्यायादंडाधिकारी यांचे कोर्टात आरोपीविरुद्ध दोषारोपपत्र दाखल केले. परंतु चंद्रकांत बंडगर यांचे पुढे काय झाले, त्यांचा घातपात झाला की काय? याबाबत कोणताच तपास केल्याचे दोषरोप पत्रातून दिसून येत नव्हते. सदर दोषारोपपत्र दाखल झाल्यानंतर व्यतिथ होऊन फिर्यादीने प्रथमतः मोहोळ येथील प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी यांच्या न्यायालयात प्रकरणाचा अधिक तपास करण्याबाबत पोलिसांना आदेश करावा याबाबत अर्ज केला होता, परंतु मोहोळ येथील न्यायालयाने फिर्यादीचा अर्ज फेटाळला. फिर्यादीचा अर्ज फेटाळल्यानंतर फिर्यादीने सोलापूर जिल्हा सत्र न्यायालय येथे पुर्नविलोकन याचिका दाखल केली.



या याचिकेवरील सुनावणीवेळी फिर्यादीच्या वकिलांनी, 'सीआयडी पोलिसांच्या तपासाप्रमाणे आरोपीनींच चंद्रकांत याचे अपहरण केले, परंतु चंद्रकांत याचे पुढे काय झाले, ते आद्याप मिळून आलेले नाही, त्याचा घातपात केला की काय? याबाबतचा कोणता तपास दोषारोप पत्रात दिसून येत नाही., त्यामुळे चंद्रकांत मागील पंधरा वर्षापासून सापडून येत नसल्यामुळे त्यांचा घातपात झाला असण्याची शक्यता नाकारता येत नाही, तसेच चंद्रकांत हे अपहरणापूर्वी राजाराम दुधाळ यांच्याबरोबर गेले होते, राजाराम दुधाळ यांच्याबाबत कोणताही तपास झालेल्या दिसून येत नाही, तपासाच्या अनुषंगाने आरोपींची, राजाराम दुधाळ यांची सीडीआर, टॉवर लोकेशन व इतर व्यक्तीकडे तपास होणे गरजेचे आहे, त्याशिवाय वस्तुस्थिती न्यायालयासमोर येणार नाही व फिर्यादीस न्याय मिळणार नाही असा युक्तीवाद केला. सदरचा युक्तिवाद ऐकून व मान्य करून सत्र न्यायाधीश जयदीप मोहिते यांनी 'तपासाकामी चंद्रकांत जिवंत अथवा मृत सापडले नाही, पोलीसांनी अर्धवट व सद्सदविवेक बुध्दीस न पटणारे दोषारोप पत्र दाखल केले असून, सविस्तर तपास होणे गरजेचे आहे' असे मत नोंदवून प्रकरणात अधिकचा सविस्तर तपास करण्याचा आदेश मोहोळ पोलीसांना दिले.


यात सरकार तर्फे ॲड. दत्तूसिंग पवार यांनी, फिर्यादीतर्फे ॲड. प्रशांत नवगिरे, ॲड, सिद्धाराम पाटील व ॲड, चेतन रणदिवे तर आरोपी तर्फे ॲड. राम कदम, ॲड. अनिल मुसळे यांनी काम पाहिले.

# शहरात गळफास घेऊन आत्महत्येच्या दोन घटना

### ▶▶ अशोक नगर व जुना विडी घरकुलमधील घटना

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.३१ ऑक्टोबर-**
शहरात आत्महत्येच्या दोन घटना घडल्या आहेत. येथील विजापूर रोडवरील अशोक नगरात तरूणाने गळफास घेऊन आत्महत्या केली. ही घटना शुक्रवारी दुपारी उघडकीस आली. प्रशांत सुरेश गेजगे (वय ३८, रा. अशोक नगर, विजापूर रोड, सोलापूर) असे आत्महत्या केलेल्या तरूणाचे नाव आहे. ३१ ऑक्टोबर रोजी दुपारी एक वाजण्यापूर्वी प्रशांत गेजगे याने राहत्या घराच्या छताच्या अँगलला लावलेल्या पंख्याला साडीच्या सहाय्याने गळफास घेतल्याचे दिसून आले.

त्यावेळी त्याच्या नातेवाईकांनी प्रशांत यास गळफासातून सोडवून खाली उतरवून बेशुध्दावस्थेत पोलिस हवालदार एन सी सांगळे यांच्या मदतीने शासकीय रुग्णालयात दाखल केले. त्यावेळी डॉ. अक्षय इमडे यांनी प्रशांत यांस मृत घोषित केले. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे. दुसऱ्या घटनेत मुळेगाव रोडवरील जुना विडी घरकुल येथे राहणाऱ्या महिलेने गळफास घेऊन आत्म हत्या करण्याचा प्रयत्न केला. पल्लवी संतोष कुर्ले (वय ३४, रा. जुना विडी घरकुल, सोलापूर) असे उपचारासाठी दाखल करण्यात आलेल्या महिलेचे नाव आहे. ३१ ऑक्टोबर रोजी सकाळी नऊच्या सुमारास पल्लवी कुर्ले या महिलेने राहत्या घरात घरगुती कारणावरून नॉयलॉन दोरीने घराच्या लोखंडी अँगलला गळफास घेण्याचा प्रयत्न केला. त्यावेळी नातेवाईकांनी पल्लवी यांना गळफासातून सोडवून उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल केले. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.



# गोसंवर्धनासाठी शासनाने सकारात्मक निर्णय घ्यावा

## जिल्ह्यातील गोशाळा संस्था चालकांची मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३१ ऑक्टोबर-**
गो शाळा आणि गो संवर्धनासाठी शासनाने तातडीने सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी मागणी जिल्ह्यातील गोशाळा संस्था चालकांनी केली आहे. त्यांनी आज (दि.३१) सकाळी अकरा वाजता हुतात्मा चौक येथे गोमातेचे पूजन करून जिल्हाधिकारी कार्यालय सोलापूर येथे निवेदन दिले. यावेळी गोशाळा संस्था चालक व गोसेवा पशु कल्याण अधिकारी आदींची उपस्थिती होती.

भारताच्या प्राचीन संस्कृतीत गोसेवा ही केवळ सेवा नसून, साधना मानली गेली आहे. देशभरातील असंख्य गोशाळा व पांजरापोळ संस्था आज निराधार, अपंग, तसेच वृद्ध गायींचा सांभाळ भक्तिभावाने करीत आहे. या पार्श्वभूमीवर गोशाळा आणि गोसेवा क्षेत्रातील अडचणी लक्षात घेता शासनाने ठोस आर्थिक आणि पायाभूत सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, अशी महत्त्वपूर्ण मागणी आज जिल्हाधिकारी कार्यालयात सादर करण्यात आली. महाराष्ट्र राज्य प्राणी कल्याण मंडळाचे सदस्य तसेच जिल्हा प्राणी क्लेश प्रतिबंध समितीचे सदस्य केतन शहा यांनी ही मागणी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांच्याकडे केली. या निवेदनात समस्त महाजन संस्था, मुंबईचे गिरीशभाई शहा यांनी मांडलेल्या मागण्यांचा उल्लेख करण्यात आला आहे, ज्यात गोशाळांच्या शाश्वत विकासासाठी ठोस उपाययोजना करण्याची गरज अधोरेखित करण्यात आली आहे.



# विना परवाना गैरहजर; १५ सेवकांना सेवेतून काढले

- महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासेंची कारवाई
- घनकचरा व्यवस्थापन विभागाकडील झाडुवाली, बिगारी, सफाई कामगारांचा समावेश

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ३१ ऑक्टोबर -**
महापालिकेतील घनकचरा विभागा कडील १५ सेवकांना कोणताही रजेचा अर्ज न देता अथवा पूर्वमंजूरी न घेता काम ावर विनापरवाना गैरहजर राहिल्याप्रकरणी सेवेतून काढण्यात आले आहे. यामध्ये घनकचरा व्यवस्थापन विभागाकडील झाडुवाली, बिगारी, वाहन चालक आणि सफाई कामगारांचा समावेश आहे. याप्रकरणी संबंधितांची सुनावणी घेऊन महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी ही कारवाई केली आहे.

या कर्मचाऱ्याकडे नेमून दिलेल्या प्रभागातील दैनंदिन स्वच्छतेच्या काम काजाची जबाबदारी सोपविण्यात आली होती. त्यांच्या विनापरवाना गैरहजेरीमुळे प्रभागातील दैनंदिन स्वच्छतेच्या काम काजामध्ये अडथळा निर्माण झाला. जे सेवक दिर्घकाळापासून विनापरवाना गैरहजर आहेत अशा सेवकांची माहिती मागविणेत आलेली होती. सेवकांची यादी तयार करुन यादीतील गैरहजर सेवकांच्या सेवापुस्तकासह दि.९ सप्टेंबर २०२५ रोजी सकाळी १० वाजता महापालिका आयुक्त यांचेकडे हजर सेवकांची सुनावणी घेण्यात आली होती. या सुनावणी दरम्यान आयुक्तांनी माहिती घेऊन यादी मधील काही सेवकांना सेवेतून कमी करणे बाबत, काही सेवकांना प्रत्येकी १० हजार रुपये इतका दंड करुन कामावर घेणे बाबत आदेश दिले. सप्टेंबर-२०२५ पेड इन ऑक्टोबर-२०२५ च्या वेतनातून कपात करणेत यावे, त्यांचा गैरहजर कालावधी बिनपगारी ग्राह्य धरणेत यावा त्यांच्या नोंदी सेवापुस्तकात घेण्यात यावे, असे आदेश दिले होते. विना परवाना गैरहजर राहिल्यामुळे त्या सेवकांकडे सोपविण्यात आलेल्या प्रभागातील दैनंदिन प्रभागातील स्वच्छतेच्या कामात अडथळा निर्माण झाला. संबंधित कर्मचाऱ्याकडून महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) १९७९ चे नियम ३ (१) एक व दोन) च्या तरतुदीचा भंग झाला असून त्यास सर्वस्वी कर्मचारी जबाबदार असल्याने या १५ सेवकांना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ५६ (२) (ग) च्या तरतुदीनुसार पुढे नोकरी मिळण्यास सर्वसाधारणपणे अपात्र होणार नाही अशा रीतीने पालिकेच्या सेवेतून काढून टाकण्यात येत आहे, असे डॉ. ओम्बासे यांनी आदेशात म्हटले आहे.

**कारवाई झालेल्या सेवकांचे नांव आणि कंसात पदनाम याप्रमाणे-**
शाम रामचंद्र सावंत (बिगारी), कन्हैय्या संजय शिंदे (झाडुवाला), सोमनाथ नागनाथ थोरात (बिगारी), बाबा नागय्या मुनगानोल्लू (सफाई कामगार), मल्हारी रेवण सुरवसे (झाडुवाला), अमर मोहन गायकवाड (वाहन चालक), नागेश चंद्रकांत जाधव (झाडुवाला), महेशकुमार याकुब मंडेपोल्लू (सफाई कामगार), लक्ष्मण नरसिंग चिटलापल्ली (सफाई कामगार), कृष्णा पेंटय्या सांगेपागा, (सफाई कामगार), राम नागय्या अडाकुल (सफाई कामगार), गोविंद हणमंतू बेरकोल्लू (सफाई काम गार), महेश मच्छिंद्र कांबळे (बिगारी), शिलरत्न दिलीप सुरवसे (बिगारी), सुलोचना बनसोडे (झाडुवाली).

# आयुष्यमान योजना; मनपाचे कामकाज असमाधानकारक

## डॉ.ओमप्रकाश शेटेंनी व्यक्त केला संताप

### ▶ मनपा अधिकाऱ्यांना नोटीस; जिल्हा समन्वयकाच्या तत्काळ बदलीचे आदेश

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३१ ऑक्टोबर-**
देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेनुसार राज्यात आयुष्यमान भारत ही महत्वाकांक्षी योजना राबविण्यात येत आहे. या योजनेत सोलापूर महापालिका प्रशासनाची व योजनेच्या जिल्हा समन्यवयकांची कामगिरी असमाधानकारक दिसून आली आहे. त्यामुळे मनपा अधिकाऱ्यांना कारणे दाखवा नोटीस देण्यात आली असून, जिल्हा समन्वयक यांची बदली करण्यात आल्याची माहिती आयुष्यमान भारत उपक्रमाचे राज्य मिशनचे अध्यक्ष डॉ. ओमप्रकाश शेटे यांनी आज (दि. ३१) आयोजित पत्रकार परिषदेत दिली.





आयुष्यमान भारत योजनेचा आढावा शुक्रवारी डॉ. शेटे यांनी जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सभागृहात संबधित विभागाकडून घेतला. त्यानंतर त्यांनी पत्रकारांशी संवाद साधून या योजनेच्या सध्यस्थितीची माहिती दिली. यावेळी जिल्हा पुरवठा अधिकारी संतोष सरडे, शहर अन्नधान्य वितरण अधिकारी ओंकार पडोळे आदींची उपस्थिती होती.

यावेळी डॉ. शेटे हे चांगलेच संतापले होते. कारण मनपाचा एकही कर्मचारी, अधिकारी या बैठकीस उपस्थित नव्हता. यावेळी डॉ. शेटे पुढे म्हणाले की, आयुष्यमान भारत योजनेंतर्गत पांढरे शुभ्रकार्ड वगळता उर्वरीत सर्व लाभार्थी कुटूंबास दरवर्षी पाच लाख रुपयांपर्यंत मोफत वैद्यकीय उपचार देण्यात येतात. जिल्हयात या योजनेसाठी एकूण ४० लाख ९१ हजार लाभार्थी पात्र आहेत. यापैकी १३ लाख ९२ हजार लाभार्थ्यांकडे आयुष्यमान भारत योजनेचे कार्ड आहे. महापालिका, नगरपालिका क्षेत्रात या योजनेचे काम असमाधानकारक असल्याने या संस्थांच्या अधिकाऱ्यांसमवेत निवडणुकापुर्वी पुन्हा स्वतंत्र बैठक आयोजित करण्यात येणार आहे. सोलापूर जिल्ह्यातील ११४ हॉस्पीटलमध्ये आयुष्यमान भारत योजनेअंतर्गत लाभार्थ्यांना वैदयकीय उपचार देण्यात येतात. रुग्ण व हॉस्पीटल या दोघांचे नुकसान होणार नाही याची दक्षता घेण्यात आली आहे. आतापर्यंत या योजनेतून २७ हजार १६९ रुग्णांना ५५ कोटी २१ लाख रुपयांचे मोफत उपचार देण्यात आल्याचेही डॉ. शेटे यांनी यावेळी सांगितले. राज्यात नांदेड जिल्ह्यात सर्वाधिक ४० टक्के लाभार्थ्यांना आयुष्यमान कार्ड वितरीत करण्यात आले आहेत. मुंबईत सर्वात कमी काम असून, १४ टक्के लाभार्थ्यांना कॉर्ड वितरीत करण्यात आले आहेत. सोलापूर जिल्ह्यातील ४० टक्के लाभार्थ्यांना कार्ड वितरीत करण्यात आले आहेत. ग्रामीण भागात चांगले काम असून शहरातही या योजनेस गती देण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. यासाठी वेळ आली तर कारवाईचा बडगाही उगारण्यात येणार असल्याचे डॉ. शेटे यांनी सांगितले.

आयुष्यमान भारत योजनेचा राज्याचा अध्यक्षपदाचा पदभार घेतल्यापासून वर्षभरात सोलापुरात तीन वेळा बैठका घेण्यात आल्या. पहिल्या बैठकीसही महापालिका प्रशासनाची कामगिरी सुमार दिसली. आजच्या बैठकीत तर महापालिका प्रशासनाचा प्रतिनिधीही उपस्थित नव्हता. योजनेसाठी आवश्यक क्षमतेने गती न दिल्याने या योजनेचे जिल्हा समन्वयक दिपक वाघमारे यांची नंदूरबारला बदली करण्याचा निर्णयही घेण्यात आल्याचे यावेळी डॉ. शेटे यांनी सांगितले.

**रुग्णांना मिळणार ॲपच्या माध्यमातून सुविधा**
आयुष्यमान भारत योजनेअंतर्गत रुग्णांवर उपचार व्हावेत, यात पारदर्शकता यावी यासाठी सर्व हॉस्पीटलमध्ये आरोग्य मित्र तैनात करण्यात आले आहेत. याशिवाय टोल फी कूमांकही देण्यात आला आहे. लवकरच रुग्णांना एक क्लिकवर तातडीने उपचार मिळण्याचा मार्ग मोकळा व्हावा यासाठी ॲप सुरु करण्यात येणार असल्याचेही डॉ. शेटे यांनी यावेळी सांगितले.

### कुत्रा अंगावर आल्याने महिला जखमी

**सोलापूर :** पायी जाणाऱ्या महिलेच्या अंगावर कुत्रा आल्याने पडल्याने महिला जखमी झाली. आयेशा इम्तीयाज मुल्ला (वय ४२, रा. विडी घरकुल, कुंभारी, सोलापूर सध्या रा. आनंद नगर भाग ५, मजरेवाडी, सोलापूर) असे जखमी महिलेचे नाव आहे. ३१ ऑक्टोबर रोजी सातच्या सुमारास सहारा नगर येथील आयडियल स्कुल येथून पायी चालत येत होत्या. त्यावेळी शाळेसमोर अचानक कुत्रे अंगावर आल्याने घाबरून त्या पडल्याने डोक्यास मार लागून जखमी झाल्या. त्यामुळे त्यांना उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. याबाबत सिव्हील चौकीत नोंद करण्यात आली आहे.

### तरूणास मारहाण


**सोलापूर :** सोरेगावजवळ तरूणास पाईपने मारहाण करण्यात आली. ऋषिकेश हरिशकुमार वाघमारे (वय २७, रा. शिवगंगा नगर, मजरेवाडी, सोलापूर) असे जखमीचे नाव आहे. ३० ऑक्टोबर रोजी दुपारी सोरेगावजळव रोडवर थांबल्यानंतर ऋषिकेश वाघमारे यास अज्ञात व्यक्तीने अज्ञात कारणावरून मारहाण केली. त्यामध्ये जखमी झाल्याने वाघमारे यास उपचारासाठी दाखल करण्यात आले.

## बाळ अदला-बदली प्रकरण

# तक्रारदाराने तक्रारच मागे घेतल्याने डीएनए चाचणी रद्द

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३१ ऑक्टोबर-**
येथील सिव्हील हॉस्पीटल मधील प्रसुती विभागात बाळाची अदला-बदली झाल्याची तक्रार नातेवाईकांकडून करण्यात आल्यानंतर याप्रकरणाची चौकशी समितीमार्फत चौकशी करण्यात येत असतानाच तक्रारदार नातेवाईकाने दिलेली तक्रारच मागे घेतल्याने आता नातेवाईकांनी मागणी केल्याप्रमाणे होऊ घातलेली डीएनए चाचणी रद्द होण्याची शक्यता आहे.

सिव्हील हॉस्पीटलमधील प्रसुती विभागात २३ ऑक्टोबर रोजी प्रसुतीनंतर बाळांची अदला-बदली झाल्याची तक्रार माणिक चव्हाण या नातेवाईकाने केली होती. चव्हाण यांना सिव्हील हॉस्पीटल प्रशासन व सदर बझार पोलिस ठाणे या दोन्ही ठिकाणी तक्रारी अर्ज देऊन संबंधितांवर कारवाई करण्याची मागणी करून बाळांची व पालकांची डीएनए चाचणी करण्याची मागणी केली होती. सिव्हील हॉस्पीटल प्रशासन व सदर बझार पोलिसांकडून या प्रकरणाची चौकशी करण्यात येत आहे. सिव्हिल हॉस्पीटल प्रशासनाकडून याप्रकरणाच्या चौकशीसाठी समिती स्थापन करण्यात आली असून या समितीचा दोन ते तीन दिवसात अहवाल येण्याची शक्यता आहे. तर सदर बझार पोलिसांकडून चव्हाण यांना वारंवार फोन करून याबाबत तक्रार दाखल करण्याबाबत कळविण्यात आले होते. परंतु, चव्हाण हे पोलिस ठाण्यात गेलेले नाहीत. त्यांनी त्यांची तक्रार मागे घेत असल्याचे पोलिसांना सांगितले आहे.




शुक्रवारी माणिक चव्हाण यांनी सिव्हील हॉस्पीटल प्रशासनासदेखील तक्रार मागे घेत असल्याचे सांगितले आहे. त्यामुळे चव्हाण यांच्या मागणीप्रमाणे याप्रकरणात डीएनए चाचणी होण्याची शक्यता नाही, असे हॉस्पीटलचे अधिष्ठाता डॉ. ऋत्विक जयकर यांना सांगितले. प्रसुती विभागात दोन ठिकाणी नोंदी होतात. त्यामुळे बाळांची अदला-बदली होण्याची शक्यता कमी आहे. तरी या प्रकरणाची सखोल चौकशी होणार असल्याचे डॉ. जयकर यांनी सांगितले.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# सावध व्हा, 'कॉल मर्जिंग स्कॅम'चा धोका

## सायबर गुन्हेगारांकडून नव्या फसवणूक पद्धतीने लाखो रुपयांवर डल्ला

### जानेवारी ते सप्टेंबर दरम्यान ३,३७२ गुन्हे नोंद; ८६८ जणांना अटक, १,०१९ गुन्ह्यांची उकल

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३१ ऑक्टोबर-**

सायबर गुन्हेगारांकडून शेअर मार्केट, डिजिटल अरेस्टचा धोका कायम असताना व्हॉट्सअॅप हॅकिंग, सिम स्वॅपपाठोपाठ आता कॉल मर्जिंग स्कॅमचा नवा धोका समोर आला आहे. हे गुन्हेगार मोबाइलवरील 'कॉल मर्ज फीचर'चा गैरवापर करून ओटीपी मिळवतात आणि पैसे चोरतात. त्यामुळे यापासून सावध राहण्याचा इशारा महाराष्ट्र सायबरचे पोलिस उपमहानिरीक्षक संजय शिंत्रे यांनी दिला.

**कसा होतो कॉल मर्जिंग स्कॅम?**

तुम्हाला अनोळखी नंबरवरून कॉल येतो. कॉल करणारी व्यक्ती विश्वास संपादन करते आणि दुसरा कॉल मर्ज करण्यास सांगतो. दुसरा कॉल हा ओटीपी कॉल असतो. स्कॅमर शांतपणे ओटीपी ऐकतो. व्यवहार पूर्ण होतो आणि पैसे चोरीला जातात. महत्त्वाचे म्हणजे स्कॅमरकडे आधीच तुमची बँक माहिती असते. ओटीपी मिळवण्यासाठीच कॉल मर्जची युक्ती वापरली जाते.

**स्कॅमर तुमची माहिती कशी मिळवतात?**

डेटा लिक, फिशिंग वेबसाइट्स, मालिशियस अॅप्स, प्रतिरूप कॉल्स ही माहिती वापरून ते कॉल मर्ज करायला लावतात आणि ओटीपी चोरतात.

**धोका ओळखण्याची लक्षणे**

अचानक नेटवर्क बंद होणे, ओटीपी/एसएमएस येणे थांबणे, यूपीआय अॅप्समध्ये पुन्हा लॉगिन करण्याची सूचना, किंवा नवीन सिम अॅक्टिव्हेशनची सूचना ही सर्व




फसवणुकीची लक्षणे आहेत.

**व्हॉट्सअॅप हॅकिंग**

सायबर गुन्हेगार व्हॉट्सअॅप अकाउंट हॅक करून पीडिताच्या नावाने फसवणूक करत आहेत. ते गुगल व्हेरिफिकेशन कोड किंवा ओटीपी मागतात. तांत्रिक अडचण सोडवणे, ग्रुपमध्ये सामील होणे किंवा ओळख पटवणे अशा कारणे ते देतात.. कोड मिळाल्यावर ते पीडिताचा नंबर वापरून व्हॉट्सअॅप स्वतःच्या मोबाइलवर इन्स्टॉल करतात आणि चॅट्स व संपर्क यादीवर ताबा मिळवतात. अकाउंट ताब्यात घेतल्यावर हे गुन्हेगार पीडिताच्या मित्र, नातेवाईक आणि सहकाऱ्यांना मेसेज पाठवतात. अनेक वेळा व्यवसायातील कर्मचारी मालक किंवा वरिष्ठ अधिकारी असल्याचा भासवणारा मेसेज मिळवतात आणि तातडीने पैसे किंवा गोपनीय माहिती घेत फसवणूक करतात.

**सिम स्वॅप कशी होते?**

सिम स्वॅप फसवणुकीत फसवणूक करणाऱ्या व्यक्तीच्या नावाने बनावट कागदपत्रे वापरून नवीन सिम मिळवतात. मूळ सिम बंद झाल्यावर ओटीपी आणि संदेश फसवणूक करणाऱ्याला मिळतात, आणि बँक, यूपीआय, ई-मेल, सोशल मीडिया खात्यांमध्ये प्रवेश मिळतो. फिशिंग कॉल्स, बनावट केवायसी/नोकरी अर्ज, डार्क वेबवरील लिक डेटाबेस, सोशल मीडिया प्रोफाइल आणि बनावट अॅप्सद्वारे सायबर गुन्हेगार पीडितांची माहिती गोळा करतात.

**येथे तक्रार नोंदवा**

आपल्या बँकेच्या ग्राहक सेवा विभागाशी संपर्क साधा.१९३० राष्ट्रीय सायबर गुन्हे हेल्पलाइन cybercrime.gov.in येथे तक्रार नोंदवाः

> बँक कधीही फोनवर ओटीपी किंवा पिन विचारत नाही. कॉल मर्ज करण्याची विनंती म्हणजे स्कॅमचा इशारा आहे. सतर्क राहा. माहिती द्या.
>
> **- संजय शिंत्रे,**
> **पोलिस उपमहानिरीक्षक,**
> **महाराष्ट्र सायबर, मुंबई**

**तक्रारदारांनी काय करावे ?**


अनोळखी कॉलसोबत दुसरा कॉल मर्ज करू नका. कॉल कट करून अधिकृत नंबरवरून ओळख पडताळा. फक्त अधिकृत अॅप्स वापरा, अनावश्यक परवानग्या नाकाराव्यात. अनोळखी लिंकवर क्लिक करू नका. ओटीपी, पिन, सिव्हिव्ही क्रमांक कोणालाही शेअर करू नका.

---

## ज्ञानामृत आनंदलहरी १२५३

ऐसी आवडी आहे जीवा । कैं पाहीन केशवा ।।
न लगे वित्त धन । मुखीं नाम नारायण ।।

आपला जीव ज्याच्यावर जडतो त्याला पुन्हा पुन्हा मनभरून पहावे असे वाटत असते. संसारात अडकलेल्या जीवाचा जीव बहुतांशकरून नाशवंत जीवावर जडत असतो. पण संसाराची खरी ओळख पटलेल्या जीवाचा जीव शाश्वत असणाऱ्या भगवंतावर जडतो. असा जीव केवळ जीव राहात नाही, तर महात्मा बनतो. महात्मा सर्व जीवमात्रात एका भगवंताला पहातो. सर्व जीवमात्रात भरून उरलेल्या भगवंताला भेटण्याची, पाहण्याची त्याची सदैव तळमळ असते. पंढरीचा पांडूरंग सर्व जीवाला स्ववर्तनातून समतेचा संदेश देतो. कर्तव्य करणाऱ्याच्या पाठीशी उभा राहतो. निस्वार्थ भावाने भक्ती करणाऱ्यांची तो सेवा करतो. समता, बंधुता, निस्वार्थ प्रेम, कर्तव्य आदिचा संदेश देणाऱ्या भगवंताला पाहण्यासाठी सेनाजीसारखा महात्मा आतुर झाला नाही तर नवलच म्हणावे लागेल.



ज्याच्यापासून वारकरी संप्रदायाने शुध्द आचरणाचा, मानवतेचा संदेश घेतला, त्याला पाहण्यासाठी हा संप्रदाय लाखोंच्या संख्येने पंढरीला जात असतो. खरोखर पंढरीचा पांडूरंग हा केवळ सांगण्याऐकण्याचा विषय नव्हे तर तो खऱ्या अर्थाने अनुभवण्याचा विषय आहे. संसारात अडकलेला जीव सातत्याने हे मिळावायचं आहे, ते घ्यायचं आहे, हे आणायचं आहे, असं जमा करायचं आहे, तसं जमा करायचं आहे,असा वेगवेगळा पण जवळपास एकाच अर्थाचा विचार करीत असतो. यात या जीवाचा दोष आहे, असं जरी असलं तरी जोपर्यंत या जीवाला त्याचा खरा परिचय होत नाही, तोपर्यंत हा जीव या दोषाला दोष समजणार नाही. या जीवाला त्याचा खरा परिचय होण्यासाठी ज्याला त्याचा खरा परिचय झाला आहे, असा जीव भेटावा लागतो. अशा स्वपरिचित जीवाची भेट झाली तर हा सांसारीक जीवही सेनाजींसारखे मला धन, संपत्ती, सत्ता, प्रसिध्दी यापैकी कांहीही नको. मला जनसेवेची संधी दे, या संधीचे सोने करतांना भगवंता तुझ्या नामाचा विसर पडू देऊ नको, असे म्हणेल. ज्याच्याकडे सर्व काही मुबलक प्रमाणात उपलब्ध आहे, अशाने एखाद्याला तुला काय पाहिजे ते माग, असे म्हटले तर मागणाऱ्याच्या मागणीची यादी निश्चितच लांबलचक असेल, यात शंका वाटत नाही. कारण नाशवंत देह म्हणजेच मी असा जीवाचा समज असल्याने हा जीव या देहाच्या पालन पोषणासाठी आणि देहातील इंद्रियांचे लळे पुरविण्यासाठी वाट्टेल ते करतो. असे वाट्टेल ते करणाऱ्या जीवास परीपूर्ण असणाऱ्याने स्वतः होवून माग म्हटले तर या जीवाची मागणी निश्चितच अमर्याद असेल. पण ज्या जीवाला आपण म्हणजे देह किंवा देह म्हणजे आपण असे वाटत नाही. म्हणजेच खऱ्या अर्थाने ज्याला स्वपरिचय झालेला असतो, तो जीव नाशवंत, भौतिक असे काही मागत नाही. सेनाजी हे स्वपरीचय झालेले असल्याने त्यांच्याकडून भगवंताला हीच मागणी होते की, हे भगवंता माझ्याकडून सद्वर्तन होऊ दे,तुझा संग लागू दे. अशी निस्वार्थ मागणी करणारा जीव खऱ्या अर्थाने सुखी राहील, यात शंकाच नसावी. सध्याच्या युगात स्वपरिचय झालेला महात्मा भेटणे दुर्मिळ आहे. हे सत्य असले तरी सेनाजींची अभंगवाणी, तुकोबांची गाथा, माऊलींची श्री ज्ञानेश्वरी, समर्थांचा दासबोध, नाथांचे भागवत आदि दुर्मिळ नाहीत, हे लक्षात असावे. जय जय राम कृष्ण हरी ।

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

---

### आयटी अभियंता हल्ला प्रकरण

## दहा दिवसानंतरही पोलिसांच्या हाती काहीच नाही

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ३१ ऑक्टोबर-**

विजापूर रस्त्यावर आयटी अभियंत्यावर २० ऑक्टोबर रोजी रात्री तिघां हल्लेखोरांनी हल्ला केला होता. हल्लेखोरांनी आयटी अभियंता व त्याच्या मैत्रिणीच्या गळ्यातील सोनसाखळी जबरदस्तीने काढून नेली. याप्रकरणातील हल्लेखोरांच्या तपासासाठी विजापूर नाका पोलिसांची पथके काम करीत असतानाही घटनेच्या दहा दिवसानंतरही पोलिसांच्या हाती काही ठोस लागले नाही.

आयटी अभियंता व्यंकटेश संजय बुधले (वय २९, रा. योजना हौसींग सोसायटी, भारती विद्यापीठजवळ, सोलापूर) असे हल्ला झालेल्या तरुणाचे नाव आहे. त्याच्यावर सोमवार दि. २० ऑक्टोबर रोजी रात्री तिघांनी हल्ला केला होता. हल्लेखोरांच्या शोधासाठी विजापूर नाका पोलीस ठाण्यातील गुन्हे प्रकरटीकरण पथकासह पोलिसांची पाच पथके रवाना झाली आहेत. पण, पाच दिवसानंतरही पोलिसांच्या हाती ठोस असे काहीही लागलेले नाही.

विजयपूर रोडवरील भारती विद्यापीठाजवळ असलेल्या योजना हौसिंग सोसायटीत व्यंकटेश राहण्यास आहे. सोमवार दि. २० ऑक्टोबर रोजी रात्री तो त्याच्या मैत्रिणीसोबत विजापूर रोडवर फिरायला गेला होता. दरम्यान, रात्री दहाच्या सुमारास सोरेगावा पासून काही अंतरावरील आदित्य हॉटेल येथून तो वळण घेऊन दुचाकीवरून सोलापूरच्या दिशेने येत होता. त्यावेळी तेथे आलेल्या तिघांनी त्याला अडविले.

त्या अनोळखी तिघांबरोबर झालेल्याबाचाबाचीनंतरहल्लेखोरांकडून व्यंकटेशच्या गळ्यातील १६ ग्रॅम वजनाची सोनसाखळी हिसकावून घेताना हल्लेखोर व व्यंकटेश त्याच्यात झटापट झाली. यावेळी हल्लेखोरांनी व्यंकटेशच्या मैत्रीणीच्या गळ्यातील १५ ग्रॅम वजनाची सोनसाखळी हिसकावून घेतली.

त्यावेळी दरोडेखारोंनी व्यंकटेशवर कोयत्याने हल्ला करून त्यास गंभीर जखमी केले. त्यानंतर ते तिघे हल्लेखोर तेथून पसार झाले. या गंभीर गुन्ह्यातील संशयितांचा शोध घेण्यासाठी विजापूर नाका पोलिसांची पथके तैनात करण्यात आली आहेत. घटनास्थळ परिसरता हल्लेखोरांची चप्पल मिळून आली. तसेच एकाचे रक्त पोलिसांना मिळाले. पण, हे संशयित हल्लेखोर कोण याचा उलगडा मात्र अद्याप झालेला नाही.

दरम्यान, हल्लेखोरांचा शोध सुरु असल्याचे विजापूर नाका पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक दादा गायकवाड यांनी सांगितले.

---

## महिलेचा विनयभंग; फायनान्स कंपनीच्या दहा जणांवर गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ३१ ऑक्टोबर-**

फायनान्स कंपनीमध्ये काम करीत असताना ऑफिसमधील गैरव्यवहार उजेडात आणलेल्या महिलेचा मानसिक त्रास देऊन विनयभंग करणाऱ्या दहा जणाविरुद्ध जेलरोड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे

याबाबत पीडित महिलेच्या फिर्यादीवरून ब्रांच मॅनेजर निखिल पायमल्ली किरण कुमार कापसे दीपक पोगुल सिद्धलिंग नवले रतिकांत बामणी भीमाशंकर बिराजदार बसवराज पाटील मार्कंडेय ताटी पामोल सर्व राहणार सोलापूर गौतम नायक कणकट्टे संजय भाटिया राहणार मुंबई यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे

यातील पीडिता ही दाजी पेठेतील जमखंडी ब्रिज जवळ असलेल्या किस्त फायनान्स या कंपनीमध्ये काम करीत होती पिढीतेने फायनान्स ऑफिस मध्ये चालत असलेले गैरव्यवहार उजेडात आणले असल्याने तिला ऑफिसमध्ये काम करणारे ब्रांच मॅनेजर निखिल पायमल्ली किरण कुमार कापसे दीपक सिद्धलिंग नवले यांनी जून २०२५ ते सप्टेंबर २०२५ या कालावधीत मानसिक व शारीरिक त्रास देऊन तिचा विनयभंग करून मनास लज्जा वाटेल असे कृत्य केले तसेच रतिकांत बामणी भीमाशंकर बिराजदार बसवराज पाटील यांनी पिढीतेला ऑफिसमध्ये सांगेल ते काम कर नाहीतर मुंबई ऑफिस मध्ये खोट्या तक्रारी करून कामावरून कमी करायला सांगू असे म्हणून वारंवार मानसिक त्रास दिला त्याचप्रमाणे एरिया क्रेडिट मॅनेजर मार्कंडेय ताटी पाहून याने पीडितेची तिच्या नातेवाईकांमध्ये बदनामी केली कंपनीचा एच आर गौतम नायकनकट्टे लीगल हेड संजय भाटिया यांनी पीडितेने केलेल्या तक्रारीबाबत कोणत्याही प्रकारची कार्यवाही न करता तू आमच्या फायनान्स कंपनीत काम करू नको तू रिझाईन दे तू कॅरेक्टरलेस आहेस असे बोलून तिच्या चारित्र्यावर शिंतोडे उडवून तिची बदनामी केली म्हणून जेलरोड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे महिला सहाय्यक पोलीस निरीक्षक भांबिस्टे पुढील तपास करीत आहेत

---

## सुप्रभात

### आजचा दिवस

| | |
|---|---|
| वार : शनिवार | दिनविशेष - प्रबोधिनी स्मार्त |
| दि. १ नोव्हेंबर २०२५ | एकादशी. संत हरिहरबाबा |
| विक्रम संवत् २०८२ | प्रकट दिन पंढरपूर |
| शके - १९४७ | ....राहू काल.... |
| संवत्सर - विश्वावसु | रविवार : दु.४.३० ते ६.०० |
| मास - कार्तिक | सोमवार : स. ७.३० ते ९.०० |
| शु. एकदशी (१९.०१) | मंगळवार : दु. ३.०० ते ४.३० |
| ऋतु - वर्षा | बुधवार : दु. १२ ते १.३० |
| नक्षत्र- रेवती (२३.१८) | गुरुवार : दु. १.३० ते ३.०० |
| योग - व्यतिपात (२४.५८) | शुक्रवार : स.१०.३० ते १२ |
| करण - वणिज (०८.२०) | शनिवार : स. ९ ते १०.३० |




## मल्लिकार्जुन नगरात वीरशैव लिंगायत समाज मेळावा उत्साहात

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३१ ऑक्टोबर-**

मल्लिकार्जुन नगर, किसन नगर या ठिकाणी वीरशैव लिंगायत समाजाच्या वतीने आयोजित करण्यात आलेला भव्य समाज मेळावा ऐतिहासिक उत्साहात आणि अभूतपूर्व एकतेच्या भावनेने यशस्वीरीत्या पार पडला. हा सोहळा केवळ एक कार्यक्रम नसून एकता, संस्कृती आणि श्रद्धेचा अविस्मरणीय मेरुमणी ठरला.

मेळाव्याला काशी जगद्गुरु मल्लिकार्जुन शिवाचार्य महास्वामीजी यांचे विशेष आशीर्वाद लाभले. यासोबतच श्री चंन मल्लेश्वर बडदाळ महाराज आणि श्रीकंठ शिवाचार्य महाराज (नागणसूर) यांच्यासह सुरपूर येथील महाराजांची प्रमुख उपस्थिती होती, ज्यामुळे मेळाव्याला अध्यात्मिक अधिष्ठान प्राप्त झाले. या मेळाव्याला आमदार सुभाष देशमुख, आमदार विजय देशमुख, माजी आमदार सिद्धाराम मेत्रे, रमेश पाटील, माजी नगर अध्यक्ष मुतु खेडगी, शिवसेना जिल्हाप्रमुख अमर पाटील, धनेश अचिलेर आणि राजशेखर हिरेहब्बू यांची प्रमुख उपस्थिती होती. या सर्व मान्यवरांनी समाजाच्या एकजुटीचे कौतुक केले आणि बसव तत्त्वज्ञानानुसार कार्य करण्याची ग्वाही दिली. मेळाव्याच्या ठिकाणी हजारोच्या संख्येने समाजबांधव, भगिनी आणि युवा शक्ती एकत्र आले होते. सर्व उपस्थितांनी जगद्गुरू बसवेश्वर यांच्या 'कायक' आणि 'दसोह' या तत्त्वज्ञानानुसार समाज प्रगतीचा संकल्प केला. या मेळाव्यामुळे समाजबांधवांमध्ये आपुलकी, भक्ती आणि एकतेची भावना अधिक दृढ झाली. मेळाव्याच्या यशस्वीतेसाठी माजी सभागृह नेते शिवानंद पाटील, रमेश पाटील, श्रीशैल हुळ्ळे आणि मल्लिकार्जुन पाटील यांनी परिश्रम घेतले. श्रीशैल हुळ्ळे यांनी आभार मानले.

---



## मनपा प्राथमिक शिक्षण मंडळात इंदिरा गांधी व वल्लभभाई पटेल यांना अभिवादन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३१ ऑक्टोबर-**

नवी पेठ येथील महानगरपालिका प्राथमिक शिक्षण मंडळामध्ये माजी पंतप्रधान इंदिरा गांधी स्मृतिदिन निमित्त व माजी संरक्षण मंत्री सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेस महानगरपालिका प्राथमिक शिक्षण मंडळाचे मुख्य लिपिक माहेजबीन शेख यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी मनपा प्राथमिक शिक्षण मंडळाचे लेखापाल मल्लिकार्जुन हिरेमठ, पर्यवेक्षक संतोष बुलबुले, भगवान मुंढे, सुरेश कासार, रजनी राऊळ, तरंगिणी कोंडा, महेश वालावलकर, सारंग अंजीखाने, तुकाराम भोसले, अमोल गायकवाड, लक्ष्मण पुजारी, चेतन बडगंजी,प्रसेन्नजीत शिंगे, भालचंद्र साखरे, आरव गायकवाड, सायली ढोले आदी उपस्थित होते.

## भगतसिंग मार्केटमधून १५ हजारांची दुचाकी चोरीस

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३१ ऑक्टोबर-**

शहरातील शास्त्री नगर भागातील भगतसिंग मार्केट येथून चोरट्याने १५ हजार रुपये किंमतीची दुचाकी चोरून नेली. याबबात अंबादास हणमंतु नाईक (रा. उत्तर सदर बझार, लष्कर, सोलापूर) याच्या फिर्यादीवरुन अज्ञात चोरट्याविरुध्द सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ९ ऑक्टोबर रोजी रात्री अंबादास नाईक याने त्यांची एमएच १३ सीजी १५३१ क्रमांकाची दुचाकी ही भगतसिंग मार्केट येथे हॅन्डल लॉक करून पार्क केली होती. ती १५ हजार रुपये किंमतीची दुचाकी चोरट्याने चोरून नेल्याची नोंद सदर बझार पोलिसांकडे करण्यात आली आहे. हवालदार चव्हाण पुढील तपास करीत आहेत.

---




## सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंतीनिमित्त एकता दौड

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३१ ऑक्टोबर-**

भारताच्या एकात्मतेचे शिल्पकार लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांच्या १५० व्या जयंतीनिमित्त भारतीय जनता पार्टी च्या वतीने आमदार विजय देशमुख यांच्या प्रमुख उपस्थितीत एकता दौड शुक्रवारी बलिदान चौक येथून प्रारंभ - तुळजापूर वेस - मंगळवार पेठ पोलिस चौकी - मधला मारुती - महात्मा बसवेश्वर पुतळा - माणिक चौक - सोन्या मारुती - राजवाडे चौक आमदार विजय देशमुख यांच्या संपर्क कार्यालय येथे संपन्न झाली.

भारताचे लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांनी देशाच्या एकीकरणासाठी दिलेल्या अमूल्य योगदानाला अभिवादन करणे तसेच राष्ट्रीय एकात्मता, ऐक्य व सामूहिक शक्तीचा संदेश नागरिकांपर्यंत पोहोचविण्याच्या हेतूने शहर उत्तर विधान सभा मतदारसंघाचे आमदार विजयकुमार देशमुख यांच्या प्रमुख उपस्थितीत या दौडचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी बाबुराव जमादार आदी उपस्थित होते.

सकाळी ७ वाजता तुळजापूर वेस येथील हुतात्मा स्तंभा पासून एकता दौडला सुरुवात करण्यात आली. पुढे हि दौड मधला मारूती, कोंतम चौक, माणिक चौक मार्गे वि रा पाटील व्यापार पेठ येथील आमदार विजयकुमार देशमुख यांच्या कार्यालयासमोर विसर्जित करण्यात आली. यावेळी चौका चौकात दौड चे पुष्पवृष्टी करून स्वागत करण्यात आले. या दौडमध्ये नागेश भोगडे, अमर पुदाले, सचिन कुलकर्णी, देविदास खेडेकर, गणेश साखरे, सिद्धार्थ मजली, सुजित चौगुले उपस्थित होते.

---

## 'मिशन लक्ष्यवेध'ची जिल्हास्तरावर अंमलबजावणी कधी?




मिशन लक्ष्यवेध ही महाराष्ट्र शासनाची एक क्रीडा योजना आहे, जी ऑलिंपिक, आशियाई खेळ आणि राष्ट्रकुल खेळांसारख्या आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये राज्यातील खेळाडूंची कामगिरी सुधारण्यासाठी आणि त्यांना अधिकाधिक पदके मिळवून देण्यासाठी सुरू करण्यात आली आहे.

महाराष्ट्र शासनाच्या ११ जानेवारी २०२४च्या शासन निर्णयानुसार क्रीडा व युवक सेवा संचालनालयामार्फत राज्यातील क्रीडा विकासाकरीता ''मिशन लक्ष्यवेध'' हा महत्वाकांक्षी उपक्रम हाती घेण्यात आला आहे. या योजनेअंतर्गत उच्चदर्जाचे प्रशिक्षण राज्यातील खेळाडूंना प्राप्त होण्याच्या अनुषंगाने क्रीडा संकुलातील आवश्यक सुविधा अद्यावत दर्जाचे उपलब्ध होणार आहेत.




या उपक्रमांतर्गत राज्यातील खेळ व खेळाडू, क्रीडा प्रशिक्षण यंत्रणा, क्रीडाविषयक पायाभूत सुविधा, क्रीडा स्पर्धांचे आयोजन, क्रीडा वैद्यकशास्त्र, खेळाडूंना प्रोत्साहन व पुरस्कार, खेळाडूंना करीअर मार्गदर्शन, खेळाडूंच्या क्षमता विकासासाठी देशी-विदेशी संस्थांचा सहयोग हे सर्व घटक विकसित होणार आहेत. हे घटक विकसीत करण्याकरीता आवश्यक प्रयत्न हे फक्त राज्यस्तरावरुनच नव्हे तर जिल्हा स्तरावरुन देखील होणार आहेत.

''मिशन लक्ष्यवेध '' या योजनेअंतर्गत अॅथलेटिक्स, आर्चरी, बॅडमिंटन, बॉक्सींग, हॉकी, कुस्ती, वेटलिफ्टिंग, शुटींग, रोईंग, सेलिंग, टेबलटेनिस व लॉन टेनिस या १२ क्रीडा प्रकारांची निवड करण्यात आली आहे. यासाठी राज्यस्तरावर १२ हाय परफॉर्मन्स सेंटरही उघडण्यात येणार आहेत. तसेच १२ क्रीडा प्रकारांच्या विभागीय स्तरावरील ८ स्पोर्टस एक्सलन्स सेंटर व जिल्हा स्तरावरील ३६ क्रीडा प्रतिभा विकास केंद्रे स्थापन करण्याचे क्रीडा खात्याने ठरविले आहे. प्रत्येक केंद्रावर वीस खेळाडू निवडून त्यांची विभागीय स्पोर्टस एक्सलन्स सेंटर व नंतर राज्यस्तरावर हाय परफॉर्मन्स सेंटरसाठी निवड करण्यात येणार आहे

त्यानुसार सोलापूर जिल्हा क्रीडा कार्याकडून कुस्तीचे अकलूज व फुलचिंचोली (पंढरपूर), धनुर्धरचे अरण व सोलापूर तर मैदानीचे सोलापूर असे पाच प्रस्ताव पाठविण्यात आले आहेत. या केंद्रांना अ, ब व क श्रेणीनुसार ३०, २० व १० लाखाचे अनुदान मिळणार आहे. आता उद्यापर्यंत याची कार्यवाही झालेली नाही. क्रीडा खात्याकडून माहिती घेतली असता यासाठी राज्य शासनाने १६० कोटी रुपये मंजूर केले आहेत. पैकी ४८ कोटी प्राप्त झाले आहेत. त्यानुसार क्रीडा खाते सर्व प्रथम राज्यस्तरावर बारा हाय परफॉर्मन्स सेंटर सुरू करणार आहे. पैकी मनुष्यबळासाठी सात सेंटरची निविदा प्रक्रिया पूर्ण झाली असून दोन सेंटरची प्रक्रिया सुरू आहे. पुढील महिन्यापर्यंत ही राज्य, विभाग व जिल्हा अशी केंद्रे सुरू होणार असल्याचे सांगण्यात आले. ''मिशन लक्ष्यवेध'' या योजनेची प्रभावी अंमलबजावणी झाल्यास महाराष्ट्र या बारा खेळात अव्वल राहण्यास नक्कीच मदत होणार आहे. त्यासाठी क्रीडा खात्याने या योजनेस गती देणे गरजेचे आहे.

**क्रीडा कार्यकारी अधिकारी पदाचे 'जॉब चार्ट'च नाही तयार**

तसेच राज्य शासनाने राज्यात अव्वल दर्जाचे खेळाडू निर्माण होण्यासाठी, त्यांना अद्यायावत प्रशिक्षण देण्यासाठी मुख्य क्रीडा कार्यकारी अधिकारी २७, क्रीडा कार्यकारी अधिकारी ४० व सहाय्यक क्रीडा कार्यकारी अधिकारी २३ अशा ९० अत्युच्च गुणवत्ताधारक खेळाडूंच्या राज्यात थेट नियुक्त्या केल्या आहेत. परंतु अद्यापपर्यंत त्यांचे ''जॉब चार्ट''च क्रीडा खात्याने तयार केले नाहीत. त्यामुळे हे नियुक्त केलेले खेळाडू प्रशिक्षणाऐवजी जिल्हा क्रीडा अधिकारी यांच्या अंडर क्रीडा अधिकारी व तालुका क्रीडा अधिकारी यांची कामे पाहत आहेत. जिल्हा क्रीडा अधिकारी व मुख्य क्रीडा कार्यकारी अधिकारी ही दोन्ही पदे प्रथम श्रेणीची समकक्ष आहेत. केवळ ''जॉब चार्ट'' नसल्यामुळे हेही जिल्हा क्रीडाधिकारी यांच्या अंडर काम करत आहेत. प्रशिक्षणासाठी नियुक्ती केलेले हे खेळाडू प्रशिक्षणाऐवजी अशी कामे करत असतील तर राज्यातून अव्वल दर्जाचे खेळाडू कसे निर्माण होणार? त्यासाठी सर्वप्रथम क्रीडा खात्याने क्रीडा अधिकारी व तालुका क्रीडा अधिकारी यांची रिक्त पदे भरणे गरजेचे आहे.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्वाचे...



## काँग्रेसतर्फे सरदार वल्लभभाई पटेल व इंदिरा गांधी यांना अभिवादन

**माढा, दि. ३१ ऑक्टोबर-**

भारताचे पहिले उपपंतप्रधान सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंतीनिमित्त व पहिल्या महिला पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्या पुण्यतिथीनिमित्त त्यांना सोलापूर जिल्हा काँग्रेस कमिटी व माढा तालुका काँग्रेस कमिटी यांच्या वतीने व्हिकटरी इंग्लिश स्कूल माढा येथे अभिवादन करण्यात आले. यावेळी सोलापूर जिल्हा काँग्रेस कमिटी सरचिटणीस जहीर मणेर, जिल्हा ओबीसी सेलचे सरचिटणीस मोतीलाल सुतार, माढा शहर अध्यक्ष पृथ्वीराज साठे, संस्थापक सजजनराव रावडे, तालुका काँग्रेस सेवादलाचे अध्यक्ष रमेश रणदिवे, अल्पसंख्याक तालुका उपाध्यक्ष जमिर सय्यद, माढा शहर काँग्रेस कमिटी सदस्य अमर राकुंडे, सलीम पिंजारी, दादा खंडागळे, सोनार उपस्थित होते.



## राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी सोलापूर जेष्ठ नागरिक संघाची कार्यकरिणी जाहीर

**सोलापूर, दि. ३१ आक्टोबर-**

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी सोलापूर ज्येष्ठ नागरिक संघाची बैठक मुरारजी पेठेतील राष्ट्रवादी भवन येथे ज्येष्ठ नागरिक संघाचे अध्यक्ष भारत साबळे यांच्या अध्यक्षतेखाली बैठक पार पाडली. या बैठकीमध्ये नूतन कार्यकारणी पदाधिकारी यांच्या नेमणूक करण्यात आल्या. राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी सोलापूर ज्येष्ठ नागरिक संघाचे पदाधिकारी पुढीलप्रमाणे उपाध्यक्ष दौलत सिताफळे, सचिव पांडुरंग जाधव, ज्ञानेश्वर गुंजाळ, कोषाध्यक्ष निलेश जाधव, शहर संघटक अशोक ससाणे, कार्यकारीणी सदस्य चंद्रकांत केशेगावकर, हरिदास पोरे, राजकुमार कोळेकर, लक्ष्मण चव्हाण, विठ्ठल टकले, महादेव कदम. निवड झालेल्या वरील सर्व पदाधिकारी यांचे राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या पदाधिकाऱ्यांची नूतन जेष्ठ नागरीक संघाच्या पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन केले. यावेळी सोलापूर जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे जिल्हाध्यक्ष संतोष पवार, कार्याध्यक्ष जुबेर बागवान यांनी नूतन पदाधिकारी यांना राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये स्वागत केले. जिल्हाध्यक्ष संतोष पवार यांनी नूतन पदाधिकारी यांना नियुक्तीपत्र व पुष्प देऊन त्यांचा सत्कार केला. याप्रसंगी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे सचिव प्रमोद भोसले उपस्थित होते.

## वीरशैव लिंगायत समाजातील सर्व पोटजातीचा रविवारी वधू-वर परिचय मेळावा

**सोलापूर, दि. ३१ ऑक्टोबर-**

येथील वीरशैव लिंगायत प्रतिष्ठानच्या वतीने रविवार दि. १४ डिसेंबर २०२५ रोजी सकाळी १० ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत सोलापुरातील लिंगशेट्टी मंगल कार्यालय, कस्तुरबा मार्केट जवळ ११ वा राज्यस्तरीय वधू-वर परिचय मेळावा आयोजित करण्यात आला आहे, अशी माहिती मार्गदर्शक ॲड. बसवराज सलगर यांनी पत्रकार परिषदेत दिली. या निमित्ताने मेळाव्यात महाराष्ट्र, कर्नाटक आणि आंध्र प्रदेशातील वीरशैव लिंगायत समाजातील सर्व पोटजातींच्या युवक-युवतींना सहभागी होणार आहेत.



काशीपीठाचे जगदगुरू ज्ञान सिंहासनाधीश्वर श्रीश्रीश्री १००८ डॉ. चंद्रशेखर शिवाचार्य महास्वामीजी व श्रीशैल पीठाचे जगदगुरु श्री श्री श्री १००८ डॉ. चन्नसिद्धाराम शिवाचार्य महास्वामीजी यांच्या आशीर्वादाने हा मेळावा होणार आहे. मेळाव्याच्या स्वागताध्यक्षपदी मुंबईचे विधीज्ञ ॲड. प्रदीप सलगर यांची निवड करण्यात आली आहे. तसेच कार्याध्यक्षपदी टेंभुर्णी येथील उद्योजक गिरीष ताबे, मंगळवेढ्यातील शेतकरी नितीन शेट्टी, समाजसेवक आप्पासाहेब मनगुळी यांची निवड करण्यात आली आहे. मागील १० वर्षात मेळाव्याच्या माध्यमातून जवळपास ५ हजार ८६६ जणांचे विवाह जुळविण्यात प्रतिष्ठानला यश आले आहे. या मेळाव्यात इच्छुक वधूवरांचे व त्यांच्या पालकांचे थेट परिचय, तसेच मागील वर्षातील नोंदणीचे माहिस्तव पुस्तक उपलब्ध असणार आहे. नावनोंदणीसाठी फक्त ५०० रुपये माफक फी आकारण्यात आली आहे. सर्व विवाहेच्छुक बंधू भगिनींनी या मेळाव्यात नाव नोंदणी करावी. नाव नोंदणीसाठी वीरशैव लिंगायत प्रतिष्ठान, जयभवानी शाळा मैदान लगत, कुंभारवेस सोलापूर येथील कार्यालयात सकाळी ११ ते संध्या ७ पर्यंत सुनिल शरणार्थी (९४२००८९२९२) यांना संपर्क साधावा, असे असे आवाहन ॲड. बसवराज सलगर आणि अध्यक्ष राजशेखर विजापुरे यांनी केले आहे. पत्रकार परिषदेस सुनील शरणार्थी, शशिकांत बिराजदार, मनोजकोल्हे, तम्मा कडगंची, आप्पासाहेब मनगुळी, गिरीश तांबे, बाबुराव कलदी, मनोज कोल्हे, प्रदीप सलगर उपस्थित होते.

## श्री बनशंकरी देवी देवस्थानतर्फे बुधवारी दीपोत्सवाचे आयोजन

**सोलापूर, दि. ३१ ऑक्टोबर-**

साखरपेठ येथील श्री बनशंकरी (चौडेश्वरी) देवी देवस्थान यांच्या वतीने त्रिपुरारी पौर्णिमेनिमित्त बुधवार ५ नोव्हेंबर रोजी सायंकाळी ६ वाजता दीपोत्सव आयोजित करण्यात आला आहे, अशी माहिती अध्यक्ष अनिल यरगल यांनी पत्रकार परिषदेत दिली. या दीपोत्सवासाठी सात ते आठ हजार भाविक उपस्थित राहणार आहेत. याप्रसंगी लकी ड्रॉ काढण्यात येणार असून साडी व पैठणी असे बक्षीस देण्यात येणार आहे. देवस्थानच्या वतीने दरवर्षी विविध धार्मिक उपक्रम राबविण्यात येतात. या पत्रकार परिषदेस अशोक यरगल, गंगाधर रेगळ, विठ्ठल होटगी, राजेश दिंड्डी, गणेश गंजी आदी उपस्थित होते.

# हातगाडीवाले, किरकोळ व फिरते विक्रेते यांना रस्त्यावर दुकाने लावण्यास प्रतिबंध

### जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांचे आदेश

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.३१ ऑक्टोबर-**

कार्तिक शुद्ध एकादशीला पंढरपूर शहरात मोठ्या प्रमाणात यात्रा भरते. कार्तिकी शुध्द एकादशी रविवार दि. २ नोव्हेंबर रोजी असून, दि.२६ ऑक्टोबर ते ५ नोव्हेंबर कार्तिक यात्रा सोहळ्यासाठी सुमारे आठ ते दहा लाख भाविक पंढरपूरला येतात. यात्रा कालावधीत दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांना हातगाडीवाले, किरकोळ व फिरते विक्रेते साहित्य विक्रीसाठी रस्त्यावर बसलेले असतात. दर्शनासाठी आलेल्या भाविकांना विक्रेत्यांचा त्रास होऊ नये यासाठी , शिवाजी चौक परीसर, श्रीकृष्ण मंदीर, चौफाळा ते



श्री विठ्ठल रूक्मिणी मंदिर पश्चिम द्वार, मंदीर परीसर, पुढे महाद्वार चौक परीसर या भागात साहित्य विक्री करण्यास मनाई करण्यात आली आहे.

जिल्हादंडाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी भारतीय नागरीक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ (२) अन्वये दि. ३१ ऑक्टोबर रोजी सकाळी ८.०० ते ५ नोव्हेंबर रोजीचे रात्री ८.०० पर्यंत या कालावधीत हातगाडीवाले, किरकोळ विक्रेते, फिरते विक्रेते तसेच उक्त परीसरातील दुकानदार यांना अतिक्रमण करण्यास, रस्त्यावर दुकान लावणे, साहित्य विक्री करणे यास प्रतिबंध करण्यात आला आहे. सदरच्या आदेशाची अंमलबजावणी पोलीस प्रशासनाने करावी. आदेशाचे उल्लंघन झालेस उल्लंघन करणारेविरुध्द भारतीय न्याय संहिता २०२३ मधील कलम २२३ अन्वये कारवाईस पात्र राहिल. असेही नमूद करण्यात आले.

# कॉरिडॉर सक्तीची धमकी चुकीची : तीर्थक्षेत्र बचाव समिती

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३१ ऑक्टोबर-**

जिल्हाधिकारी यांनी नुकतेच पत्रकार परिषदेमध्ये कॉरिडॉर कोणत्याही परिस्थितीत रद्द होणार नाही,तसे कायद्यात तरतूद नाही, कोर्टात जाऊन काहीही फायदा होणार नाही आदी धमकी वजा भाषा वापरून बाधितांना भयभीत करण्याचा प्रयत्न केला हे चुकीचे आहे अशी प्रतिक्रिया तीर्थक्षेत्र बचाव समितीचे अध्यक्ष अभयसिंह कुलकर्णी इचगांवकर यांनी व्यक्त केली.

या बाबत प्रसिध्दीस दिलेल्या पत्रकात इंचगावकर कुलकर्णी नमूद केले आहे की, वास्तविक पाहता कॉरिडॉर हाच कायदेशीर नाही तो जुन्या विकास योजनेत घुसवलेला आहे. तरीसुद्धा एमआरटीपी अँक्ट (सदतीस - एक ) प्रमाणे हजारो नागरिकांनी हरकती लावलेल्या आहेत. घाई घाईने पूर परिस्थितीत सुद्धा प्रशासनाने सुनावण्या उरकले आहेत. याचा अहवाल शासनाकडे जाणेचा आहे व नंतर त्यावर महाराष्ट्र शासनाचा निर्णय होणार आहे. हा प्रोसिजरचा भाग आहे. ही सर्व प्रक्रिया निव्वळ फार्स आहे काय? असे असून सुद्धा जिल्हाधिकारी चुकीचे विधाने कशी काय करू शकतात? हरकती व त्यावरील सुनावणी मधील मुद्यातून सरकार कदाचित बदल करू शकते, रद्द करू शकते. आता चेंडू महाराष्ट्र शासनाच्या हातात आहे. जिल्हाधिकारी साहेबांच्या नव्हे. पुणे जैन बोर्डिंग प्रमाणे अनेक निर्णय शासनाने मागे घेतले आहेत. त्याप्रमाणे हा देखील निर्णय मागे घेतला जाईल असा आम्हास ठाम विश्वास आहे.पंढरपूर तीर्थक्षेत्र बचाव समितीचे काही वकील मंडळी कसून अभ्यास करत आहेत. बरेच निवाडे आमच्याकडे दाखवण्यासारखे आहेत. मात्र ते आम्ही वेळ आल्यावर न्यायालयालाच दाखवू. दुसऱ्या कोणाला नव्हे. यापूर्वी हे जिल्हाधिकारी बाधित आमच्या बाजूने आहेत असे म्हणत होते परंतु बचाव समितीच्या अभिरुप मतदानात ते खोटे पडले आहे. बाधित भयभीत झाले आहेत हे खरे आहे. त्यांना आणखी दम देऊन गर्भगळित करणे हे मुख्यमंत्री फडणवीस यांच्या लौकिकाला साजेसे नाही. कारण फडणवीस पहिल्यापासून कारिर्डर जबरदस्तीने करणार नाही. सर्वांना विश्वासात घेऊन करू असेच म्हणत आहेत. मात्र जिल्हाधिकारी वेगळी भाषा वापरत आहेत. याबद्दल पंढरपूर तीर्थक्षेत्र बचाव समिती खेद व्यक्त करीत आहे. अजून बराच लांबचा पल्ला गाठावयाचा आहे तरी बाधिताने भयभित होऊ नये,असे आवाहन कुलकर्णी इचगांवकर यांनी केले.

# वादविवाद विसरून सर्वांनी भगव्यासाठी एकत्र यावे : गणेशकर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३१ ऑक्टोबर-**

शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या सोलापूर शहरातील सर्व जूने, नवीन आजी-माजी पदाधिकारी शिवसैनिकानी आपल्या पक्षाच्या भगव्या झेंड्याखाली एकत्र यावे, पक्षाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांचे हात बळकट करण्यासाठी येणाऱ्या आगामी महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर एकत्र येऊन जास्तीत जास्त नगरसेवक कसे निवडून येतील या कडे लक्ष केंद्रित करून, हेवेदावे वाद विवाद विसरून सर्वांनी भगव्याखाली यावे असे आवाहन उपजिल्हाप्रमुख दत्तात्रय गणेशकर यांनी केले आहे.



सोलापूर जिल्हा संपर्कप्रमुख अनिल कोकीळ हे गेल्या दोन वर्षांपासून सोलापूर शहरात पक्षाच्या वाढीसाठी आवश्यक प्रयत्न केले आहेत त्यांनी शहरातील सर्व प्रभागातील सर्व निवडणुका यंत्रणा मुंबईच्या धर्तीवर तयार करून घेतली आहे मागील अनेक वर्षांपासून एकनिष्ठ असलेले अनेक वरिष्ठ पदाधिकारी आहेत त्यांचे पक्षासाठी दिलेले योगदान हे विसरून चालणार नाही. मागील काळात शहरात आमदार, नगरसेवक होऊन गेले ते पक्षाच्या जिवावर मोठे झाले, पण पक्षाबरोबर काही मंडळी गद्दारी करून निघून गेले पण आज जी जूनी मंडळी आहेत ते एकनिष्ठ राहिले आहेत याबद्दल उद्धव ठाकरे यांनी सोलापूर जिल्ह्यातील सर्व पदाधिकाऱ्यांचे आभार मानले होते. आगामी सोलापूर महानगरपालिका निवडणूकमध्ये आपल्या पक्षासाठी चांगले वातावरण आहे. मतदार व सोलापूर मधील जनता शिवसेना पक्षाबरोबर आहे हे विसरून चालणार नाही, असे असताना आपल्या मधील मतभेद चव्हाट्यावर न येता मागील काळातील पक्षाती केलेल्या गद्दाराला गाडून आपल्या शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या निष्ठावंत शिवसैनिकांना निवडणुकीत निवडून आणायचे आहे व सोलापूर महानगरपालिका वर भगवा झेंडा फडकविण्यासाठी सज्ज झाले पाहिजे, असे ही आवाहन गणेशकर यांनी केले आहे.

# जेऊर स्थानकावर 'सोलापूर-अजमेर विशेष सुपरफास्ट' गाडीला थांबा द्यावा

### प्रवाशांची मागणी



**तभा वृत्तसेवा,**
**जेऊर दि.३१ ऑक्टोबर-**

सोलापूर -अजमेर या गाडीला जेऊर स्थानकावर थांबा मंजूर करावा, अशी मागणी स्थानिक मा.खासदार,आमदार, मुस्लिम संघटना, प्रवासी संघटना व व्यापारी वर्गातून होत आहे. जेऊर हे करमाळा आणि जामखेड तालुक्यांच्या दळणवळणाच्या दृष्टिकोनातून अत्यंत महत्त्वाचे स्थानक आहे.

या परिसरात मुस्लिम समाजाची मोठी लोकसंख्या वास्तव्यास असून, अजमेर येथील प्रसिद्ध दरग्याला भेट देण्यासाठी मोठ्या संख्येने भाविक प्रवास करतात. सध्या या भागातून अजमेरकडे जाण्यासाठी हीच एकमेव रेल्वे सेवा उपलब्ध आहे.

तसेच जेऊर पासून ३० किलोमीटर अंतरावरील अलहज वली चाँदपाशा दर्गा देशभरातील भाविकांचे श्रद्धास्थान आहे. त्यामुळे जेऊर स्थानकासाठी सोलापूर अजमेर रेल्वे सेवा उपयुक्त ठरणार आहे. रेल्वे प्रशासनाने जेऊर स्थानकावर येताना आणि जाताना थांबा मंजूर करावा अशी मागणी जेऊर प्रवासी असोसिएशन अध्यक्ष सुहास सुर्यवंशी यांनी केली आहे.

> सुरत येथे मोठे होलसेल कपडा मार्केट आहे, येथे खरेदी -विक्रीसाठी या भागातील व्यापाऱ्यांना सतत जावे लागते त्यामुळे व्यापारी वर्गाच्या दृष्टीने या गाडीला थांबा होणे महत्त्वाचे आहे.
>
> **-डॉ. कालिदास लिमकर**
> सदस्य -झोनल रेल्वे सल्लागार समिती सदस्य

> सोलापूर -अजमेर -सोलापूर या साप्ताहिक विशेष रेल्वे गाडीस जेऊर रेल्वे स्टेशनला प्रवासी थांबा मंजूर करणेसाठी प्रवासी सेवा संघाने रेल्वे प्रशासनाकडे निवेदन सादर केलेले असून विभागीय कार्यालय सोलापूर व मध्य रेल्वेचे क्षेत्रीय मुख्यालय मुंबई या कार्यालयाकडे थांबा मंजुरीकरीता सातत्याने पाठपुरावा करणेत येत आहे .
>
> **- संजय पाटील**
> सदस्य - विभागीय रेल्वे सल्लागार समिती, सोलापूर

## महाराणा प्रताप नगरात हाणामारीप्रकरणी चौघांवर गुन्हा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३१ ऑक्टोबर-**

शहरातील महाराणा प्रताप नगरात झालेल्या हाणामारीप्रकरणी तीन महिलांसह चौघांवर विजापूर नाका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत मुन्नीबाई दत्ता धोत्रेवाले (वय ५०, रा. बापूजी नगर, सिध्दार्थ चौक, सोलापूर) या महिलेच्या फिर्यादीवरुन भरत बजरंग कल्लावाले, प्रिती भरत कल्लावाले, राधा, चैताली (सर्व रा. महाराणा प्रताप नगर, सोलापूर) यांच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मुन्नीबाई यांची मुलगी सोनी कल्लावाले हिच्या सासरकडील लोकांनी तिला मारहाण केली होती. याबाबत जाब विचारण्यासाठी मुन्नीबाई या २७ ऑक्टोबर रोजी रात्री कल्लावाले यांच्या घरी गेली होती. त्यावेळी भरत कल्लावाले याने हाताने मारहाण करून बॅटने मारहाण केली. तसेच प्रिती, राधा, चैताली यांनी मुन्नीबाई हिच्या डोक्यात मारहाण करून जखमी केले. म्हणून विजापूर नाका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हवालदार मणुरे पुढील तपास करीत आहेत.

## ५० हजारांची खंडणी मागणाऱ्या तोतया पीएसआयला अटक

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३१ ऑक्टोबर-**

दुकानदारास भिती दाखवून ५० हजार रुपयांची खंडणी मागणाऱ्या तोतया पीएसआयला विजापूर नाका पोलिसांनी अटक केली.

राहुल कल्लप्पा वग्गे (रा. लिंबी चिंचोळी, ता. दक्षिण सोलापूर) असे अटक करण्यात आलेल्या तोतया पीएसआयचे नाव आहे. याबाबत महादेव संगप्पा याळगी (रा. ऋषि हाईटस, ओम गर्जना चौक, सोलापूर) याने दिलेल्या फिर्यादीवरुन विजापूर नाका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ३० ऑक्टोबर रोजी सकाळी आकराच्या सुमारास महादेव याळगी याच्या सैफुल येथील अश्वित ट्रेडर्स या दुकानात राहुल वग्गे हा आला. त्याने तो पीएसआय असल्याचे सांगून त्याच्या गळ्यातील बनावट आयडेंटी कार्ड दाखविले.

तुम्ही सिगारेट व पान मसाल्याचा माल का विकता, तो सगळा जप्त करावा लागेल, तुम्हांला अटक करावी लागेल अशी भिती याळगी यांस घातली. असे न करण्यासाठी ५० हजार रुपयांची खंडणी मागून वग्गे याने पीएसआयचे बनावट आयडी वापरून फसवणुक केली. म्हणून विजापूर नाका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सहायक पोलिस निरीक्षक गायकवाड पुढील तपास करीत आहेत.

## २२ वर्षानंतर नूतन विद्यालयातील माजी विद्यार्थी पुन्हा बसले त्याच बेंचवर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३१ ऑक्टोबर-**


नव्या रूपातील तीच शाळा, तेच बेंच, तेच वातावरण, तेच मित्र मैत्रिणी अशा रूपात २२ वर्षानंतर माजी विद्यार्थी एकमेकांना भेटले. निमित्त होते माजी विद्यार्थ्यांचा मेळावा म्हणजे गेट-टुगेदर.

आष्टी तालुका मोहोळ येथील नूतन विद्यालयातील २००२-२००३ च्या इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांचा मेळावा नूतन विद्यालयात संपन्न झाला. मेळाव्याच्या अध्यक्षांनी प्रशालेतील जेष्ठ सेवानिवृत्त शिक्षक अण्णासाहेब भालशंकर हे होते. या मेळाव्याच्या प्रसंगी प्रशालेचे निवृत्त मुख्याध्यापक चंद्रशेखर वसेकर, निवृत्त शिक्षक बी आर नलवडे, सुरेश चव्हाण, तसेच शाळेचे पर्यवेक्षक धैर्यशील पवार,शाळेचे वरिष्ठ लिपिक नितीन पंढरे,त्याचप्रमाणे सेवक गौतम कांबळे, साधू बुवा वाघमोडे, निवृत्त ग्रंथपाल लालू आवाने, लिपिक संतोष दुर्गे उपस्थित होते.



शाळेच्या या माजी विद्यार्थ्यांमध्ये पुणे येथील कार्डिओलॉजिस्ट आणि हृदयरोग तज्ञ डॉ. काकासाहेब भोसले, तसेच पुणे येथील अधीक्षक अभियंता सुहास गायकवाड, त्याचप्रमाणे टीसीएस अभियंता लक्ष्मण व्यवहारे (पुणे), शासकीय तंत्रनिकेतन सोलापूर येथील प्रा. स्वप्निल गुंड, एम क्यू आर फार्माचे व्यवस्थापक कृष्णा सुळे (सोलापूर), पुणे येथील फायनान्स ऑफिसर राजेश अंदुरकर तसेच माजी विद्यार्थिनी सोनाली पाटील (सातारा) प्रियंका चव्हाण, प्रा.अश्विनी आढवळकर, निलेश गुंड यांच्यासह ९० माजी विद्यार्थी विद्यार्थिनी उपस्थित होते. मेळाव्याचे प्रास्ताविक पूनम एडके यांनी केले. सूत्रसंचालन कृष्णा सुळे यांनी केले तर स्वप्निल गुंड यांनी आभार मानले. यावेळी मार्गदर्शक शिक्षकांना भेटवस्तू देण्यात आल्या. या मेळाव्याचे आयोजन निलेश गुंड, लक्ष्मण व्यवहारे, कृष्णा सुळे, सोनाली पाटील, महादेव भोसले आदींनी केले होते.

# ऑनलाईन कामामुळे शिक्षक वैतागले




**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३१ ऑक्टोबर-**

शिक्षण विभागाच्या सूचनेनुसार सर्वच शाळांतील शिक्षकांना दररोज १५ ते २० मोबाइल ॲप्स वापरावे लागत आहेत. या ॲपमध्ये विद्यार्थ्यांची हजेरी, शाळेची माहिती आणि अहवाल नोंदवताना त्यांचा वेळ अधिक खर्च होत आहे. त्यामुळे मोबाइलबरोबर शिक्षकच हँग होत आहेत. म्हणून शिकविण्यासाठी कमी वेळ मिळत असल्याचे शिक्षकांनी सांगितले.

वारंवार ॲप्स हँग होणे, कमी वेळेत माहिती भरण्याकरिता दबाव यामुळे मानसिक ताण वाढला आहे. विद्यार्थ्यांवर लक्ष देण्याऐवजी तोच तोच डेटा नोंदविण्यावर भर दिला जातो, अशी खंत- शिक्षकांनी व्यक्त केली. दुसरीकडे ॲप्सचे एकत्रीकरण केले जात असल्याने मॅन्युअल काम कमी झाल्याने शिक्षकांचा वेळ वाचत आहे, असेही म्हणणे आहे. एकच माहिती दोन ते तीन वेळा ॲपमध्ये भरावी लागते. त्यामुळे विद्यार्थी व शिक्षकांमध्ये अंतर निर्माण होते. त्याचा परिणाम शैक्षणिक कामगिरी खालविण्यात होत आहे. शिक्षण विभागाकडून वरिष्ठ पातळीवर सर्व डिजिटल कामाचे एकत्रीकरण करण्याची प्रक्रिया सुरू आहे. त्यामुळे शाळेतील सर्व माहीती ऑनलाईन करण्यासाठी पुढील कालावधीत ही प्रक्रिया पूर्ण होईल.

> **'या' ॲप्समुळे शिक्षक अडचणीत**
>
> पोर्टल, ॲप्स नाव, दीक्षा, सरळ ॲप, यू-डाइस प्लस, शाळा सिद्धी, निपुण महाराष्ट्र, प्रेरणा शाळा संवाद, महाडीबीटी उपस्थिती, समग्र शिक्षण पोर्टल, शाळा पोषण, एमएससीईआरटी ई-बालभारती, उदय व निष्ठा प्रशिक्षण, शोमिस शालार्थ पोर्टल, परीक्षा व्यवस्थापन प्रणाली.

> **ॲपची कामे या प्रमाणे**
>
> शैक्षणिक साहित्य, प्रशिक्षण व मूल्यांकन, विद्यार्थी नोंदणी, शाळा, निकाल व अहवाल, सांख्यिकीय माहिती संकलन, स्वयंमूल्यांकन व गुणवत्ता विश्लेषण, विद्यार्थ्यांच्या मूलभूत शिक्षण प्रगती नोंदणी ,विद्यार्थी उपक्रम व पालक संवाद सुलभ , शिष्यवृत्ती व विविध शैक्षणिक लाभ योजना, शिक्षक उपस्थिती व पडताळणी, शाळा सुधारणा, अनुदान व प्रगती अहवाल, मध्यान्ह भोजन अहवाल व विद्यार्थ्यांची उपस्थिती, शिक्षक प्रशिक्षण, अभ्यासक्रम व प्रमाणपत्र, शाळा व्यवस्थापन, सभांचे अहवाल व माहिती नोंद, शिक्षकांचे वेतन, सेवा नोंदी व भत्ते, परीक्षा नियोजन, देखरेख व निकाल नोंदविणे.

## अध्यापनापेक्षा अतिरिक्त कामाचा अधिक ताण

> **स्वतंत्र मनुष्यबळ दिले पाहिजे**
>
> शाळेत विद्यार्थ्यांना शिकविण्यापेक्षा इतर ऑनलाईन कामामुळे शिक्षकांचा अधिक वेळ वाया जात आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या शिकविण्याकडे वेळ देण्यास अवघड जात आहे. असे काम करण्यासाठी स्वतंत्र मनुष्यबळ दिले पाहिजे.
>
> **- महेश केवटे, शिक्षक**

> **शिक्षकांचा वेळ वाया जातो**
>
> मोबाइल ॲप्स हँग होण्याच्या सततच्या प्रकाराने शिक्षकांचा वेळ वाया जात असल्याने विद्यार्थ्यांकडे लक्ष देण्याऐवजी कामाचा ताणच अधिक असल्याचे शिक्षकांचे म्हणणे आहे. मोबाईलवरील ऑनलाईन कामे करताना निर्माण होणाऱ्या अडचणी सोडविण्यासाठी प्रयत्न व्हावे.
>
> **-वागेश शास्त्री, मुख्याध्यापक, उध्दवराज प्रशाला.**

CMYK

# आपला जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## नूमवि मराठी शाळेत राष्ट्रीय एकात्मता दिवस साजरा

**सोलापूर, दि. ३१ ऑक्टोबर-**

नू. म. वि. मराठी शाळेत लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांची जयंती राष्ट्रीय एकात्मता दिवस म्हणून साजरा करण्यात आला. भारताच्या माजी पंतप्रधान इंदिरा गांधी यांचा स्मृतिदिन साजरा करण्यात आला. माननीय मुख्याध्यापिका स्मिता माळवदकर यांच्या हस्ते प्रतिमा पूजनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. दिपाली कुलकर्णी यांनी मनोगत व्यक्त केले. अनन्या फुलारी इयत्ता पहिली या विद्यार्थिनीने इंदिरा गांधीजी यांची वेशभूषा परिधान केली होती. सूत्रसंचालन व आभार नर्मदा कनकी यांनी मानले.



## महत्त्वाचे



**अक्कलकोट : आंतरराष्ट्रीय स्तरावर भारताचे प्रतिनिधीत्व करणारी व सुवर्णपदक पटकविणारी आंतरराष्ट्रीय महिला कबड्डी खेळाडू सेरेना म्हसकर यांचा सत्कार करताना अक्कलकोट येथील श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळ ट्रस्ट संस्थेचे अध्यक्ष जनमेजयराजे विजयसिंहराजे भोसले.**



**सोलापूर : गुरुवार ३० ऑक्टोबर रोजी गिरनार, जूनागढ येथे स्थित गुरु गोरक्षनाथ महाराजांच्या पवित्र शिखरावर गुरु गोरक्षनाथ महाराजांच्या मूर्तीची प्रतिष्ठापना आणि स्थापना पीरयोगी महंत सोमनाथ बापू यांच्या पवित्र आशीर्वाद व मार्गदर्शनात ध्यानगुरु रघुनाथ येमुल गुरुजींना हे दिव्य सौभाग्य व लाभ प्राप्त झाला. हा दिव्य सोहळा सर्व नाथ भक्त, गुरुदेव दत्त भक्त, साधू-संत, साधक आणि श्रद्धाळूजनांच्या उपस्थितीत आणि सहकार्याने भावपूर्ण व यशस्वीपणे संपन्न झाला.**

### उपसंचालक न्याय वैज्ञानिक प्रयोगशाळा यांना न्यायालयाची कारणे दाखवा नोटीस

**सोलापूर, दि ३१ ऑक्टोबर-**

तब्बल एक वर्षापासून अधिक काळ कारागृहात खितपत पडलेल्या आरोपीच्या खटल्याची सुनावणी केवळ रासायनिक तज्ञाकडून जप्त मुद्देमालाची तपासणी होऊन अहवाल न आल्याने खोळांबून असल्यामुळे, उपसंचालक न्याय वैज्ञानिक प्रयोगशाळा सोलापूर यांना कारणे दाखवा अशी नोटीस काढण्याबाबत आरोपीपक्षातर्फे केलेला अर्ज न्यायालयाने मंजूर करुन उपसंचालकांना कारणे दाखवा नोटीस काढली आहे. अत्याचार केल्याच्यां आरोपावरुन एक वर्षापासून कारागृहात खितपत पडलेल्या श्रीराम शिंगाडे रा. ईश्वर वाठार (ता. पंढरपूर) या युवकाच्या खटल्याची सुनावणी तब्बल एक वर्षापुर्वी रासायनिक तज्ञाकडे पाठवण्यात आलेल्या जप्त मुद्देमालाची रासायनिक तपासणी होवुन मुद्देमाल परत न आल्याने आणि तपासणी अहवाल न आल्याने खोळंबुन राहिलेली आहे. न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे पंढरपूर ग्रामीण पोलिसांनी मुद्देमाल परत आणण्यासाठी नेमणुक केलेला स्पेशल कॉन्स्टेबल सोलापूर येथील न्याय वैज्ञानिक प्रयोगशाळा येथे जाऊन मुद्देमाल परत मिळणे बाबत पत्र देऊन तीन महिने



उलटून गेले, तरीही तज्ञांनी मुद्देमाल तपासणी करुन अहवाल दिला नाही आणि मुद्देमालदेखील परत केला नाही त्यामुळे, आरोपीचे वकील ड. धनंजय माने यांनी उपसंचालक न्याय वैज्ञानिक प्रयोगशाळा सोलापूर यांना कारणे दाखवा नोटीस काढण्यात यावी असा अर्ज न्यायालयात सादर केला. न्यायालयाने सदर अर्ज मंजुर करुन उपसंचालक यांना कारणे दाखवा नोटीस काढून प्रकरण सुनावणीसाठी दि. ३ नोव्हेंबर २०२५ रोजी नेमले आहे. या खटल्यात आरोपतर्फे ॲड. धनंजय माने, ड. जयदीप माने ॲड.सिध्देश्वर खंडागळे, ॲड. सुहास कदम, ॲड. वैभव सुतार, ॲड. किरण गवळी तर सरकारतर्फे ॲड. शेख काम पाहत आहेत. खटल्याच्या सुनावणी विना अनेक आरोपी न्यायलयीन कोठडीत खीतपत पडलेले आहेत. त्या आरोपींचे खटले त्वरीत चालवणेबाबत उच्च न्यायालयाने व सर्वोच्च न्यायालयाने वेळोवेळी आदेश दिलेले आहेत. परंतु केवळ रासायनिक तज्ञांचा अहवाल व मुद्देमाल न्यायालयात सादर न केला गेल्यामुळे अनेक खटल्याची सुनावणी होत नसल्यामुळे अनेक कच्च्या कैद्यांना बंदीवासात राहावे लागत आहे. याबाबत उच्च न्यायालयात आरोपीतर्फे याचिका दाखल करण्यात येणार आहे.

### ५ नोव्हेंबर रोजी पंढरपुरात शास्त्रीय संगीताची मैफीलीचे आयोजन

**पंढरपूर, दि.३१ ऑक्टोबर -**




अभिजात भारतीय शास्त्रीय संगीताच्या प्रसारासाठी प्रचारासाठी सदैव प्रयत्नशील असणाऱ्या नादब्रह्म कला फाऊंडेशन करकंब आणि आरती साऊंड सिस्टीम मनमाडकर परिवार यांचे वतीने शास्त्रीय संगीताची मैफल बुधवारी दि.५ नोव्हेंबर सायंकाळी ६:०० वाजता आरती मंडप प्रांगण भक्तीमार्ग श्रीक्षेत्र पंढरपूर येथे आयोजित करण्यात आली आहे. या मैफली मध्ये प्रथम सत्रात पद्मश्री डॉ अश्विनीताई भिडे-देशपांडे यांच्या शिष्या डॉ रेवती भरत कामत तर द्वितीय सत्रामध्ये पद्मविभूषण डॉ प्रभा अत्रे यांच्या शिष्या आणि किराणा घराण्याच्या प्रसिद्ध गायिका आरती ठाकूर -कुंडलकर यांच गायन आयोजित करण्यात आले असून त्यांना हार्मोनियम साथ सुयोग कुंडलकर, तबला संजय देशपांडे, पखवाज ज्ञानेश्वर दुधाणे यांची सुंदर साथसंगत लाभणार आहे. ध्वनीव्यवस्था आरती साऊंड धनंजय भैय्या मनमाडकर यांची असणार आहे.

# चंद्रभागा वाळवंट व मंदिर परिसर स्वच्छ ठेवा : पालकमंत्री गोरे

**• पंढरपुरात आढावा बैठक**



**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.३१ ऑक्टोबर-**

श्री विठ्ठल रुक्मिणी मातेच्या दर्शनासाठी आषाढी, कार्तिकी, चैत्री व माघी या प्रमुख यात्रांसह एकादशी दिवशी लाखो भाविक तसेच दररोज हजारो भाविक पंढरपूरला येतात. विठुरायाच्या दर्शनाची आस घेऊन येणाऱ्या लाखो भाविकांना विठुरायाच्या दर्शनासोबत चंद्रभागेचे स्नान केल्याशिवाय वारी पुर्ण केल्याचे समाधान मिळत नसते त्यामुळे वारकरी संप्रदायात विठ्ठल रुक्मिणी दर्शना एवढेच चंद्रभागेच्या पवित्र स्नानाला महत्त्व असल्याने चंद्रभागा वाळवंट व मंदिर परिसर कायम स्वच्छ राहील याची दक्षता घ्यावी अशा सूचना, ग्रामविकास व पंचायतराज मंत्री तथा पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी दिल्या.

यावेळी पालकमंत्री जयकुमार गोरे म्हणाले, उघड्यावर शौचालयास बसू नये यासाठी जनजागृती व आवश्यक उपाययोजना कराव्यात. दर्शन रांगेतील भाविकांना तात्काळ व सुलभ दर्शन व्यवस्था व्हावी यासाठी मंदिर समितीने व्हीआयपी दर्शन तसेच दर्शन रांगेत घुसखोरी होणार नाही याची दक्षता घ्यावी. त्याचबरोबर भाविकांना सुरक्षा रक्षकांचा नाहक त्रास होणार नाही याची दक्षता घेऊन, सुरक्षारक्षकांना आवश्यक ते प्रशिक्षण देऊन प्रशिक्षित सुरक्षा रक्षक नेमावेत. चंद्रभागा नदी स्नानासाठी मोठ्या प्रमाणात भाविकांची गर्दी होते यासाठी आपत्ती व्यवस्थापन अंतर्गत सुस्थितीत बोटी तसेच प्रशिक्षक कर्मचारी सज्ज ठेवावेत. महामार्ग प्राधिकरणाने अपूर्ण कामे तात्काळ पूर्ण करावेत चंद्रभागा एसटी स्टँडवर स्वच्छता व सुलभ सौचालयाची व्यवस्था करावी. राज्य उत्पादन शुल्क विभागाने वारी कालावधीत अवैध दारू विक्री होणार नाही याची दक्षता घ्यावी. पोलीस प्रशासनाने वाहतूक व्यवस्थेबाबत नियोजन करावे. अशा सूचनाही पालकमंत्री गोरे यांनी यावेळी दिल्या. यावेळी मंदिर समिती, नगरपालिका, आरोग्य विभाग, पाटबंधारे विभाग, एसटी महामंडळ, राज्य उत्पादन शुल्क, अन्न व औषध प्रशासन, महावितरण आदी विभागांचा आढावा पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी यावेळी घेतला.

यात्रा नियोजनाबाबत केबीपी कॉलेज पंढरपूर येथील सभागृहात बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम, उपविभागीय पोलीस अधिकारी प्रशांत डगळे, उपविभागीय अधिकारी सचिन इथापे, मंदिर समितीचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके, कार्यकारी अभियंता अमित निमकर, तहसीलदार सचिन लंगुटे, मुख्याधिकारी महेश रोकडे, उपजिल्हा रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. दीपक धोत्रे उपस्थित होते.

**पालकमंत्र्यांकडून दर्शन रांग, पत्रा शेडची पाहणी**

कार्तिकी यात्रेच्या अनुषंगाने श्री विठ्ठल रुक्मिणी मातेच्या दर्शनासाठी पंढरपूरात मोठ्या प्रमाणात भाविक दाखल झाले असून, दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांना दर्शनरांग, पत्राशेड येथे मंदिर समितीकडून आवश्यक सोयी सुविधा उपलब्ध केल्या जातात. या ठिकाणी देण्यात आलेल्या सोयी सुविधांची पाहणी आज पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी केली.

**पालकमंत्र्यांच्या हस्ते भाविकांना अन्नदान**

यावेळी दर्शनरांगेतील भाविकांना मंदीर समितीकडून मोफत अन्नदान सुरु असून आज पालकमंत्री गोरे यांच्या हस्ते दर्शन रांगेतील भाविकांना अन्नदान करण्यात आले.

**दर्शन रांग द्रुतगतीने चालावी यासाठी ज्यादा सुरक्षारक्षक**

यावेळी मंदिर समितीकडून वारी कालावधीत दर्शन रांगेतील भाविकांना देण्यात येणाऱ्या सोयी सुविधांची माहिती मंदिर समितीचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी दिली.

## शुभराय मठातून उद्या रथयात्रा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.३१ ऑक्टोबर-**

रविवार, दि. २ नोव्हेंबर २०२५ रोजी, श्री शुभराय महाराज मठ येथे, प्रबोधिनी एकादशी निमित्त (कार्तिकी एकादशी) श्री ची सवाद्य रथयात्रा दुपारी १२ ते सायं. ६ वाजेपर्यंत श्री शुभराय महाराज मठातून निघणार आहे.

शालेय विद्यार्थ्यांनी, कॉलेज तरुणांनी, महिलांनी, आबाल वृद्धांनी, सर्वांनी या रथयात्रेत खूप मोठ्या संख्येने सहभागी व्हावे ही विनंती. सकाळी १० वाजता भजनात सहभागी होऊन भक्तीभावाने दुपारी १२ वाजता आरती करुयात आणि विठूराया नामगजर करीत रथयात्रेत सहभागी होऊ या. हरी नामाचा झेंडा रोवू या. रथाबरोबर श्री शुभराय महाराजांच्या पादुका व श्री शंकर महाराजांच्या पादुका असलेली पालखी असते. या पालखी बरोबर आपण चालू या. पाऊले टाकू या. रथाबरोबर सोलापूर शहरातील प्रशालेतील विद्यार्थी, भजनी मंडळाच्या महिला, युवक-युवती, बाळगोपाळ सर्वांचा उत्साह पाहण्यासारखा असतो.

रथयात्रा मार्ग : श्री शुभराय महाराज मठ - स्टार बेकरी - नवी पेठ - चौपाड श्री विठ्ठल मंदिर - पंजाब तालिम - मल्लिकार्जुन मंदिर - बाळीवेस चौक - टेलिफोन भवन - चाटी गल्ली - सराफ कट्टा - भांडे गल्ली - माणिक चौक - फौजदार चावडी - खाटीक मशीद - दत्त चौक - श्री शुभराय महाराज मठास प्रदक्षणा.

## शेतकऱ्यांना एकरकमी नुकसानभरपाई मिळावी

**सोलापूर, दि. ३१ ऑक्टोबर -**

अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानी पोटी महाराष्ट्र शासनाने अतिवृष्टी झालेल्या भागातील प्रत्येक शेतकऱ्याला प्रति हेक्टरी अठरा हजार पाचशे ते ३२ हजार ५०० रुपये जाहीर केलेली आहे पण शेतकऱ्यांना जाहीर केलेल्या रकमेतील पूर्ण रक्कम ही मिळत नाही. यातील तटपुंजी रक्कम शेतकऱ्यांच्या खात्यावर पडत आहे.

त्यामुळे महाराष्ट्र शासनाने जी रक्कम प्रतिहेक्टरी जाहीर केलेली आहे. ती सरसकट सर्व शेतकऱ्यांना एक रकमी लवकरात लवकर मिळावी अशी मागणी संभाजी ब्रिगेडच्यावतीने जिल्हा प्रशासनाकडे निवेदनाद्वारे करण्यात आली. ज्यांची ई केवायसी नाही त्यांना पैसे मिळणार नाहीत असे बँकेत सांगितले जात आहे. त्याचबरोबर विमा कंपन्याकडून पीक विम्याची रक्कम अद्याप मंजूर झालेली नाही. तीही लवकरात लवकर शेतकऱ्यांना पीक विम्याची रक्कम मिळावी अशी मागणी करण्यात आली. या मागण्यांचा विचार करण्यात आला नाही तर, संभाजी ब्रिगेड रस्त्यावर उतरून आंदोलन करेल असा इशारा यावेळी देण्यात आला.

**संभाजी ब्रिगेडची मागणी**

यावेळी संभाजी भोसले, छत्रुगन माने, शिरीष जगदाळे, मीनाल दास, सिद्धराम सावळे, मनीषा कोळी, ॲड. गणेश कदम, दिलीप निंबाळकर, शेखर भोसले, फिरोज सय्यद, सतीश वावरे, दिलीप भोसले, संतोष सुरवसे, अभिषेक जहागीरदार उपस्थित होते.

# पोलिसांना नाव का सांगितलसं म्हणून दुकानदाराला जीवे मारण्याची धमकी

**संशयीत आरोपीस अटक करून काढली धिंड**



**तभा वृत्तसेवा**
**वैराग दि ३१ ऑक्टोंबर**

जुन्या गुन्ह्यामध्ये माझे नाव का घेतले म्हणून भर दिवसा वैराग मधील एका दुकानात जाऊन कोयत्यांनी दहशत माजवत जीवे ठार मारण्याची धमकी दिल्या प्रकरणी वैराग पोलीस ठाण्यात एकाच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. विशेष म्हणजे या गुन्ह्यात कोयता वापरून दहशत माजवल्याने भविष्यातील धोके ओळखून वैराग पोलिसांनी आरोपीची मुख्य रस्त्यावरून धिंड काढून सर्वसामान्यांना दिलासा दिला आहे.

याबाबत वैराग पोलिसांकडून मिळालेली अधिक माहिती अशी की, वैराग शहरातील पंचशील नगर येथे फिर्यादी सुरज भोसले यांचे भोसले ट्रेडर्स किराणा मालाचे दुकान आहे. या दुकानांमध्ये एक वर्षांपूर्वी तुळशीदास नगर येथील संतनाथ सहकारी साखर कारखान्यावरून तेथील विद्यमान सरपंचांचे दीर अजित पाटील यांना मारहाण झाली होती.

या प्रकरणी आयाज शेख, युवराज प्रबळकर,विजय उबाळे व प्रतीक भोसले यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला होता. याप्रकरणी माझे नाव का घेतले? असे म्हणत, आयाज शेख याने कोयता घेऊन भोसले ट्रेडर्स मध्ये गुरूवारी सायंकाळी ६ वाजता दुकानात जात दहशत माजवण्याचा प्रयत्न केला. यावेळी त्याने काउंटरवर असलेले कॅडबरी फ्रिज फोडून जीवे ठार मारण्याची धमकी दिली. आणि काही वेळातच तो पळून गेला. दरम्यान कोयत्याने दहशत माजवल्यामुळे वैराग शहरात एकच खळबळ उडाली.त्यानंतर वैराग पोलीस ठाण्यातील पोलीस कॉन्स्टेबल शरद कांबळे आणि श्रीमंत शिंगाडे या दोघांनी वेगाने सूत्रे हलवून अवघ्या एका तासात आत आरोपीला त्याच्या हत्यारासह ताब्यात घेतले आणि आरोपीला बेड्या ठोकल्या. शुक्रवारी सकाळी आरोपीची मुख्य रस्त्यावरून धिंड काढत भोसले ट्रेडर्स मध्ये नेऊन पंचनामा करण्यात आला. दरम्यान वैराग मध्ये वाढत्या दहशती कृत्यांविरोधात पोलीस आक्रमक झाल्याचे दिसून येत आहे. ही धिंड पोलीस निरीक्षक कुंदन गावडे यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक प्रतापसिंह जाधव, पोलीस हेडकॉन्स्टेबल फुलचंद जाधवर, उमेश कंगले, आकाश पवार, सागर उमाटे, शिवलिंग कांबळे, राहुल पाटील यांनी काढली.

दुकानात गिऱ्हाईक चालू असताना ग्राहकाला देखील शिव्या दिल्या, ३०७ च्या जुन्या गुन्ह्यात नाव का घेतले म्हणत जीवे ठार मारण्याची धमकी देत कोयत्याने कॅडबरीचा फ्रिज फोडत दहशत माजवली असे सुरज भोसले यांनी सांगितले. यापूर्वी संबंधित आरोपीवर ३०७ चा गंभीर गुन्हा दाखल असून वैराग पोलीस ठाण्याच्या हद्दीत अशाप्रकारे दहशत माजवण्याचा कुणीही प्रयत्न केला तर तो खपवून घेतले जाणार नाही. असा इशारा वैराग पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक कुंदन गावडे यांनी दिला आहे.



## संजय महाराजांच्या कीर्तनातून अनेकांना जगण्याची प्रेरणा मिळाली

**▸ गौरव सोहळ्यात सुधाकर महाराज यांचे प्रतिपादन**

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट,दि.३१ ऑक्टोबर-**

वारकरी संप्रदाय हे सर्व जातीपातींना समान वागणूक देणारा असून या माध्यमातून संजय पाटील महाराज यांनी नागरिकांना कीर्तनातून तत्वज्ञानासह जगण्याची प्रेरणा दिल्याचे प्रतिपादन सुधाकर महाराज इंगळे यांनी केले.

संजय पाटील महाराज यांना राज्यस्तरीय पुरस्कार मिळाल्यानिमित्त अक्कलकोट तालुक्यातील जेऊर येथील काशिलिंग यात्रेत वारकरी सेवाभूषण परिवार व ग्रामस्थांकडून गौरव सोहळा आयोजित केले होते.यावेळी सुधाकर महाराज इंगळे बोलत होते. अखिल भारतीय वारकरी मंडळाचे राष्ट्रीय अध्यक्ष प. पू .पांडुरंग महाराज यांच्या सानिध्यात हा कार्यक्रम पार पडला. कार्यक्रमांचे अध्यक्षस्थानी काशिलिंग देवस्थानचे अध्यक्ष तथा माजी - कृषी सभापती मल्लिकार्जुन पाटील होते.

यावेळी सुधाकर महाराज बोलताना म्हणाले की, संजय महाराज पाटील हे अक्कलकोट पंचायत समितीत विस्तार अधिकारी म्हणून कार्यरत आहेत. शासकीय सेवेत असूनही ते परमार्थ करतात. ते दिवसभर नोकरी करून रात्री जिल्ह्यासह राज्यात कीर्तनाच्या जनजागृती करतात.

त्यांनी परमार्थ कसा घडवायचा संदेश दिल्याने त्यांना पुरस्कार मिळाल. यावेळी काशिलिंग देवस्थान कमिटीकडूनही गौरव करण्यात आला. कार्यक्रमास वसंत पाटील, सुरेश सोनार, रमेश गोगांव, महेश पाटील, प्रदीप पाटील आदी सह बहुसंख्य जण उपस्थित होते.

# लोकांनी आपसातील मतभेद लोकअदालतमध्ये मिटवावे

**▸▸ न्यायाधीश पी.व्ही. राऊत; बार्शीत फिरते लोकअदालत व कायदेविषयक जनजागृती शिबीर**

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. ३१ ऑक्टोबर-**

प्रत्येक घरात संस्कारी मुलगा तयार झाला तर नक्कीच चांगला समाज निर्माण होईल. जास्त कायदे असणे हे चांगल्या समाजाचे लक्षण नाही. लोक नियमांचे पालन करत नाहीत म्हणून कायदे तयार करावे लगातात. लोकांनी आपसातील मतभेद, वाद लोकअदालतमध्ये मिटवून पैशाची व वेळेची बचत करावी, असे प्रतिपादन सह. दिवाणी न्यायधीश क. स्तर श्रीमती पी. व्ही राऊत यांनी व्यक्त केले.



त्या चिखर्डे (ता. बार्शी) येथे बार्शी तालुका विधी सेवा समिती व वकील संघ बार्शी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित फिरते लोकअदालत व कायदेविषयक जनजागृती शिबिरात बोलत होत्या. पुढे बोलताना त्यांनी समाजातील प्रत्येक व्यक्तीने मानसिकता बदलण्याची गरज असून प्रत्येकाने नियमाने व कायद्याने वागल्यास चांगला समाज निर्माण होईल, असे सांगितले. युवक चांगले संस्कारी असल्यास चांगला समाज घडेल अन्यथा भविष्यात गुन्हेगारी वाढण्याची शक्यता असल्याचे सांगितले.

प्रस्ताविकात बार्शी वकील संघांचे अध्यक्ष विधीज्ञ आर. एन. गुंड यांनी समोपचाराने दिवाणी केसेस मिटवल्या तर लोकांची वेळेची व पैशाची बचत होते. तसेच न्यायालयावरील कामाचा ताण कमी होईल. त्यासाठीच असे उपक्रम राबवले जातात. लोकांनी याचा लाभ घेतला पाहिजे असे सांगितले. विधीज्ञ अक्षय पाटील, विधीज्ञ पांडुरंग घोलप, विधीज्ञ संजय कोकाटे यांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रमास विधीज्ञ उषा पवार, विधीज्ञ अभि कदम, चिखर्डे येथील अमित कोंढरे, बापू देवकर, निशांत मोहिते, कोकिळा जंगले, अंबिका परिहार, ग्रामविकास अधिकारी माने उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वीतेसाठी न्यायलयीन कर्मचारी, पांगरी पोलीस स्टेशनचा कर्मचारी, चिखर्डे ग्रामपंचायत कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.